भारतीय मनीषेचे प्रतीक आणि वाङ्मय व संस्कृतीचे अप्रतिम व्याख्याकार पं. हजारीप्रसाद द्विवेदी (1907-1979) यांचा जन्म आरत दुबेका छपरा, ओझवलिया, जिल्हा बलिया (उत्तरप्रदेश) येथे झाला. त्यांचे मूळ नाव बैजनाथ द्विवेदी असे होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण त्यांच्याच गावात व नंतर संस्कृत महाविद्यालय, काशी येथे झाले. तेथून त्यांना 'शास्त्री' व 'शास्त्राचार्य' (ज्योतिष) या पदव्या प्राप्त झाल्या. 1930 मध्ये त्यांनी 'विश्वभारती', 'शांतिनिकेतन' येथे हिंदी व संस्कृत विषयांचे शिक्षक म्हणून कार्याला प्रारंभ केला आणि विश्वकवी रवीन्द्रनाथ टागोर व पं. क्षितिमोहन सेन यांच्यासह ते इतरही अनेक विद्वानांच्या संपर्कात आले. त्यांनी 'विश्वभारती पत्रिका' तसेच 'अभिनव भारती ग्रंथमाला' (कलकत्ता) यांचे संपादनही केले. 1950 मध्ये ते काशी हिंदू विश्वविद्यालयात हिंदी विभागाचे प्रमुख व अध्यक्ष झाले.

राष्ट्रीय पातळीवर अनेक विभिन्न संस्था, नागरी प्रचारिणी सभा, विश्वभारती, राजभाषा आयोग, साहित्य अकादेमी, उत्तर प्रदेश हिंदी संस्थान इत्यादींच्या साहित्यिक व्यवहाराशी कायम जवळीक राखून असलेल्या द्विवेदींनी विपुल लेखन केले. त्यांच्या बहुचर्चित कादंबऱ्या 'बाणभट्ट की आत्मकथा', 'चारुचंद्रलेख', 'पुनर्नवा' आणि 'अनामदास का पोथा', संशोधन व समीक्षा ग्रंथ- 'हिंदी साहित्य की भूमिका', 'हिंदी साहित्य का आदिकाल', 'कबीर', 'नाथ संप्रदाय', 'सहज साधना', 'मध्यकालीन बोध का स्वरूप', 'सूर साहित्य', 'सिक्ख गुरुओं का पुण्य-स्मरण', 'मेघदूत-एक पुरानी कहानी', 'मृत्युंजय रवीन्द्र', 'प्राचीन भारत के कलात्मक विनोद', 'लालित्य-तत्त्व' वगैरे, तसेच ललित निबंध- 'अशोक के फूल', 'विचार और वितर्क', 'कुटज', या व्यतिरिक्त त्यांनी दिलेली रोचक व चिंतनपूर्ण व्याख्याने, मुलाखती, अनुभव, आठवणी यांच्या द्वारे त्यांनी हिंदी साहित्याचे भरपूर संवर्धन केले. त्यांच्याबद्दलचे एक विधान प्रसिद्ध होते की, 'संस्कृत त्यांचे मुख आहे, तर प्राकृत बाहू, अपभ्रंश त्यांचे उरू आहेत आणि हिंदी त्यांचे पाय आहेत.' 1949 मध्ये लखनौ विश्वविद्यालयाने त्यांना डी. लिट. ही मानद उपाधी दिली. 1957 मध्ये त्यांना 'पद्मविभूषण' ही सन्माननीय उपाधी प्रदान केली गेली. पश्चिम बंगाल सरकारच्या 'रवीन्द्र पुरस्कारा' व्यतिरिक्त 1973 मध्ये त्यांना 'आलोक पर्व' या ग्रंथासाठी साहित्य अकादेमी पुरस्कार देऊन सन्मानित केले गेले.

प्रस्तुत लेखनामधून हिंदीचे सुपरिचित कवी-समीक्षक डॉ. विश्वनाथप्रसाद तिवारी यांनी पं. हजारीप्रसाद द्विवेदींच्या विराट वाङ्मयीन व्यक्तित्वाचा संक्षिप्त परिचय करून दिला आहे. डॉ. तिवारी गोरखपूर विश्वविद्यालयात हिंदीचे अध्यापक आहेत. त्यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत. तसेच 'दस्तावेज' या त्रैमासिक पत्रिकेचे ते संपादक आहेत.

Hazariprasad Dwivedi (Marathi), Rs.25
ISBN 81-260-1573- x

22 भाषांमधून पुस्तके प्रकाशित करणारी
साहित्य अकादेमी, जगातील सर्वात मोठी प्रकाशन संस्था

# हजारीप्रसाद द्विवेदी

विश्वनाथ प्रसाद तिवारी



भारतीय
साहित्याचे
निर्माते

भारतीय साहित्याचे निर्माते

# हजारीप्रसाद द्विवेदी

लेखक

**विश्वनाथ प्रसाद तिवारी**

अनुवादिका

**सुकन्या आगाशे**

**साहित्य अकादेमी**

# अनुक्रम

1. जीवन, व्यक्तित्व आणि कालखंड / 1
2. निबंध / 20
3. कादंबरी / 35
4. संशोधन, समीक्षा व इतिहास-दृष्टी / 49
5. विचार दर्शन व लालित्य चिंतन / 65
परिशिष्ट
हजारीप्रसाद द्विवेदी यांची साहित्य-निर्मिती / 79
सहाय्यक सामग्री / 80

# 1.

# जीवन, व्यक्तित्व आणि कालखंड

पंडित हजारीप्रसाद द्विवेदींचा जन्म श्रावण शुक्ल एकादशीला– संवत् 1964 (इ. स. 1907) उत्तर प्रदेशातल्या बलिया जिल्ह्यामधील आरत दुबेका छपरा येथे ओझवलिया नावाच्या गावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव श्री. अनमोल द्विवेदी आणि आईचे नाव श्रीमती ज्योतिष्मती असे होते. द्विवेदींचे मूळ नाव बैजनाथ द्विवेदी होते. त्यांना 'हजारीप्रसाद' नाव पडले त्याला कारण एक मनोरंजक प्रसंग आहे. 'शांतिनिकेतन' मधून 15-6-43 रोजी श्री. बनारसीदास चतुर्वेदी यांना पाठवलेल्या पत्रात द्विवेदी लिहितात : ''ज्या दिवशी माझा जन्म झाला त्याच दिवशी एक खटला जिंकल्याबद्दल कुटुंबियांना बाराशे रुपये मिळाले. त्या आनंदाप्रित्यर्थ माझे मूळ नाव चक्क मागेच टाकले गेले, आणि शाळेच्या रजिस्टरपासून थेट 'विशाल भारत'च्या छापील पानांपर्यंत, दोनशे उणे करून त्या हजार रुपयांची आठवण जागवणारे हेच नाव मग असे काही प्रसिद्ध झाले की बस्- रागाने प्रत्यक्ष लक्ष्मीदेवीनेच शाप देऊन टाकला की, ''या 'हजारी'त्वाच्या पुढे तू या जन्मात जाऊ शकणार नाहीस!''[1]

अन्य ठिकाणी एका 'आत्मपरिचया'त ते लिहितात : ''विक्रम संवत्सराचे विसावे शतक दोन तृतियांशही उलटले नव्हते तेव्हा या पृथ्वीतलावर अस्मादिक अवतरले. जन्मसुद्धा अभुक्त अशाच एका– 'मूळ' नक्षत्रावर झालेला, की या नक्षत्रावर जन्मल्याबद्दलची जणू शिक्षाच म्हणून म्हणे बाबा संत तुलसीदासाच्या मातापित्यांनी त्याला जन्मताच कुठेतरी टाकूनच दिले होते. तुलसीदासाहून हजारीप्रसाद नशीबवान म्हणावा लागेल! सुरुवातीला जन्मानंतर त्याला आईबापांनी ग्रह-शांती वगैरे केल्यानंतर स्वीकारले खरे, पण नंतर विश्वविद्यालय पदवीच्या सोडमुंजीनंतर जेव्हा 'ब्राह्मणत्व' प्राप्त झाले तेव्हा मात्र खुद्द मातृभूमी म्हणवणाऱ्या प्रान्तानेच त्याला असा काही ठोकरून दिला, की तो आजतागायत बंगालमध्येच काळ कंठत राह्यला आहे. तसा अजून धड आहे आणि एकंदरीत माणूस तसा वाईट नाहीये. नशीबाचा तगडा तर तो जन्मापासूनच आहे. कारण वडीलधाऱ्यांनी मुळात ठेवलेल्या त्याच्या नावाला एका जबरदस्त घटनेमुळे विस्मृतीच्या अफाट सागरात कायमची जलसमाधी मिळाली. कुटुंबियांना कुठूनसा हजार रुपयांचा धनलाभ झाला आणि इतरेजनांनी ऐतिहासिक

---

1. पत्र: हजारीप्रसाद द्विवेदी : (सं.) मुकुंद द्विवेदी, पृ. 63

महत्त्वाच्या या अमर्याद धनराशीचा स्थानीय आविष्कार म्हणून त्यालाच 'हजारी' हे नाव बहाल केले. सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे हा माणूस तसा वाईट नव्हे. उलट थोडा कृतज्ञ सुद्धा आहे. लोकशाहीच्या या खतरनाक काळात देखील, लोकांनी ठेवलेले नाव म्हणजे 'प्रसाद'च या भावनेने आजवर तेच नाव धारण करून वावरतोय, जरी जन्मापासूनच त्याचं हे नाव म्हणजे एक 'contradiction in terms' आहे, तरीसुद्धा! ह्या युगात ही एवढी कृतज्ञता काही कमी नव्हे. तर असा आहे हा हजारीप्रसाद.[1]

वरील अवतरणांवरून द्विवेदींची आर्थिक स्थिती स्पष्ट होते. 1934 पासून 1945च्या दरम्यान बनारसीदास चतुर्वेदींना लिहिल्या गेलेल्या त्यांच्या अनेक पत्रांमधून त्यांची आर्थिक कुचंबणा आणि जीवन-संघर्ष यांचे दर्शन होते. या संदर्भात 19-9-45 ला चतुर्वेदींच्या नावे लिहिलेले त्यांचे एक दीर्घ पत्र म्हणजे याचाच एक सज्जड पुरावा आहे. यात त्यांच्या जीवनाच्या सुरुवातीच्या काळाचेही ओझरते चित्रण आहे त्या पत्राचा काही भाग उद्धृत केला आहे तो असा-

''प्रिंसिपल ध्रुव यांच्या बाबतचा प्रसंग मी तुम्हाला सांगतो. पण हा आता छापू नका. प्रि. ध्रुव आता या जगात नाहीत आणि माझ्याबाबत जे घडले ते कदाचित अभावितपणेच घडले असावे. त्यांचा स्वभाव तसा दयाळू होता. झाले असे, की, माझे शिक्षण संस्कृत कॉलेजमधून झालेले. एक ध्यानात घ्या की हिंदू युनिव्हर्सिटीचे संस्कृत कॉलेज नसते तर बहुधा मी काहीच शिकू शकलो नसतो. इथून तिथून मी थोडेसे इंग्रजी शिकलो आणि ॲडमिशनची परीक्षा दिली. पहिल्या श्रेणीत उत्तीर्ण झालो. हिंदू युनिव्हर्सिटीच्या मध्यवर्ती हिंदू कॉलेजात मोठ्या उत्साहाने मी इंटरमीजिएटमध्ये शिकण्यासाठी दाखल झालो. माझ्या घरच्या आर्थिक परिस्थितीबद्दल न बोललेलेच बरे. मला आठवतेय, की वडिलांनी मोठ्या मिनतवारीने गावातल्या एका गृहस्थाकडून चाळीस रुपये उधारीवर मिळवले होते. हा माझ्या इंटरमीजिएटमध्ये भरती होण्यासाठीचा पहिला नैवेद्य होता. त्यानंतर मी वर्गात बसत तर असे आणि फी मात्र देत नसे. हिंदू विश्वविद्यालयात त्याकाळी कित्येक गरीब विद्यार्थी असत. मारून मुटकूनच वर्गात बसत असत. वर्षअखेरीला प्रि. ध्रुव आणि मालवीय यांच्या कृपेने त्यांचा उद्धार व्हायचा. मी देखील त्याच वर्गातला. अनेकदा मला इशारेवजा सूचना दिली गेली, पण माझ्याजवळ फुटकी कवडीसुद्धा नव्हती. संस्कृत कॉलेजात 15 रुपये शिष्यवृत्ती मिळत होती. आणि 5 रुपयांची एक शिकवणीही करत होतो. जेवणाखाण्याचे जाऊन त्यातूनच काही वाचवून घरी पाठवत होतो. घरची परिस्थिती तर इतकी दयनीय होती की आजही नुसती आठवण झाली तरी अंगावर काटा येतो. वर्षअखेरीला माझे नाव पटावरून काढून टाकले गेले. माझ्या ऐकण्यात होते की प्रि. ध्रुव यांच्याकडे गेले तर सगळे काही सुरळीत होऊन जाते. मी भीत भीत त्यांच्या खोलीत गेलो. ते काहीसे त्रासल्यासारखे बसले होते. कदाचित माझ्यासारखेच आणखीही दरिद्रीनारायण त्याआधी त्यांच्या चरणी लागले

1. पत्र: हजारीप्रसाद द्विवेदी, (सं) मुकुंद द्विवेदी, पृ.63



असावेत. मी माझ्या अडचणींची कहाणी सांगू लागलो, तर मधेच वैतागून उद्गारले, ''जा- मला काहीएक ऐकायचे नाहीये- युनिव्हर्सिटी गरीबांसाठी नाहीये! जा आणि विटा वाहण्याचे काम कर!'' माझा असा अंदाज आहे की दुसऱ्या एखाद्या कारणाने ते रागावलेले असावेत. नाहीतर त्यांचा स्वभाव दयाळू होता. पण मला जसा वर्मीच बाण लागला. मी तिथल्या तिथे बोलणे अर्ध्यावर सोडले आणि उठून नमस्कार करून निघून आलो. दरवाजातून मी बाहेर पडेपर्यंत ते पाहत राहिले, एखाद्या वेडसर माणसाकडे पहावे तसे. मी माझ्या संस्कृत कॉलेजच्या हॉस्टेलमध्ये- ज्याला युनिव्हर्सिटीतले 'बडे बापके बेटे' 'घोड्यांचा तबेला' म्हणत- परतलो, आणि खूप रडलो. माझे शिक्षण तिथेच थांबले. माझे एक शिक्षक म्हणाले, 'चल, मी तुला पुन्हा प्रि. ध्रुवकडे घेऊन जातो. गरजेपोटी शंभरदादेखील जावे लागते.' पण मी तर पार खचलो होतो. गेलो नाही. मालवीयांकडे जायचाही धीर झाला नाही. नंतर मी फक्त 'इंग्रजी' विषय घेऊन परीक्षा दिली. संस्कृतच्या शास्त्र्यांकडे विद्यार्थी केवळ 'इंग्रजी' घेऊन तेव्हा बी. ए. पर्यंतची परीक्षा देऊ शकत होते. तो देखील एक गमतीदार किस्सा आहे. परीक्षेसाठी फी अगदी कमी होती, पण ती देण्याएवढेही पैसे माझ्याजवळ नव्हते. अंग झाकायला धड कपडेसुद्धा माझ्याजवळ नव्हते. कुणाकडून उसनवारीने मागावेत तर तीही कला मला अवगत नव्हती. तेव्हा मी मग पोथीच काखेत अडकवली आणि पुराणकथनाचा मार्ग धरला. माझे एक मित्र होते. श्री. सीताराम द्विवेदी. या ऑगस्ट आंदोलनात ते पकडले गेले आणि तुरुंगातच वारले. त्यांनी कोआथ (आरा) मध्ये माझे पुराणकथन ठरवले. खरे तर ते स्वत: आर्यसमाजी होते. पण माझ्या भल्यासाठी त्यांनी त्या गोष्टीची पर्वा केली नाही. प्रवचन सात दिवस चालले. आठव्या दिवशी सांगता, दक्षिणा झाली. 35 रुपये, एक रजई, काही साड्या, काही कपडे, धोतरे आणि बरेचसे अन्नधान्य माझ्या पदरात पडले. रजई 'कोआथ' च्या हकीम बांधवांकडून आली होती. माझ्या आयुष्यात एवढी मोठी मदत मला यापूर्वी कधी मिळाली नव्हती व पुढेही मिळणार नाही. त्या साड्या, धोतरे वगैरेंचे माझ्या घरात कसे नि किती स्वागत झाले असेल त्याची तुम्हाला सहज कल्पना येईल. ते 35 रुपये म्हणजे तर माझी मोठीच सिद्धी होती; आणि मी इंटरमीजिएटची नदी पार करू शकलो. 'आचार्य' पदवीपरीक्षेनंतर मी आणखी एकदा पुराणवाचन केले, त्यावेळी 68 रुपये मिळाले होते. माझे परम मित्र बाबू बबन सिंह यांनी यावेळी तिचे आयोजन केले होते. असे वाटते की आयुष्य उताराला लागले म्हणजे जीवनातली दु:खं आणि ती दूर करण्यासाठी माझ्या मदतीला धावून आलेली माणसं- सगळ्या आठवणी शब्दबद्ध कराव्यात. पण यादी पाहू गेले तर ती प्रचंड असल्याचं ध्यानात येतं. तरीही लिहिणार आहे एवढं निश्चित''[1]

परंतु द्विवेदींनी आपल्या जीवनाची ही संघर्ष-गाथा लिहिली नाही. त्यांच्या पत्रांमध्ये व इतर साहित्यामध्ये त्यांचे सूचन जरूर आहे. या सूचन- सूत्रांच्या आधारे एखादा प्रतिभावान चरित्रकार त्यांची अद्भुत जीवन-कहाणी लिहूही शकेल. द्विवेदींनी अनेक

1. पत्र: हजारीप्रसाद द्विवेदी, (सं) मुकुंद द्विवेदी, पृ.71-72

कलाकृतींमध्ये, अनेक प्रसंगांमधून मोठ्या कलात्मकतेने स्वत:च्या व्यक्तित्वाला दुसऱ्या व्यक्तिचित्रांच्या माध्यमातून व्यक्त केले आहे. कुठे नि किती त्यांची पात्रचित्रणे आहेत व कुठे आणि किती त्यांचे स्वत:चे जीवन-चित्रण आहे हे सांगणे कठीण आहे. आपल्या पत्रांमधून तर ते सरळ-सरळ खुद्द स्वत:लाच व्यक्त करताना दिसतात. पण निबंधांमधली व विशेषत: कादंबऱ्यांमधली त्यांची आत्माभिव्यक्ती बरीचशी गूढ आहे. त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये, विशेषत: 'बाणभट्ट की आत्मकथा' मध्ये प्रेमाचा जो एक अदृश्य अंत:प्रवाह वाहताना प्रत्ययास येतो तो खुद्द द्विवेदींचा नाही हे कोण म्हणू शकेल! द्विवेदी वारंवार 'अंत:स्थ ईश्वरा'ची चर्चा करताना दिसतात; त्याबरोबरच 'लोकापवादा'चीही. असे तर नसेल की त्यांच्या 'अंत:स्थ देवा'ला लोकापवादाच्या भयामुळे व्यक्त होता आले नाही?... कसे समजावे! द्विवेदींची पद्धत अशी की कोणतीही गोष्ट एका अद्भुत मोहक आच्छादनात लपेटून सादर करायची. त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये वास्तव आणि कल्पना यांचा एक विचित्र, अनोखा लपंडाव चाललेला दिसतो. द्विवेदींच्या अंत:स्थ व्यक्तिमत्त्वाची जी सूक्ष्म अभिव्यक्ती त्यांच्या संपूर्ण वाङ्मयातून झालेली आहे त्यांचे विस्तृत विश्लेषण करणे हे या लहानशा पुस्तिकेच्या कक्षेबाहेरचे आहे. तरीही इथे दिलेले काही जिज्ञासापूर्ण संकेत मात्र पुरेसे आहेत.

द्विवेदींचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या ग्रामीण परिसरातच झाले. इ.स. 1920 मध्ये ते वसरियापूरच्या मिड्ल स्कूलमधून पहिल्या वर्गात मिड्ल स्कूल परीक्षेत उत्तीर्ण झाले. यानंतर त्यांनी गावाजवळच असलेल्या पराशर ब्रह्मचर्य आश्रमात संस्कृत शिकण्यास सुरुवात केली. सन 1923 मध्ये ते विद्याभ्यासासाठी काशी येथे गेले व त्याच वर्षी त्यांनी काशी हिंदू विश्वविद्यालयाची प्रवेशिका परीक्षा दिली. सन 1927 मध्ये ते काशी हिंदू विश्वविद्यालयाची ॲडमिशन (हायस्कूल) परीक्षा उत्तीर्ण झाले. 1927 मध्येच त्यांचा विवाह श्रीमती भगवती देवी यांच्याशी झाला. त्यांना सात अपत्ये झाली. चार पुत्र व तीन कन्या. 1929 मध्ये ते इंटरमीजिएट परीक्षा पास झाले. 1929 मध्येच त्यांनी संस्कृत साहित्यातील 'शास्त्री' व 1930 मध्ये 'ज्योतिष' विषय घेऊन 'शास्त्राचार्य' या पदव्या मिळवल्या. या दोन्ही परीक्षा ते पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. काशीमध्ये त्यांचे ज्योतिष विषयाचे गुरू श्री. रामयत्न ओझा हे होते. द्विवेदींनी पं. बनारसीदास चतुर्वेदींना लिहिलेल्या वरील पत्रात त्यांचे मोठ्या श्रद्धेने स्मरण केले आहे.[1] द्विवेदींचे शालेय शिक्षण हे व याच्या पलीकडे जाऊन त्यांनी जे काही मिळवले ते आपल्या स्वत:च्या अभ्यास व व्यासंगामधून आणि व्यापक जीवनानुभवापासून. द्विवेदींच्या साहित्याचे वाचक जाणतात की द्विवेदींना मानवी जीवन खूप मोलाचे वाटते. ते त्यांच्या दृष्टीने ईश्वराचे मंदिरच आहे. मनुष्याची दुर्दम्य जीवनेच्छा व त्याची अपराजेय अशी जययात्रा यांवर द्विवेदींचा दृढ विश्वास होता. हा विश्वासच त्यांना ज्ञान आणि विद्वत्तेच्या क्षेत्रात सतत उत्कर्षाच्या दिशेने प्रवृत्त करत राहिला आणि

1. कित्ता, पृ. 73-74



त्यातून त्यांनी जे काही मिळवले ते कोणाच्या कृपेने नाही तर स्वत:च्या मेहनतीने, साधनेने आणि स्वत:च्या अं:तस्थ ऊर्जेच्या बळावर.

8 नोव्हेंबर 1930 रोजी द्विवेदींनी 'शांतिनिकेतन'येथे हिंदीचे अध्यापक म्हणून कार्याला प्रारंभ केला. या दिवसाला त्यांच्या जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान ते देत आणि या 'तिथी'ला आपली द्विजत्व प्राप्तीची तिथी समजत. 23 ऑक्टोबर 1973 रोजी शिवमंगल सिंह 'सुमन' यांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात,

''आपण जाणताच की, 6, 7 आणि 8 नोव्हेंबर हे माझे 'द्विजत्व प्राप्ती'चे सुदिन आहेत. मी 6 तारखेला शांतिनिकेतनला जायला निघालो, 7 तारखेला तिथे पोहोचलो आणि 8 तारखेला कामाला सुरुवात केली. या तारखा माझ्या दृष्टीने फार महत्त्वाच्या आहेत.''[1]

द्विजत्व प्राप्ती म्हणजे दुसऱ्यांदा जन्माला येणे. द्विवेदी या दिवसाला दुसऱ्या जन्माच्या प्राप्तीची तिथी का समजत ते त्यांच्याच शब्दांत वाचावे. 19-9-1945 रोजी पं. बनारसीदास चतुर्वेदींच्या नावे लिहिलेल्या पत्रात द्विवेदींनी लिहिले आहे:

''जीवनातल्या 'टर्निंग पॉइंट' बद्दल आपण विचारले आहे. माझ्या जीवनातली सर्वात महान घटना म्हणजे 'शांतिनिकेतन' मध्ये मला गुरुदेवांचे दर्शन झाले ती. कोण जाणे कुठल्या पूर्वपुण्याईचे फळ म्हणून हे भाग्य माझ्या वाट्याला आले. दर्शन घडणे एवढेदेखील पुण्याईचे फळ म्हणावे लागेल. परंतु इथे तर माझ्या वाट्याला आधी त्यांचा स्नेह आला. नंतर 'गुरुवर्यां'चे दर्शन झाले. अहाहा! भागीरथीची जणू निर्मळ जलधाराच असा त्या प्रेमळ महामानवाचा सहवास किती आनंददायी होता! ज्याने कधीतरी हा रसानुभव घेतला असेल त्यालाच ते समजेल!''[2]

''ज्या दिवशी रवीन्द्रनाथांना पाहण्याची संधी मला मिळाली तो दिवस म्हणजे माझ्या अनेक जन्मांच्या पुण्याचे फळ होते. मला एक अगदी नवीच दृष्टी मिळाली. नवा विश्वास मिळाला. माझ्यात कितीतरी दोष आहेत आणि असेही नव्हे की मला ते दिसतच नाहीत. कितीतरी गोष्टी जाणवल्या, समजल्या, पण तरीही ते दोष सुधारण्याचे सामर्थ्य नाहीये. त्यामुळे रवीन्द्रनाथ जितके समजायला-आकळायला हवेत, तितके त्यांचे ग्रहण, आकलन मला करून घेता आले नाही. पण त्यांच्या दर्शनाने निश्चितपणे माझ्या अंतर्मनात एक मंथन सुरू झाले आणि थोडाबहुत मळ गळून पडला हे नक्की.''[3]

द्विवेदींनी रवीन्द्रनाथांचे व्यक्तित्व आणि कृतित्व यासंबंधी अनेक लेख लिहिले आहेत, व 'मृत्युंजय रवीन्द्र' या त्यांच्या पुस्तकात ते संकलित केले गेले आहेत. या पुस्तकाच्या 'भूमिके'त त्यांनी लिहिले आहे :

''हे शब्द लिहिणाऱ्या लेखकाला जवळ जवळ बारा वर्षे त्यांच्या निकट संपर्कात राहण्याची संधी मिळाली होती. त्यांचे जगणे आणि वागणे फारच संयमशील आणि प्रेरणा देणारे असे होते. त्यांच्या सान्निध्यात आलेल्याला नेहमीच असा अनुभव यायचा

1. कित्ता, पृ. 123
2. कित्ता, पृ. 73,
3. कित्ता, पृ.74.

की येथून जाताना आपण पूर्वीपेक्षा अधिक सुसंस्कृत, अधिक प्रगल्भ होऊनच परतत आहोत. महामानव कोणाला म्हणावयाचे? तर ज्याच्या संपर्कात येणाऱ्याचे स्वत:मधले 'देवपण' जागृत होते त्याला! रवीन्द्रनाथ या कोटीतले महान पुरुष होते.''

शांतिनिकेतनमध्ये द्विवेदी गुरुदेवांच्या व्यतिरिक्त बंगाली, हिंदी व इंग्रजीच्या इतर विद्वानांच्या संपर्कातही आले. आचार्य क्षितिमोहन सेन, नंदलाल बसू, विधुशेखर शास्त्री, सी. एफ्. अँड्र्यूज त्यात प्रमुख होते. तेथील वास्तव्यातच बनारसीदास चतुर्वेदी यांच्याही ते विशेष सान्निध्यात आले. चतुर्वेदींबद्दल ते आपल्या त्याच 19-9-45 च्या पत्रात लिहितात :

''माझे साहित्यिक गुरू तर अनेक आहेत. पण ज्यांच्या एकाच चिठ्ठीने माझ्या अंत:करणात अपूर्व अशा जीवनशक्तीचा स्रोत प्रवाहित केला होता, त्यांच्याबद्दल मी काय सांगू!... त्या काळात मी एक अज्ञात, अप्रसिद्ध लेखक होतो. रवीन्द्रनाथांच्या कवितांवरचा माझा एक लेख मी 'विशाल भारत' मध्ये प्रकाशनासाठी धाडला होता. 2 जानेवारीला मला एक पत्र आले, की- 'तुम्ही तर आमच्यासारख्या अनेकांच्या कितीतरी पुढे निघून गेला आहात.'' मी नवलानं ते पत्र पुन्हा पुन्हा वाचत राहिलो. त्या दिवशी, एक नवीच शक्ती अंगात संचारल्याचा मला अनुभव आला. तुम्हाला कल्पना नाही, त्या एका चिठ्ठीनं मला केवढं बळ दिलं! चिठ्ठीतल्या एकेका शब्दात प्रेमाची आणि प्रेरणेची ऊब होती. वाङ्मयाच्या क्षेत्रात आपण मला गुरुस्थानी आहात. आपल्याला माझे कृतज्ञतापूर्वक प्रणाम.''[1]

शांतिनिकेतन येथे द्विवेदी वीस वर्षे राहिले. (1930-1950) त्यांच्या जडणघडणीत या ज्ञानकेंद्राचे महत्त्वाचे योगदान आहे व द्विवेदी ते ऋण वारंवार मान्य करताना दिसतात. गुरुदेवांच्या याच आश्रमात राहून त्यांनी स्वत:ला तावून-सुलाखून घेतले, तसेच आपल्या विद्वत्तेला एका सुव्यवस्थित दृष्टीची जोड दिली. इथल्या वास्तव्याच्या काळात त्यांनी 'अभिनव भारती ग्रंथमाला'चे संपादन (कलकत्ता, 1940 ते 1946) तसेच 'विश्वभारती पत्रिके'चे संपादनही (1941 ते 1947 पर्यंत) केले. 1946 मध्ये ते अखिल भारतीय हिंदी साहित्य संमेलनाच्या कराची अधिवेशनाच्या साहित्य परिषदेचे अध्यक्ष होते. तसेच 1948 मध्ये अखिल भारतीय ओरिएंटल काँग्रेसच्या दरभंगा अधिवेशनाच्या हिंदी विभागाचे सभापती होते. 1945 ते 1950 पर्यंतच्या काळात 'हिंदी भवन, विश्वभारती'चे ते संचालक होते. 1949 मध्ये त्यांना लखनौ विश्वविद्यालयाने 'डॉक्टर ऑफ लिटरेचर' ही उपाधी सन्मानपूर्वक प्रदान केली. शांतिनिकेतनमध्ये व्यतीत केलेल्या काळातच द्विवेदींनी आपल्या कित्येक ग्रंथांचे लेखन केले आहे. 1930 च्या सुमारास त्यांचा 'सूर साहित्य' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला, तर 1940 मध्ये 'हिंदी साहित्याची भूमिका'. 1941-42 मध्ये सुप्रसिद्ध समीक्षा-ग्रंथ 'कबीर' आणि 1946 मध्ये त्यांची विख्यात कादंबरी 'बाणभट्ट की आत्मकथा'प्रकाशित झाली.

1950 मध्ये द्विवेदी काशी हिंदू विश्वविद्यालयाच्या हिंदी विभागाचे प्रोफेसर-

1. किन्ना, पृ. 73



अध्यक्ष म्हणून रुजू झाले. काशीला येण्याचे निमंत्रण तर त्यांना दोन वर्षे आधीच मिळाले होते आणि मनातून त्यांना यायचेही होते. पण काशीमध्ये त्यांना विरोध काही कमी नव्हता. इकडे निमंत्रण मिळाले, पण तिकडून काशीहून धमकीवजा पत्रे येऊ लागली. शिवमंगल सिंह 'सुमन' यांना लिहिलेल्या 18-8-48 च्या पत्रामध्ये द्विवेदींनी त्या परिस्थितीचे वर्णन केले आहे :

''काशीहून काही अत्यंत घृणास्पद अशी पत्रे आली आहेत,आणि अजूनही येत आहेत. 'घृणास्पद' शब्द वापरताना मी फार व्यथित झालो आहे. ती ज्यांनी लिहिली आहेत त्यांच्यात कुठेही माणूस म्हणवून घेण्याची लायकीच दिसत नाही! केवळ उत्साहभंग करणे, धमक्या देणे, वर्तमानपत्रांमधली कात्रणे पाठवणे, शिवीगाळ करणे हीच साहित्यिकता म्हणायची काय? आपल्याला आश्चर्य वाटेल, पण यातले एक पत्रलेखक तर म्हातारपणी संसार सोडून संन्यास घेण्याच्या उद्देशाने काशीला येऊन राह्यलेले असे आहेत. केवळ या पत्रांमुळे वाटत होते की एक वेळ करावाच स्वीकार. पण मग पुन्हा विचार केला की ते देखील क्रोधाच्या आणि द्वेषाच्या भरात निर्णय घेतल्यासारखे होईल. अखेर, माणूस बनणे हेच तर माणसाचे कर्तव्य आहे ना!..

घडले आहे ते असे की, काशीच्या व्हाइस चॅन्सलरांनी रथी बाबूंना (रवीन्द्रनाथांचे चिरंजीव) एक व्यक्तिगत पत्र लिहिले होते. त्यात म्हटले होते की, कौन्सिलच्या आदेशानुसार मी तुम्हाला असे सुचवीत आहे की तुम्ही सुप्रसिद्ध विद्वान श्री. द्विवेदी यांना (काशी) विश्वविद्यालयाची प्रोफेसरशिप स्वीकारण्याची सवलत द्यावी व मुक्त करावे. आमचा हिंदी विभाग त्यामुळे सामर्थ्यवान होईल... वगैरे. मला याबद्दल व्यक्तिगतरीत्या काहीच कळवले गेले नव्हते. झा साहेबांचे पत्र फारच चांगले होते. प्रस्ताव करण्याची त्यांची पद्धत अगदी रास्त होती, व त्याबद्दल त्यांचा सन्मानच करावा लागेल. त्यांनी जर सरळ माझ्याशीच बोलणे केले असते तर खरोखर माझ्यासमोर धर्मसंकटच उभे राह्यले असते. इकडे रथी बाबू, सुरेन बाबू आणि अनिल बाबू यांनी मला हर तऱ्हेने समजावले की, 'तुमच्या जाण्याने संस्थेचे नुकसान होईल.' रथी बाबू म्हणाले की तुम्हाला जायचेच असेल तर आम्ही आड नाही येणार, पण आमची आंतरिक इच्छा आहे की तुम्ही आमच्याबरोबर रहावे... माझ्या रहाण्या-जेवण्याची व्यवस्था यथाशक्ती करण्याचे आश्वासनदेखील या लोकांनी मला दिले. माझ्या तेव्हाच्या मानसिक अवस्थेची आता तुम्हाला कल्पना येईल. घरचे लोक तर मी काशीला जावे असे म्हणत होतेच. इकडेही सगळे लोक-पदाधिकारी नव्हते असे लोक- म्हणजे, गुसाई, प्रधान, क्षितिबाबू सगळ्यांचे म्हणणे हेच- मी काशीला जाणे चांगले. संसार आहे, पोरे-बाळे आहेत... इतक्या तुटपुंज्या पगारात कुठवर अडकून राहणार वगैरे. पण तिकडे रथीबाबूंच्या मुद्याला लगोलग विरोध करण्याची माझ्या मनाची तयारी नव्हती. नुसती काशीहून आलेली ती घाणेरडी पत्रेदेखील कधी-कधी मला, मी तिथे जावेच म्हणून टोचणी लावत. तुमच्या पत्राची खूप दिवस वाट पहात होतो. पण तिथूनही जेव्हा काहीच हालचाल दिसेना तेव्हा ठरवले की आता आपल्या अंतर्मनाचा कौल घ्यावा हेच ठीक. पण अंतर्यामी मौनात! ना राम ना गंगा! मी पुष्कळ विनवण्या केल्या की, बाबा रे! काहीतरी तर बोल! काशीला जायचे आहे... ते

तर माझे स्वप्नच आहे ना!... काशी! तिथला कण न् कण, अणुरेणु मला हाकारतो, साद घालतो आणि तिचं प्रत्येकच दर्शन असतं उत्तेजित करणारं... जिथे गंगेच्या मनोहर ऊर्मींवरून वहात येतो निर्मळ वारा... विश्वनाथाच्या•नि अन्नपूर्णेच्या अहेतुक कृपेचा जणू प्रसादच... अशा त्या काशीत पाऊल ठेवायचे आहे... अंतर्यामी मौनातच! भला माणूस! जो झोपी गेलाय तो कुशीदेखील बदलायला तयार नाही!

*'लोकेर कथा दिसने काने*
*फिरिसने आर हजार टाने*
*येन रे तोर हृदय जाने हृदये तोर आपन राजा'*

आता अंतर्यामीसुद्धा जागा होईल!...

मग गुरुदेव म्हणाले, "जाऊ नको."... आणि मग सगळे ठरून गेले! स्वार्थाच्या अधीन झालेल्या मनाला जी गोष्ट इतकी बिकट वाटत होती तीच कर्तव्यभावनेने बघताना एकदम सरळसोपी होऊन गेली. यात विचार कसला करायचाय? माझ्या दृष्टीने दोन्ही संस्था सारख्याच आराध्य आहेत. दोहोंचे लक्ष्य, ध्येय एकच आहे. कर्तव्याच्या बाबतीत माझ्या मनात द्वंद्व कशाला?[1]

अशा प्रकारे 1948 मध्ये द्विवेदी काशी हिंदू विश्वविद्यालयाच्या निमंत्रणानुसार तेथे जाऊ शकले नाहीत. पण दोन वर्षांनंतर जेव्हा त्यांना पुन्हा निमंत्रित केले गेले तेव्हा त्यांना पुन्हा पेच पडला. 30-5-50 रोजी 'सुमन' यांना लिहिलेल्या पत्रात द्विवेदी आपल्या मन:स्थितीबद्दल लिहितात :

"माझी अवस्था तुम्हाला सांगतो. मागल्या दोन-तीन वर्षांपासून मला बाहेरून काही निमंत्रणे आली आणि दरवेळी 'विश्वभारती'च्या अधिकारी वर्गाचा मला बांधून ठेवण्यासाठीचा आग्रहही वाढत गेला आहे. मागल्या वेळी बिहार सरकारने मला बोलावणे केले. त्यांचे पत्र नोव्हेंबरमधले. त्यांनी ग्रेड बदलून मला 755-30-1000/- अशी ऑफर दिली. मी त्यावेळी आजारी होतो. खुद्द रथीबाबूंनी मला थांबवण्याचा प्रयत्न केला. माझ्यासाठी त्यांनी असा एक प्रस्ताव पास करून घेतला की 'विश्वभारती' ची आर्थिक स्थिती पाहता तो जड़च ठरला असता. मला 400 + 30/- पगार देत होते. आता आणखी 3-1/2 हजार रुपये वर्षाला 'एक्स्ट्रा रेम्युनरेशन' म्हणून वाढवून दिले. तेदेखील एप्रिल 49 पासून. या हिशेबाने मला सध्या सव्वासातशेच्या आसपास मिळतात. हा पगार 'विश्वभारती' मध्ये सर्वात जास्त आहे. श्री. क्षितिमोहन बाबू व नंदलाल बाबू यांच्यापेक्षाही जास्त. मला धरून ठेवण्याचा हा आग्रह आहे असे तुम्हाला वाटेल. मी बिहारला गेलो नाही. 'विश्वभारती'चे 'विश्वविद्यालया'त रूपान्तर होईलसे दिसते आहे. मला 1000/- च्या ग्रेडमध्ये ठेवतील असे इथल्या अधिकाऱ्यांनी सांगूनही टाकले आहे.

माझे घर मोठे केले जात आहे. तुम्ही जे पाहिले होते. त्यात आणखी दोन खोल्या वाढवून मिळाल्या आहेत. शिवाय एक स्नानगृह आणि शौचालय हेही. आधी 8/- रु. भाडे देत होतो. आता कदाचित थोडेसे वाढेल. सहा मुलांना शिक्षण जवळजवळ

1. कित्ता पृ. 130-131



मोफत मिळते आहे. अशी एकूण स्थिती आहे.

आता काशी विश्वविद्यालयाबद्दल माझे मत सांगतो. काशीचे ते विश्वविद्यालय मला मातेसमान आहे, तसेच 'विश्वभारती' देखील. दोन्हींनी मला ज्ञानाचा ठेवा दिला. माझ्या दोन महान गुरूंपैकी एक तिथले संस्थापक आहेत तर एक इथले. तरीदेखील गेल्या काही दिवसांपासून असे जाणवते आहे की मी जर हिंदी भाषेच्या क्षेत्रात राहिलो तर कदाचित काम करण्यासाठी अधिक व्यापक क्षेत्र मिळेल. हे मला अधिकाधिक वाटू लागले आहे. हे बरोबर नसण्याचीही शक्यता आहे. आणि काशीहून दुसरे अधिक चांगले ठिकाण कोठे मिळणार? तिथे मला विरोध आहे खरा, पण मला ठाऊक आहे की तो जास्त काळ टिकणारा नाही. पण कुठेतरी अशी काहीतरी गोष्ट आहे आणि ती काशीला जाण्याच्या माझ्या उत्साहावर विरजण घालते आहे...कधी कधी मनात येते की अशी एखादी व्यवस्था असू शकत नाही का? म्हणजे असे की, ज्या कोणाला अध्यक्षपद हवे आहे त्यांना ते मिळावे आणि मला आपले शांतपणे शिकवण्याचेच काम देऊन माझे काम सरळ व्हाइस चान्सलरच्याच अधीन असावे. मला धीरेन्द्र वर्मांकडून समजले होते की अलाहाबादमध्ये अशा प्रकारे एक नियुक्ती केली गेली आहे, बहुधा इतिहास विभागात. मला मनापासून असे वाटते की माझा संबंध फक्त विद्या, विद्वज्जन आणि विद्यार्थी यांच्याशी असावा आणि तो संबंधही मित्रत्वाचा संबंध रहावा. शत्रुत्वाचा नाही.

पैशाची गरज तर मला आहेच. त्याबद्दल तुम्हाला काय सांगू? कदाचित तुम्हाला सांगितल्याशिवायच उमजेल की जर पैशांशिवाय चालले असते तर मी पै-पैशाच्या, देण्या-घेण्याच्या चक्रात कधीच गुंतलो नसतो. पण दरिद्री माणसाचा सर्वात भयंकर शत्रू त्याचे पोट हा असतो. गरीब माणसाचा दुसरा शत्रू म्हणजे त्याच्या मानेवरचे त्याचे शिर! कारण मान तुकवून झुकायला ते राजी नसते... राजी झाले तर तेही शत्रूच असते!"[1]

अशा द्विधा मन:स्थितीतच द्विवेदींनी काशीला येण्याचा निर्णय घेतला आणि 1950 मध्ये ते काशीला आले. काशीमध्ये त्यांच्या विरोधकांनी त्यांना आडून आडून खूप त्रास दिला. इतका की शांतिनिकेतन सोडून इथे आल्याबद्दल त्यांना पश्चात्ताप होऊ लागला. वैयक्तिक स्वार्थापोटी केलेला तो विरोध अतिशय क्षुद्र पातळीचा असा होता. त्यामुळे द्विवेदींना त्रास जरूर झाला, पण ते मोडून गेले नाहीत. त्यांची साहित्य-साधना चालूच राहिली. 1950 मध्ये 'साहित्य का साथी'हे त्यांचे पुस्तक प्रकाशित झाले. त्याच वर्षी लखनौ विश्वविद्यालयात 'साहित्य का मर्म' या विषयावर त्यांनी तीन व्याख्याने दिली. 1952 मध्ये बिहार राष्ट्रभाषा परिषद, पाटणा येथे 'हिंदी साहित्य का आदिकाल' हा त्यांचा पाच व्याख्यानांचा विषय होता, व त्यांचा लेखसंग्रह 'हिंदी साहित्य का आदिकाल' याच नावाने प्रकाशित झाला. या काशीमधल्या वास्तव्याच्या काळातच 'हिंदी साहित्य', 'कल्पलता', 'विचार-प्रवाह' इत्यादी त्यांच्या साहित्यकृती प्रकाशित झाल्या. 1952 मध्ये त्यांनी 'काशी नागरी प्रचारिणी सभे'च्या

1. किता, पृ. 128

हस्तलिखितांचा शोध घेतला. 1954 मध्ये 'साहित्य-अकादेमी' द्वारा प्रकाशित झालेल्या 'नॅशनल बिब्लिओग्राफी'च्या निरीक्षणाचे काम त्यांनी केले. 1950 पासून 1953 पर्यंत ते 'विश्वभारती विश्वविद्यालया'च्या 'एक्झिक्युटिव्ह काऊन्सिल'चे सदस्य होते. 1952-53 मध्ये ते 'काशी नागरी प्रचारिणी सभे'चे अध्यक्ष होते. 1955 मध्ये अखिल भारतीय हिंदी परिषदेचे ते अध्यक्ष होते; तसेच त्याच वर्षी राजभाषा आयोगाचे मनोनीत सदस्य म्हणून राष्ट्रपतींच्या द्वारा त्यांची नेमणूक केली गेली. 1957 मध्ये त्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते 'पद्मभूषण' ही उपाधी देऊन सन्मानित करण्यात आले. आणि त्यांच्या नशिबाने पुन्हा उलटी उडी मारली. काशीमध्ये विरोधकांच्या, आतल्या आत धुमसत राहिलेल्या विरोधाने आता आपला राजकीय चमत्कार दाखवला आणि 1960 मध्ये द्विवेदींना काशी हिंदू विश्वविद्यालयामधून काढून टाकले गेले. त्यांना दुःख झाले. अपमानित वाटले. पण त्यांनी या विरोधात लढा नाही दिला. ते कोर्टात गेले नाहीत. सर्व काही त्यांनी फक्त सहन केले. काशी सोडल्यानंतर द्विवेदींनी 1960 पासून 1967पर्यंत पंजाब विश्वविद्यालय, चंडीगढ येथे हिंदी विभागाचे प्रोफेसर अध्यक्ष म्हणून काम केले. या काळात 'कुटज', 'कालिदास की लालित्य-योजना', 'चारुचंद्रलेख' या त्यांच्या सुविख्यात साहित्य-कृती प्रकाशित झाल्या. 'कुटज' व 'देवदारू' या शीर्षकांच्या निबंधांमध्ये द्विवेदींची तत्कालीन मनःस्थिती- काशी सोडल्यानंतरची मनःस्थिती-अत्यंत कलात्मकतेने व्यक्त झाली आहे. 'कुटज'या वनपुष्पाला ते 'ओसाडीचा सोबती' किंवा 'गर्तेतील सोबती' असे संबोधतात. ''शिवालिकाच्या या अनत्युच्च पर्वतराजीप्रमाणेच 'रामगिरी'वरदेखील त्या वेळी (त्यांना) दुसरे कोणतेही फूल मिळाले नसेल. त्यांच्या संतप्त हृदयाला कुटजाच्या फुलाने दिलासा दिला होता- हे फूल मोठे भाग्याचे! धन्य आहेस तू कुटजफुला...गर्तेतला सोबती आहेस तू.'' याच निबंधात ते पुढे म्हणतात :

''ही दुनिया तर अशी आहे की इथे अर्थ फक्त 'स्व-अर्था' पुरताच, स्वार्थापुरताच असतो. रस शोषून घेतला की सालपट आणि गुठळी फेकून दिली जाते. ऐकिवात आहे की रस शोषला गेल्यावर रहीमलादेखील फेकून दिले गेले होते. एका बादशहाने आदरपूर्वक बोलावणे केले, दुसऱ्याने फेकून दिले.'' या निबंधाचा शेवट करताना द्विवेदी लिहितात :

''सुख आणि दुःख तर मनाचे पर्याय आहेत. ज्याचा मनावर ताबा आहे तो सुखी. ज्याचे मन परवशतेच्या पाशात गुंतले आहे तो दुःखी. परवशतेत गुंतण्याचा अर्थ खुशामत करणे, तोंड वेंगाडणे, हां-जी हां-जी वगैरे. ज्याचे मन स्वतःच्या ताब्यात नाही तोच दुसऱ्याच्या मनाशी कपटाचा खेळ खेळणार, स्वतःचे बिंग बाहेर पडू नये म्हणून खोटे कुभांड रचणार, दुसऱ्याला कपटाने फसवण्यासाठी जाळे पसरणार! आणि कुटज असल्या सगळ्या खोटेपणापासून मुक्त आहे.''

'देवदारू' या शीर्षकाच्या निबंधात द्विवेदी लिहितात : ''ह्या देशातले लोक पिढ्यान् पिढ्या माणसाची फक्त 'जात' बघत आले आहेत. व्यक्तित्व ध्यानात घेण्याची त्यांना ना सवय आहे ना पारख. संत लोक कंठशोष होईपर्यंत सांगून थकले



की 'मोल तलवारीचे करा-पडून राहू द्या म्यान'... पण तलवारी बंदिस्तच राहाल्या आहेत आणि बाजारात उठाठेव चालली आहे ती म्यानांच्याच किंमतीची. व्यक्तित्वाला इथे विचारतो कोण?''

या निबंधाचा शेवट करताना ते म्हणतात, ''काळ बदलतो आहे. अनेक वृक्ष आणि वेलींनी वातावरणाशी तडजोड केली आहे. कित्येकांनी खाली उतरून मैदानात वस्ती केली आहे. पण एक देवदार मात्र खाली उतरला नाही की त्याने तडजोडीचा मार्ग स्वीकारला नाही. आपली खानदानी चाल त्याने सोडली नाही.''

ज्या परिस्थितीमध्ये द्विवेदींनी नाइलाजानेच काशी सोडली ती परिस्थती आणि द्विवेदींचे व्यक्तित्व यांची जवळून जाण असणाऱ्याला सहज समजेल की वरील शब्दांमधून ते स्वतःच्या दुःखालाच वाचा फोडत होते. स्वतःच्या मनाची समजूत घालत होते.

1967 च्या ऑक्टोबर महिन्यात द्विवेदी पुन्हा काशी हिंदू विश्वविद्यालयात हिंदी विभागाचे अध्यक्ष म्हणून परतून आले. मार्च 1968 मध्ये विश्वविद्यालयाचे रेक्टर म्हणून त्यांची नियुक्ती झाली. सुमारे दोन वर्षे त्यांनी ते पद सांभाळले. 25 फेब्रुवारी 1970 रोजी रेक्टर पदातून ते मुक्त झाले. यानंतर काही दिवस 'हिंदी का ऐतिहासिक व्याकरण' या प्रकल्पाचे निर्देशक म्हणून त्यांनी काम पाहिले. काही महिन्यांतच उत्तर प्रदेशाच्या 'हिंदी ग्रंथ अकादेमी'चे ते अध्यक्ष झाले आणि पुढे 'हिंदी संस्थाना' च्या पुनर्संघटनेनंतर, (पुनर्रचनेनंतर) त्यांनी या संघटित संस्थानाच्या उपाध्यपदाचा भार स्वीकारला.

या दरम्यान त्यांच्या दोन कादंबऱ्या- 'पुनर्नवा' (1973) आणि 'अनामदास का पोथा' प्रकाशित झाल्या. 1979 च्या सुरुवातीला द्विवेदींना गंभीर स्वरूपाचा आजार झाला. अधिक चिकित्सेसाठी त्यांना दिल्लीच्या 'अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान' येथे नेण्यात आले, आणि तेथेच 18 मे 1979 रोजी त्यांच्यामधला 'अंतःस्थ ईश्वर' 'महाकाला'त विलीन झाला.

द्विवेदींनी व्योमकेश शास्त्री या नावानेही काही रचना केल्या आहेत. 'बाणभट्ट की आत्मकथा' आणि 'चारुचंद्रलेख' ह्या कादंबऱ्यांमध्ये या नावाचा उपयोग केला गेला आहे. द्विवेदींनी व्योमकेश शास्त्री या नावाने 'पुनर्नवा' या त्यांच्या स्वतःच्याच कादंबरीवर एक उत्कृष्ट पत्र लिहिले आहे. हे पत्र 2-4-1975 रोजी त्यांनी श्री. भीष्म साहनींच्या नावे धाडले होते. 'पुनर्नवा' कादंबरीची खुद्द लेखकाच्याच दृष्टिकोनातून लिहिलेली ही एक प्रामाणिक समीक्षा आहे असे म्हणता येईल. 'आलोक-पर्व'मध्ये द्विवेदींनी 'व्योमकेश शास्त्री ऊर्फ हजारीप्रसाद द्विवेदी' या शीर्षकाचा लेख लिहून आपल्या या टोपणनावाबद्दलचा किस्सा सांगितला आहे.[1] महामना मालवीय यांच्या 'सनातन धर्म' नावाच्या पत्रिकेत द्विवेदींनी प्रथमच या टोपणनावाने आपले ज्योतिष-गुरु पं. रामयत्न ओझा यांना विरोध करणारा प्रत्युत्तरवजा एक लेख ज्योतिषावर लिहिला होता. तेव्हापासून ते टोपणनाव त्यांना चिकटले. पुढे वेळोवेळी स्वतःची

1. हजारीप्रसाद द्विवेदी ग्रंथावली, खंड 9, पृ. 114

ओळख गुप्त ठेवण्यासाठी त्यांनी या टोपणनावाचा वापरही केला.

उंचापुरा, धट्टाकट्टा देह, विशाल भालप्रदेश, रुंद खांदे असे व्यक्तिमत्त्व, कुडता व खादीचेच धोतर आणि दोन्ही खांद्यांवरून घेतलेली- लोंबणारी चादर असा पोषाख, मुखात पान आणि मुद्रा प्रसन्न. चेहऱ्यावर कधी किंचित स्मित उमटलेले तर कधी मोठ्याने हसतीलही. कधी चिंतनमग्न, गंभीर असेही. द्विवेदींचे बाह्य व्यक्तिमत्त्व हे असे होते. अंतर्बाह्य उदार. द्विवेदी त्यांचा आवडता कवी कबीर याच्या व्यक्तित्वाची खूप प्रशंसा करताना दिसतात. इतकी की त्यांच्या मते हिंदीच्या हजार वर्षांच्या इतिहासात कबीरासारखे व्यक्तित्व लाभलेला दुसरा कोणीही लेखक झालेला नाही. द्विवेदी स्वत:देखील प्रभावी व्यक्तिमत्त्व लाभलेले लेखक होते. कबीर जर वाणीचे 'डिक्टेटर' होते; तर... शब्दप्रभुत्व, व लेखनशक्ती किंवा भाषेवरील हुकमत या बाबतीत द्विवेदीसुद्धा अतुलनीय सामर्थ्याचे लेखक होते. अनेक साहित्यकृतींमध्ये कितीदा तरी त्यांनी लिहिले आहे की माणसामध्ये बंधनमुक्तीसाठी तडफडणारी एक व्याकुळता असते आणि अगदी जन्मवेळेपासूनच माणूस जडत्वावर मात करण्यासाठी, बंधमुक्त होण्यासाठी धडपडत असतो. द्विवेदींना ज्यांनी भाषण देताना प्रत्यक्ष ऐकले असेल त्यांना खुद्द द्विवेदींच्या व्यक्तित्वामधली ही तडफड निश्चित दिसली असेल. त्यांचे व्याख्यान यामुळेच अगदी सावकाशपणे गती घेई व हळूहळू प्रवाही होई. आणि मग तर आवेगाचा असा एक स्रोत उफाळून यायचा- जणू हिमालयाला धडका देत उसळत वाहणारी स्रोतस्विनी! असे वाटे की जणू एकादा पक्षी अंतराळात उडून जाऊ पाहतो आहे! ते वारंवार आपल्या दोन्ही हातांची घडी घालत, पुन्हा आकाशाच्या दिशेने हात उंचावत. ही अस्वस्थता नि तळमळ हा द्विवेदींच्या व्यक्तित्वाचा स्थायीभाव आहे. असे वाटे, त्यांना जणू काही काहीतरी अधिक बोलायचे आहे. शब्दांच्या आधारे ते आणखी काही व्यक्त करण्यासाठी धडपडत आहेत. हेच 'चित्'चे स्फुरण आहे, ऊर्ध्व दिशेला गतिशील... अशा चित् ने जडत्वाला दिलेले आव्हान! द्विवेदी आपल्या साहित्यकृतींमधून याला पुन्हा पुन्हा अधोरेखित करतात.

द्विवेदींनी आपल्या संपूर्ण लेखनात 'फक्कडाना मस्ती' म्हणजे 'कलंदरपणा'च्या गुणाची वारंवार चर्चा केली आहे आणि त्याला खूप महत्त्वही दिले आहे. त्यांचा कबीर एक नखशिखान्त 'मस्त मौला' आहे. त्यांचा बाणभट्ट एक भटक्या, मस्त जीव आहे. त्यांचा सीदी मौला हाही एक मस्त कलंदर व्यक्ती आहे. त्यांच्या कादंबऱ्यांमधल्या सगळ्या वैशिष्ट्यपूर्ण पात्रांचा हा एक समान गुण आहे. ही भटक्याची मस्ती, कलंदरवृत्ती ही द्विवेदींसाठी जणू एक कसोटी आहे व त्या परिमाणाच्या, मापदंडाच्या आधारे जणू ते आपल्या पात्रांना पारखून घेत असतात. इतकेच नव्हे तर, त्यांचे वृक्ष, पाने-फुले यांच्यातही ही भटक्याची मस्ती आहे. मग तो वृक्ष अशोकाचा, कुटजाचा किंवा देवदाराचाही असो. ही कलंदरवृत्ती हे स्वत: द्विवेदींच्या व्यक्तित्वाचेही एक वैशिष्ट्य आहे.... या वैशिष्ट्याची, 'गुणा'ची मुळे कोठे असावीत? याचे विश्लेषण द्विवेदींनी 'मेरी जन्मभूमी' या शीर्षकाच्या निबंधात असे केले आहे :

''वाङ्मयविषयक चर्चा करण्यासाठी ज्या गावात मी बसलो आहे ते ओझवलिया नावाचे हे गाव म्हणजे माझी जन्मभूमी आहे. या गावाचाच एक विभाग 'आरत दुबेका छपरा' म्हणून ओळखला जातो. वस्तुत: हेच माझे जन्मस्थान; पण ते नेहमीच ह्या गावाचा एक लहान विभाग राह्यले आहे. 'आरत दुबे' हे माझेच पूर्वज होते आणि त्यांनीच हा लहानसा विभाग वसवला. पण वस्ती करण्यापूर्वी थोडीशी जमीन बलिया गावाचे जे मालक त्या ओझा लोकांनी त्यांना महसूलमाफीपोटी दिली होती. आता दोन्ही विभाग एकत्रच झाले आहेत. ह्या भागात गावाच्या नावाबरोबरच दोन शब्द जोडले गेलेले दिसतात- 'अवली' पल्ली (म्हणजे लहान गाव) आणि 'छपरा'. 'छपरा' शब्दाची परंपरा पूर्वेकडच्या छपरा शहरापर्यंत जाऊन भिडते आणि अवली गावाची परंपरा पश्चिमेकडे 'बलिया' पर्यंत येते. माझ्या गावाचा योग असा की ते छपरा आणि अवली यांचा संयोग आहे. ह्या दोन शब्दांमधून इथल्या या भूप्रदेशाचा चिरंतन इतिहास अगदी स्पष्ट रूपात माझ्यासमोर उलगडला जातो. वास्तविक, बलिया आणि छपरा गावांच्या मध्यवर्ती भूप्रदेशाला गंगा व शरयूसारख्या दोन महानद्यांचा कोप सारखाच सहन करावा लागला आहे. बहुतांश गावे खरोखरच छपरांवर वसवलेली आहेत, कारण दरवर्षी गंगेला येणाऱ्या महापुरामध्ये ती वाहून जाण्याच्या भीतीची टांगती तलवार डोक्यावर असते. या पुराच्या भीतीमुळेच काही काही गावे बहुधा एकाच जागी झुंड, गर्दी करून वसवावी लागतात. या गावांच्या 'अवली'. तर अशा प्रकारे या भूप्रदेशाचा इतिहासच अविरतपणे बनण्या-उध्वस्त होण्याचा आहे. या कारणामुळे इथल्या लोकांमध्ये एक प्रकारची बेफिकीर 'पर्वाच नको'वृत्ती तयार होत गेली आहे. एक तऱ्हेची विलक्षण मस्ती आणि निडर भाव इथल्या लोकांच्या चेहऱ्यावर दिसतो. आपत्तींच्या थपडांनी हे चेहरे सहजासहजी कोमेजून जात नाहीत. बिकट अडचणींमधूनदेखील मार्ग शोधून काढणे इथल्या लोकांच्या अंगवळणी पडले आहे.''[1]



एक ज्योतिष-शास्त्री, एक व्याकरण-पटू इतका उमदा असू शकतो याचे दुर्मिळ उदाहरण म्हणजे द्विवेदी आहेत. त्यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत सहृदय, तरल, संवेदनक्षम, उत्स्फूर्त विडंबन- विनोदाचे वावडे नसलेले असे होते. स्वत:लाच विनोदाचा विषय बनवणाऱ्या आधुनिक लेखकांमध्ये ते अग्रस्थानी आहेत. स्वत:ला हास्यविषय बनवून, आपलीच चेष्टामस्करी करून त्यातून ते आपली खोलवरची मनोवेदना मोठ्या सूचकतेने व्यक्त करतात. या दृष्टीने 'अनामदास का पोथा' या कादंबरीची 'भूमिका' पहाण्यासारखी आहे. तेथे 'नाव' या गोष्टीबद्दल द्विवेदी जे दीर्घ तर्कवितर्क, विडंबन, विनोद, आणि आत्मविडंबन करतात त्यात 'नावा'ची व्यर्थता आणि त्याबद्दलचा द्विवेदींचा उद्वेग ध्वनित होतात. एकीकडे नाव कमावण्यासाठी तोंड वेंगाडणाऱ्यांचे हे विडंबन आहे; तसे दुसरीकडे आत्मटीका, स्व-समीक्षा आणि त्याबरोबरच एक खोलवरचा विषाद देखील. द्विवेदींनी लिहिले आहे :

''थोडे सिंहावलोकन करून मागे वळून पाह्यला जातो तर- विराट रिक्तता! एकं प्रचंड पोकळी! मी जे काही करत आलो त्याचे खरोखर काय मोल होते? आपल्या

1. दे. **'अशोक के फूल'** संग्रह.

मर्यादा, त्रुटी, क्षुद्रता सारे झाकून, लपवून स्वत:ला असे काही सादर करायचे की (पाहा-) मी कोणीतरी आहे!... हेच तर केले! लहान-सहान गोष्टींसाठी झगडलो, त्यालाच मर्दुमकी समजलो- पोट जाळण्यासाठीच तर केल्या खटपटी- त्याला कर्म, कर्तव्य मानले- खोट्या प्रशंसेच्या आशेने सोंगेढोंगे केली- अन् या सगळ्याला साफल्य मानले... एखाद्या महान ध्येयासाठी समर्पित होणे जमले नाही. कोणाचे दु:ख कष्ट दूर करण्यासाठी आपण ओंजळभर पाणीही नाही देऊ शकलो. सारे आयुष्य नुसता देखावा, नाटक, केवळ कोरडा अभिनय, आणि फक्त गळे काढण्यात व्यतीत झाले. माझ्यासारख्याच एखाद्याला बघून तुलसीदासाने म्हटले असावे- ''कोउ भल कहउ, देउ कछु, असि वासना न मन तैं जाई।''

या ग्रंथाच्या भूमिकेतच ज्योतिष-शास्त्री असूनही द्विवेदी ज्योतिषावरच एक प्रश्नचिन्ह काढून ठेवतात. एके ठिकाणी 28-10-48 रोजी श्री. 'सुमन' यांच्या नावे धाडलेल्या पत्रात द्विवेदींनी लिहिले आहे :

''मी कधीच चांगला आस्तिक नव्हतो व नाही. पण मी वाईट नास्तिकही नाही. वाईट आस्तिक दंभी असतो आणि वाईट नास्तिकाला अहंकार फार. सुमनजी, मी मात्र एक विलक्षण मिश्रणच आहे. मी दंभी असेन थोडासा, पण फारसा अहंकारी नाही. कधीकधी मनात येते की अहंकारी असतो तरी बरे होते. अहंकारी बरा. दंभी नव्हे.''[1]

द्विवेदींच्या दोन निबंधांची चर्चा करणे इथे या आत्म-विश्लेषणाच्या प्रसंगाच्या संदर्भात समयोचित व समर्पक ठरेल. त्यांच्या मृत्यूच्या सुमारे एक वर्ष आधी लिहिलेले हे निबंध आहेत. एक निबंध फेब्रुवारी 1978 मधला आहे. त्याचे शीर्षक आहे 'जिन्दगी और मौत के दस्तावेज़' या निबंधात द्विवेदी लिहितात :

''माझ्या या छोट्याशा जीवनात कितीतरी वेळा मला जाणीव झाली की आपण दोन-चार वर्षांपुढलेदेखील भविष्य जाणू शकत नाही. दीर्घ काळाच्या भावी योजना ही तर केवळ वल्गनाच झाली. अनेकदा केवळ भ्रम होतो की मी काही करू शकतो, योजना बनवू शकतो, त्या कार्यान्वित करू शकतो आणि त्यांचे साफल्यही प्रत्यक्ष अनुभवू शकतो. पण खरे तर असे होत नसते. मला सतत असे अनुभवाला येते की योजना बनवणारा कोणी दुसराच आहे. भविष्याला रूप देण्याची शक्ती अन्य ठिकाणीच आहे. माणसामध्ये जी इच्छाशक्ती आहे ती थोड्या प्रमाणात, फारच थोड्या प्रमाणात स्वतंत्र आहे. अंतिमत: त्या कुणा इतिहास विधात्याची योजनाच सफल होते.''

याच निबंधात पुढे द्विवेदी म्हणतात :

''सर्व काही पाहिले-ऐकले आणि आता असेच वाटते की मी स्वत: होऊन तर काहीच करत नाहीये, कोणी माझ्याकडून करवितो आहे. माझ्या योजना सगळ्या तशाच बाजूला पडतात आणि त्या अज्ञात उपदेशक शक्तीच्या इशाऱ्यानुसार मी चालत राहतो.. दु:ख करणे व्यर्थच आहे. बहुधा दु:ख करण्यासाठीही मी पुरेसा स्वतंत्र नाही. म्हणून मी पुन्हा पुन्हा म्हणत असतो की मी एक शूद्र जातीचा ब्राह्मण

1. पत्र: हजारीप्रसाद द्विवेदी: (सं.) मुकुंद द्विवेदी, पृ. 125



आहे! जो माणूस लिहू-वाचू शकतो, तो कर्माने ब्राह्मण असतो खरा, पण ब्राह्मणांचे देखील चार प्रकार असतात. एक स्वत:च्या योजनेनुसार जे लिहू-वाचू शकतात असे. यांना मी 'ब्राह्मण ब्राह्मण' म्हणतो. दुसरे जे 'युद्धं देहि' अशा बाण्याने आपली लेखणी सतत परजलेली ठेवून असतात ते. त्यांना मी 'क्षत्रिय ब्राह्मण' म्हणतो. तिसऱ्या प्रकारातले लेखक जे आपली लेखणी तराजू वापरावा अशा तऱ्हेने तोलून-मापून अर्थार्जनाकडे लक्ष ठेवून वापरतात असे. ह्यांना मी 'वैश्य ब्राह्मण' म्हणतो. आणि चौथा प्रकार अशांचा की जे कोणा दुसऱ्याच शक्तीच्या इशाऱ्यापुढे नमून आपल्या लेखणीने खर्डेघाशी करतात! अशा कपाळकरंट्यांना मी 'शूद्र ब्राह्मण' म्हणेन. मी ह्याच कोटीतला आहे!''[1]

दुसरा निबंध जानेवारी 1978 मधला आहे. 'भीष्म को क्षमा नही किया गया' या शीर्षकाचा. या निबंधाच्या अखेरीस द्विवेदी लिहितात :

''भीष्म आणि द्रोणसुद्धा द्रौपदीची मानहानी होत असलेली प्रत्यक्ष पाहूनसुद्धा गप्प का राहिले?....द्रोण एक पोरे-बाळे असलेले दरिद्री शिक्षक होते. गाय पाळणेही शक्य होऊ नये इतके दरिद्री. त्यांच्या पत्नीला आपल्या दूध मागणाऱ्या मुलाला पीठ-पाणी मिसळून देऊन फसवून गप्प करावे लागले होते. अशा अवस्थेत फिरून पडण्याचे धाडस करणे फार थोड्यांना जमते. परंतु भीष्म तर पितामह-वडिलधारे होते. पोरा-बाळांची चिंताही त्यांना नव्हती. मग त्यांना कसली चिंता होती?... एक सत्य सहज समोर येते की कर्तव्य-अकर्तव्याच्या बाबतीतले निर्णय घेणे भीष्मांना कधी जमले नाही, त्यात कुठेतरी ते कमी पडत होते. योग्य वेळी योग्य निर्णय ते घेऊ शकत नव्हते. जरी ज्ञानात कुठेही कमतरता नव्हती तरी कोणतीही निर्णयक्षमता त्यांच्यात नव्हती. त्यांना अवतारपुरुष मानले गेले नाही हे ठीकच झाले... आजच्या काळातदेखील असे विद्वान कित्येक दिसतील. ज्ञानी, पण निष्क्रिय, क्रियाशून्य. कृतिशील माणूस इतिहास घडवतो. फक्त विचारच करत बसणारा मात्र इतिहासाच्या भयंकर, अमानुष रथचक्राखाली भरडून निघतो. जो माणूस विचार करतो व त्यानुसार कृतीही, तोच इतिहासाचा रथ हाकू शकतो''[2]

द्विवेदी शूद्र ब्राह्मण नव्हते. ते तर शुद्ध 'ब्राह्मण ब्राह्मण' होते. ते 'भीष्म' देखील नव्हते. बालपणी त्यांची आर्थिक परिस्थिती द्रोणासारखी होती हे खरे; पण वरील अवतरणांवरून हे स्पष्ट दिसते की स्वत:कडे पाहण्याची त्यांची दृष्टी आत्ममुग्धतेची नव्हती, उलट आत्मपरीक्षणाची, आत्मटीकेची होती. दुसऱ्याच्या दृष्टिकोनातून स्वत:ला पारखू शकण्याची आणि स्वत:लाही नजरकैदेत ठेवून पाहण्याची तटस्थता आणि निर्भयता, हिम्मत त्यांच्यात होती. द्विवेदींचे हे सखोल आत्ममंथन आणि कठोर, निर्मम आत्मविश्लेषण त्यांना मध्यकालीन संत-भक्त कवींच्या कोटीत नेऊन ठेवते. ते स्वत:ला गौरवान्वित करीत नाहीत किंवा आत्मछल देखील करत नाहीत. फक्त 'स्व'चे सत्य रूप जाणून घेण्याचा व ते जसे आहे तसेच आविष्कृत करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. हजारीप्रसाद द्विवेदींचे जीवन-चरित्र आणि त्यांचे व्यक्तित्व यांची

1. हजारीप्रसाद ग्रंथावली, खंड 9, पृ. 112-114
2. हजारीप्रसाद ग्रंथावली, खंड 9, पृ. 251

त्यांच्याच शब्दांतून झालेली ही ओळख.

त्यांच्या 'सहज-साधना' पुस्तकातील निबंधाचा शेवट करताना ते लिहितात :

''या साधना (आध्यात्मिक) वगैरे अतिशय उत्कृष्ट असू शकतात. भावविव्हल अवस्थेत एखाद्याला परम पुरुषाच्या चिन्मय आणि प्रेममय अशा रूपाचे दर्शन होणे व त्यामुळे विशुद्ध आनंदाचा प्रत्यय येणे हेही होऊ शकते. परंतु याचा समाजाला काय उपयोग होतो? अशी साधना ज्या आधारे उभी असते ते तत्त्वज्ञान आपल्या समाजाच्या सामूहिक उत्थानासाठी कितपत उपयुक्त असते? काही लोक सद्गदित भावुकतेने उद्गारतात की, ''वा! भारतवर्षाची साधना किती विपुल आणि विराट!'' ....चार-दोन व्यक्ती साधनेने परम पदाला पोचल्या, यात विशेष असे काय झाले? जगासमोरचे प्रश्न काही त्यामुळे सुटणार नाहीत. आजदेखील हजारोंनी माणसे उपाशीपोटी आहेत. आजही दु:ख, रोगराई, अज्ञान आणि कुसंस्काराचा अंधकार यांच्या झंझावातात कोटी-कोटी जनता भरकटते आहे. या जनतेच्या उद्धारासाठी खूप मोठ्या प्रमाणावर कल्याणकारक कार्य करण्यासाठी आज भौतिक विज्ञान आपल्या सेवेला हजर आहे. या विज्ञानाचे आणि या आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचे सांधे जुळू शकतात? व्यष्टी-समष्टीच्या एकत्वाचे वा पिंड ब्रह्माण्डांच्या अद्वैताचे ज्ञान मिरवणाऱ्यांची वाक्-साधना व देह-साधना ह्या काय देशातल्या समस्त जनतेला अन्न, वस्त्र देऊ शकणार आहेत?...की त्या उन्मादी मधुरभावी साधकांच्या तोंडचे प्रेमरसाने थबथबलेले 'शाब्दिक मलम' युगानुयुगांचे दारिद्र्य नि कुशिक्षण यामुळे खोलवर गेलेले घाव बुजवू शकणार आहे?... 'भूखे भजन न होहिं गोपाला' हे वचन खरे नाही काय? माझे असे मत आहे की आज आपला मुख्य प्रश्न कोट्यवधी लोकांच्या प्राथमिक गरजा पुऱ्या करणे हा आहे. तिकडे तर आपण दुर्लक्ष करता कामा नयेच; शिवाय आपल्याला हेही ध्यानात ठेवले पाहिजे की भौतिक विज्ञानानेच या समस्यांवर मात करण्यासाठी आपल्या हातात महत्त्वपूर्ण अशी साधने दिली आहेत. एकेका व्यक्तीच्या समस्या सोडवणे आज पुरेसे नाही. अखिल मानवी समाजासमोर असलेल्या समस्या याच आज समाजचिंतन करणाऱ्यांना जास्त व्याकुळ अन् चिंताक्रांत बनवत आहेत. म्हणून जर आपल्याला समाजाच्या या प्राथमिक गरजासुद्धा पुऱ्या करता येत नसतील तर अशा साधना, मग त्या कितीही महान असोत, निरर्थक म्हणाव्या लागतील.''

द्विवेदींनी वर उभे केलेले हे प्रश्न प्रस्तुत प्रसंगाच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचे आहेत. या प्रश्नांवरून लक्षात येते की आपल्या काळाबद्दल व प्रश्नांबद्दल द्विवेदी किती जागरूक होते. आपल्या साऱ्या प्राचीन व संचित ज्ञानाला आजच्या प्रश्नांच्या, समस्यांच्या संदर्भात पारखून घेत होते.[1] युगाच्या समस्या कोणत्या या संदर्भात त्यांचे सारे लेखन अत्यंत जिवंत, ताजे, जागरूक लेखन आहे. 'शवसाधना' या गोष्टीच्या रहस्याची उकल करताना ते लिहितात :

''प्रेताच्या पाठीवर मंत्र-तंत्रांनी पाहिजे तितकी साधना करा; पण जोवर प्रेत

1. हजारीप्रसाद ग्रंथावली-5, पृ. 199



साधकाच्या दिशेने तोंड वळवत नाही, तोवर साधक सिद्धीप्राप्तीच्या जवळ पोचलेला नाही असेच समजायला हवे; शव अजूनही शवच आहे. त्यात प्राणशक्तीचा संचार झालेला नाही. जेव्हा प्रेत साधकाकडे तोंड वळवून त्याच्याशी जिवंत व्यक्तीसारखे संभाषण करते तेव्हाच 'शवसाधना' पूर्ण होते. प्राचीन ज्ञानाच्या साधकाने ही गोष्ट ध्यानात ठेवायची असते.''

द्विवेदी प्राचीन ज्ञानाचे साधक होते हे सांगायला नको आणि ह्या गोष्टींकडे त्यांचे लक्ष कायमच असे. त्यांच्या कादंबऱ्यांबद्दल लिहिताना पुढे स्पष्ट केले गेले आहे की त्यांच्या सर्व कादंबऱ्या भूतकाळाबद्दल आहेत. त्यांची विषयवस्तू भूतकाळातली आहे. व तरीही त्यामधून द्विवेदींनी एक अद्भुत समयोचितता निर्माण केली आहे; तसेच त्या त्या विषयाला पुनर्नवता प्रदान केली आहे. त्यांनी एके ठिकाणी म्हटले आहे की आपल्या मेलेल्या पिल्लाला छातीशी कवटाळून ठेवणारी माकडीण कधी माणसाचा आदर्श होऊ शकत नाही. आपल्या संपूर्ण लेखनाबाबत त्यांनी हाच दृष्टिकोन ठेवला आहे. त्यांचा निबंधही कोणत्याही पर्वाबद्दल, ऋतुबद्दल, एखाद्या फुलाबद्दल किंवा स्वत:बद्दलच्या विषय, घटनाप्रसंग याबद्दल असो- त्यावर लिहितानाही ते आजच्या काळाचा, आधुनिक समस्यांचा ऊहापोह करू लागताना दिसतात.

द्विवेदींनी 1927च्या सुमारास लेखनाला प्रारंभ केला होता आणि 1979 पर्यंत- आपल्या जीवनाच्या अखेरपर्यंत- ते साहित्य- निर्मितीच्या आणि समीक्षेच्या क्षेत्रात कार्यरत राहिले. द्विवेदींचा कालखंड हा असा स्वातंत्र्यप्राप्तीपूर्व ते स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही सुमारे अर्ध्या शतकभराचा एक प्रदीर्घ कालखंड आहे. त्यांच्या साहित्यसेवेतील प्रारंभीची काही वर्षे देशाच्या स्वातंत्र्यासाठीच्या संघर्षाशी निगडित आहेत. त्या काळातली प्रमुख समस्या देशाचे स्वातंत्र्य मिळवणे ही होती. द्विवेदींच्या संपूर्ण लेखनामध्ये व चिंतनामध्ये या स्वातंत्र्योर्मीचे चैतन्य अंतर्भूत आहे. ते वारंवार 'स्वाधीनते'बद्दल, 'स्व-भावा'बद्दल चर्चा करताना दिसतात. पुढील प्रकरणांमध्ये विभिन्न प्रसंगांमधून स्पष्ट केले गेले आहे की द्विवेदींची प्रेरणा मूलत: विद्रोही प्रेरणा आहे. कबीर, सूरदास वगैरे प्रमुख संत-कवींमध्ये आणि या संतांची भक्ती-काव्ये यांच्या मुळाशी हीच विद्रोहाची चेतना वसत असल्याचे त्यांनी दाखवले आहे. मानवजातीचा आजपर्यंतचा सारा विकास त्यांच्या मते माणसामधला असंतोष आणि विद्रोह याचाच परिपाक आहे. माणसाने प्रथमपासूनच आपल्या भोवतालच्या वातावरणाविरुद्ध क्रांती केली आहे. त्यांच्या दृष्टीने साहित्याची निर्मिती हीदेखील माणसाच्या विद्रोहाचीच परिणती आहे. आपली अस्वस्थता, बेचैनी आणि दुर्दम्य जीवनेच्छा यांची अभिव्यक्ती करण्यासाठी झालेली. द्विवेदींचे युग विद्रोहाचेच युग होते. त्यांनी लेखनातून निर्माण केलेली महत्त्वाची व्यक्तिचित्रणे घ्या किंवा त्यांनी ज्या महत्त्वाच्या व्यक्तींबद्दल लिहिले त्यांची उदाहरणे घ्या- ती सर्व विद्रोही चरित्रे आहेत. द्विवेदी त्यांना सरळ-सरळ विद्रोही म्हणत नाहीत. तर, ते त्यांच्यासाठी 'भटक्या', 'कलंदर', 'मस्त' अशी विशेषणे वापरतात. श्री. नामवर सिंह यांनी याचे विश्लेषण करताना अत्यंत समर्पक विधान केले आहे, ते असे : ''वास्तविक विसाव्या शतकाच्या चौथ्या दशकात 'विद्रोह' हा कलंदरपणाचेच कोणते ना कोणते

रूप घेऊन साहित्यातून प्रकट झाला होता.[1] द्विवेदी आपल्या साऱ्या साहित्यातून या 'कलंदर मस्ती'चा वारंवार उच्चार करताना दिसतात.

द्विवेदींच्या काळात भारतातदेखील आधुनिक वैज्ञानिक संस्कृती वेगाने विकसित होत होती. साहित्यात प्रगतिशील आंदोलनाने जन्म घेतला होता. नव्या पिढीमध्ये एक प्रकारचा असंतोष व बंडखोरी ही स्पष्ट दिसू लागली होती. द्विवेदी 'जड विज्ञान' आणि 'यंत्र-विज्ञान' यांबद्दल चर्चा करतात. प्रगतिशील मानवतावादी दृष्टिकोन ते त्यांच्या मर्यादांसकट स्वीकारताना दिसतात; आणि जनतेच्या भावात्मक विद्रोहाला एका मोठ्या परिवर्तनाचा पूर्व-इशारा मानतात. ते रीतिवादी, कलावादी काव्याभिरुचीला कसून विरोध करतात आणि साहित्यासाठी लोकमंगल, लोककल्याण ही कसोटी वा मापदंड मानतात.

द्विवेदींचा कालखंड हा अनेक सामाजिक दुष्ट रूढींचा तसा पाखंडांचाही काळ आहे. जरा-जीर्ण अशी जाति-व्यवस्था आणि हिंदू-मुसलमान सांप्रदायिकता यांचा, तसाच नारी-शोषण, गरीबी, बेकारी यांचाही, आणि नंतर भ्रष्ट राजकारणी आणि त्यांचे खुषमस्करे यांचाही आहे. आपल्या लेखनातून द्विवेदी या सर्वांचे बुरखे फाडून टाकतात. कबीराबद्दलचे त्यांचे चिंतन, कादंबऱ्या, निबंध.... सर्व ठिकाणी ते या परिस्थितीवर कठोर प्रहार करतात. कादंबरीलेखन करताना त्यांना जाणवलेले दिसते की भारताच्या 'धर्म-व्यवस्थे'ला जणू गळती लागली आहे. त्यात बरीच छिद्रे पडली आहेत. खोलवर कीड लागली आहे. इथल्या प्रत्येक जातीला क्षुद्र अहंकाराने ग्रासले आहे. प्रत्येक समुदाय आतून विदीर्ण झाला असून फुटिरतेच्या विचारांनी, भावनेने ग्रस्त आणि स्वार्थाने आंधळा झालेला.... आर्यावर्त नाशाच्या कड्यावर उभा आहे. हा देश रसातळाला जाणार आहे. स्त्रीला मांसाचा पिण्ड समजून पुरुष तिच्यावर एखाद्या भुकेल्या गिधाडाप्रमाणे तुटून पडतो आहे...

'चारुचंद्रलेख' कादंबरीत सीदी मौला म्हणतो :

''दिल्लीमध्ये गुलामांचे राज्य आहे. एकजात सगळे चहाडखोर, चारित्र्यशून्य, रानटी, क्रूर... सर्वनाश होईल या राजवटीचा! खूणगाठ बांधून ठेवा महाराज! ज्या राज्यात प्रत्येकाला फक्त स्वत:च्याच भल्याची चिंता आहे, कितीही मोठा माणूस असो– त्यालासुद्धा स्वत:च्या जिवाची नि पगडीचीच फिकीर आहे, जिथे प्रजेच्या सुखदु:खांचा वाली कोणीच नाही असली राजवट नाशाच्याच खाईवर उभी आहे. आणि ते कपाळकरंटे- दंडुक्याच्या जोरावर राजा व्हायचंय त्यांना!''

राष्ट्राची अस्मिता व संरक्षण याची जबाबदारी अशा निष्क्रिय व नालायक शासनकर्त्यांवर सोपवून जनतेने निमूटपणे केवळ बघ्याची भूमिका घेता कामा नये, अशी द्विवेदींची अपेक्षा होती. प्रजेच्या सामर्थ्यावर ते श्रद्धा ठेवतात. राज्यकारभारात आणि देशाची अस्मिता निर्माण करण्यात जनतेने आपली निश्चित भागीदारी करावी असे त्यांना वाटे. 'बाणभट्ट की आत्मकथा' मधली महामाया म्हणते:

''अमृत-पुत्रांनो, म्लेंच्छ वाहिनी येण्याची ही काही पहिली वेळ नाही, तशी अखेरची

1. दूसरी परंपरा की खोज, पृ.53



वेळ देखील नाही. आज जर तुम्ही तुवरमिलिंद आणि श्रीहर्षदेव यांच्या आशेवर हात बांधून बसून रहाल, तर आज ही आपत्ती टळेल कदाचित. पण उद्या नाही! तुवरमिलिंद आणि श्रीहर्षदेव काही कायमचे असणार नाहीत. पण तुम्हाला शाश्वत जीवन हवे तर... अमृत-पुत्रांनो, मला भविष्य दिसते आहे... राजे, महाराजे आणि सामन्त स्वार्थाचे गुलाम होत चालले आहेत... प्रजा भीरू, भेकड बनते आहे. विद्वज्जनांची, शीलवान नागरिकांची बुद्धी कुंठित होत चालली आहे. धर्माचरणात अडथळा निर्माण झाला आहे. कारण- राजा, प्रजा, विद्वान सगळेच्या सगळे आंधळे झाले आहेत. मोठे अशुभ लक्षण आहे हे... अमृत-पुत्रांनो, मी ऊर्ध्वबाहू होऊन कंठशोष करून सांगतेय की हे अशुभाचे लक्षण आहे. आता तुम्हीच वाचवा स्वत:ला, धर्माला धरून राहा.. न्यायासाठी मरायला शिका... ब्राह्मणापासून चांडाळापर्यंत सगळे एक व्हा- पहाडाप्रमाणे अभेद्य... वाचण्याचा उपाय जर कोणता असेल तर तो हा एकच आहे. अमृत-पुत्रांनो, त्या राजपुत्रांच्या भाडोत्री सैन्याची आशा सोडा. मृत्यूचे भय? ती तर माया आहे.''[1]

'चारुचंद्रलेख'मध्ये द्विवेदी म्हणतात:

''शस्त्रबळाने हरणे म्हणजे हार नव्हे. आत्मबळाने हरणे हाच वास्तविक पराजय आहे. मुली, सगळा देश जरी परदेशी लोकांनी पादाक्रांत केला तरी मला तिळमात्रसुद्धा चिंता वाटणार नाही, पण केव्हा?...जर जनतेमध्ये आत्मविश्वासाची ज्योत तेवती राहिली असेल नि त्यांच्यात आपल्या गौरवशाली इतिहासाची प्रेरणा जागृत राहिली असेल तरच.''[2]

द्विवेदी आपल्या साऱ्या लेखनाच्या द्वारे वाचकामध्ये आत्मबल आणि आत्मविश्वास जागा करू पाहत होते हे सांगायलाच नको. ते वाचकामध्ये आपल्या महान इतिहासाची प्रेरणा जिवंत ठेवू पाहत होते. आपल्या संपूर्ण लेखनातून त्यांनी पुन्हा पुन्हा जी संस्कृतीसंबंधी चिंता व्यक्त केली आहे ती त्यांच्या युगाची चिंता आहे.

1. बाणभट्ट की आत्मकथा, पृ.258
2. चारुचंद्रलेख, पृ. 88

# 2.

# निबंध

माणसामध्ये स्वत:ला अभिव्यक्त करण्याची प्रबळ इच्छा असते. साहित्य आणि कला ही माणसाच्या या आंतरिक इच्छेची क्रियात्मक रूपे आहेत. कलेमध्ये कलावंताचे व्यक्तित्वदेखील अवतरते. ललित निबंधामध्ये सर्वाधिक महत्त्व कोणत्या तत्त्वाला दिलेले असते तर ते निबंधकाराच्या व्यक्तित्वाला. ललित निबंधामध्ये ते अनिवार्य मानले जाते. 'निबंधा'चा जनक मान्तेन (1933-92) म्हणतो, ''मी तर स्वत:चेच चित्रण निबंधामधून करतो.'' त्याच्या दृष्टीने निबंध म्हणजे ''आत्म्याला इतरांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न.'' त्यातल्या लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या वैशिष्ट्यामुळे 'निबंधा'चे स्वरूप 'लेखा'पेक्षा वेगळे होते. लेखामध्ये (आर्टिकल) व्यक्तित्व अनिवार्य नसते. तेथे विषय आणि अभ्यास यांना प्राधान्य असते, तर याउलट निबंधामध्ये ('ऐसे') लेखकाच्या व्यक्तित्वाला. एका निबंधकाराने म्हटले आहे की निबंधात विषय, पाण्याच्या पृष्ठभागावर तरंगणाऱ्या काष्ठासारखा असतो; म्हणजे काष्ठाची गती आणि दिशा पाण्यावरील तरंगांनुसार ठरते. निबंधामध्येसुद्धा विषयाला गती आणि दिशा देण्याचे काम निबंधकाराचे व्यक्तिमत्त्व करत असते.

निबंधात यामुळेच खूप आत्मीयता असते जिच्यामुळे लेखक-वाचकामधले अंतर मिटून, बुजून जाते. निबंधकार वाचकाशी एखाद्या कुशल संवादकाप्रमाणे घरगुती गप्पागोष्टींच भासाव्यात असे संभाषण करू लागतो. निबंधाच्या घडणीसाठी बहुतेक वेळी परिचित गोष्टींचा आधार घेतला जातो. असे भासते की जणू लेखकाला कुठलाही विषयच मिळत नव्हता की काय! लेखक, वाचकाच्या विस्मृतीत गेलेल्या कहाण्या, किस्से वा पौराणिक कथा-प्रसंग यांचा हवाला देत जातो. मधे मधे विनोदाचा शिडकावा करतो, कधी परंपरांवर लेखणीने प्रहार करतो, त्यांना आव्हान देतो आणि अत्यंत गंभीर विषय देखील नितान्त सुंदर सहजतेने मांडून जातो. साहित्याच्या अन्य प्रकारांमध्ये लेखकाचे कथ्य काहीशा कलात्मक आवरणाच्या आडूनच व्यक्त होते, पण ललित निबंधातून ते एका सहज स्पष्ट प्रवाही रूपात समोर येते.

निबंधाची ही वैशिष्ट्ये अशी वर सांगितली आहेत आणि हिंदी भाषेपुरते बोलायचे तर त्यांचा उत्कर्ष हजारीप्रसाद द्विवेदींच्या निबंधांमध्ये झालेला दिसून येतो. त्यांनी हिंदीच्या निबंध ह्या साहित्य प्रकाराला एका उत्तुंग शिखरावर नेऊन ठेवले. त्यांच्या स्वच्छन्द व्यक्तिमत्त्वाला विहरण्यासाठी सर्वाधिक मुक्त मोकळे आकाश कोठे मिळत



असेल तर ते निबंधात. 'अशोक के फूल' 'विचार और वितर्क', 'कल्पलता', 'विचार प्रवाह', 'कुटज' हे द्विवेदींचे विख्यात निबंध-संग्रह आहेत. या संग्रहांमधील निबंधांचे विषय आहेत- हिंदी आणि संस्कृत साहित्य यासंबंधी, भारतीय संस्कृती, भाषा, शोध, शिक्षण, प्राचीन इतिहास, धर्म, दर्शने, तंत्र, ज्योतिष, निसर्ग असे विविध.

द्विवेदींनी लिहिलेल्या निबंधांपैकी संख्येने सर्वाधिक निबंध साहित्यविषयक निबंध आहेत. 'मनुष्य की सर्वोत्तम कृती-साहित्य', 'मनुष्य ही साहित्य का लक्ष्य है', 'साहित्य की साधना', 'साहित्य का प्रयोजन : लोककल्याण', 'साहित्य के नये मूल्य', 'आधुनिक साहित्य : नयी मान्यताएँ', 'साहित्य में मौलिकता का प्रश्न', 'साहित्य में व्यक्ति और समष्टी', 'साहित्य की संप्रेषणीयता', 'साहित्यकारों का दायित्व', 'आलोचना का स्वतंत्र मान', 'सावधानी की आवश्यकता', 'काव्य-कला', 'समीक्षा में सन्तुलन का प्रश्न', 'हिंदी उपन्यासों में यथार्थवाद का आतंक', 'कविता का भविष्य', 'चार हिंदी कवि', 'महिलाओंकी लिखी कहानियाँ', 'संस्कृत का साहित्य', 'संस्कृत की कवि प्रसिद्धियाँ', 'संस्कृत साहित्य में पक्षी वर्णन' इत्यादी निबंध अशाच प्रकारचे आहेत. अशाच अनेक निबंधांमधून द्विवेदींचे साहित्यासंबंधीचे विचार व्यक्त झाले आहेत. साहित्याचे स्वरूप व त्याचे प्रयोजन याबद्दल त्यांची स्वत:ची स्वतंत्र व निश्चित अशी मते आहेत. आपले विचार व दृष्टिकोन यानुसार ते विविध साहित्य प्रकारातील नमुन्यांचे व लेखक-कवींचे मूल्यमापन करतात. त्यांची चिंतनशील, तर्कशुद्ध आणि संशोधकाची वृत्ती या निबंधांमध्ये पाहायला मिळते. हे निबंध म्हणजे मेंदूतून बेबंदपणे घरंगळणारा कल्पनाविहार नव्हे. (A loose sally of the mind.)

द्विवेदींच्या मते 'अखिल मानव जातीला सुंदर बनवण्याच्या साधनेचेच नाव साहित्य आहे.' या छंद-साधनेचे परमोच्च लक्ष्य आहे मनुष्याला देव बनवणे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे माणसाची सर्वोत्तम कृती साहित्य आहे आणि मनुष्यपदाची ही त्याची लायकी व अधिकार टिकून राहण्यासाठीही साहित्य हाच एक आधार आहे. जे साहित्याचे सर्वोत्तम रूप समजू शकतात त्यांना मनुष्यतेचे सर्वोत्तम रूपदेखील समजू शकते.[1]

'मनुष्य ही साहित्य का लक्ष्य है' या निबंधात द्विवेदी म्हणतात : ''साहित्याकडे मानुषतेच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे असे मानणाऱ्यांच्या पक्षातला मी आहे. जे वाग्जाल माणसाला दुर्गती, हीनता व परवशता यांपासून वाचवू शकत नाही, जे त्याच्या आत्म्याला तेज प्राप्त करून देऊ शकत नाही, परदु:ख कातर आणि संवेदनक्षम बनवू शकत नाही त्या लेखनाला साहित्य म्हणावयासही मला संकोच वाटतो.''

याच निबंधात पुढे ते म्हणतात :

''वास्तविक आपल्या अभ्यासाची सामग्री प्रत्यक्ष मनुष्य आहे. इतिहासात तुम्ही याच 'माणसा'च्या विजययात्रेचा स्रोत असलेली कहाणी वाचता, वाङ्मयामधून माणसाच्याच आवेग, उद्वेग आणि उल्हासाच्या स्पंदनांची प्रचीती येते, राजकारणातून त्याच्याच लपाछपीच्या खेळाचे दर्शन होते, अर्थशास्त्र माणसाच्याच ताकदीचे शिक्षण देते. हा माणूस हेच (साहित्याचे) खरे लक्ष्य आहे.''

1. 'मनुष्य की सर्वोत्तम कृती : साहित्य' शीर्षक निबंध.

द्विवेदींच्या मते साहित्याचे प्रयोजन आहे लोककल्याण. लेखनाचे उद्दिष्ट, ध्येय समाजमानवाचे मंगल विधान हे आहे. केवळ कल्पनाविलासाची सामग्री म्हणजे साहित्य नव्हे. त्याचे लक्ष्य 'मनुष्यता', 'मानुषता' हे आहे.

''ज्या लेखनातून, ग्रंथातून या उद्दिष्टाची इच्छा दिसून येत नाही, माणसाचे अज्ञान, हीन संस्कार आणि अविवेक दूर व्हायला ज्याची काहीही मदत होत नाही; शोषण, अत्याचार यांच्याविरुद्ध लढण्याची ताकद ज्यातून जराही मिळण्याची शक्यता नाही, स्वार्थ; बळकाववृत्ती, खेचाखेच व हिंसा यांच्या दलदलीतून माणसाला जे जराही वर उचलू शकत नाही असे लेखन कोणत्याही अर्थाने कुचकामी होय.''[1]

द्विवेदींचा दृष्टिकोन मानवतावादी दृष्टिकोन आहे. त्यांच्या या दृष्टिकोनावर वाल्मीकी, व्यास, कालिदास, कबीर आणि रवीन्द्रनाथ यांचा खोल प्रभाव आहे. माणसाच्या महत्तेवर त्यांचा इतका विश्वास आहे की ते वारंवार पुरावे देऊन म्हणतात की मनुष्याहून मोठा दुसरा कोणीही नाही. त्यांच्याच शब्दांत वर्णन करायचे तर :

''कोण जाणे कोणत्या एका पुण्यक्षणी, एका अज्ञात काळाच्या अज्ञात मुहूर्तक्षणी आपला हा पृथ्वी नावाचा ग्रह सूर्यमंडळापासून तुटून अलग झाला होता... त्यावेळी फक्त ज्वलंत वायूंनी भरलेला एक गोळा होता.. पृथ्वीच्या या तुकड्यावरच्या कुठच्या कणात जीवतत्त्वाचे अस्तित्व जागे होते कोणालाच ठाऊक नाही... कोणास ठाऊक केव्हापासून त्या तप्त धातूंमध्ये दडलेले जीवतत्त्व अनुकूल संधीच्या प्रतीक्षेत होते... समस्त जड शक्तीच्या मस्तकावरच जणू पाय देऊन जेव्हा ते मृदू गवताच्या पात्याच्या रूपात अवतरले तेव्हा पृथ्वीच्या इतिहासामधली ती एक अघटित, अपूर्व अशी घटना घडली होती... जीवतत्त्वाची सततची ऊर्ध्वगामी वृत्ती आजपर्यंत समस्त जड तत्त्वांना पराजित करून या पृथ्वीतलावर विराजमान झाली आहे. एकाच पण जिवंत पेशीपासून अनेक पेशीय जीवांपर्यंत जीवतत्त्व विकसित होत गेले... सरळ साध्या पेशीसंघटनेच्या रूपापासून जटिल, गुंतागुंतीच्या पेशीसमूहांच्या रचना-रूपात. ज्यांना फक्त कर्मेंद्रियेच होती अशा प्राणिमात्रांपासून ते ज्यांची ज्ञानेंद्रियेही विकास पावली अशा प्राण्यांपर्यंत आणि शेवटी उत्क्रांत होता होता त्या जीवतत्त्वाने मनुष्यरूपात स्वतःला प्रकट केले! मनुष्य ही त्या जीवतत्त्वाची अंतिम परिणती आहे.''[2]

ज्या 'मनुष्या'बद्दल द्विवेदी वारंवार चर्चा करतात तो कोणी अमूर्त मनुष्य नाही तर या पृथ्वीवरील पशुसृष्टीतूनच उत्क्रांत होत गेलेला माणूस आहे. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर :

''माणसात जर विवेक जागृत होऊ शकला नाही, समता, उदारवृत्ती, संवेदनशीलता यांचा विकासच झाला नाही आणि आत्मसन्मानाबरोबरच दुसऱ्याचाही सन्मान होतो हे महान तत्त्व तो आत्मसात करू शकला नाही, समाधानी वृत्ती (संतोषवृत्ती) आनंद-भाव आणि श्रद्धाभाव त्याच्यात विकसित झाले नसतील तर असा मनुष्य 'पशू' पेक्षा फारसा वेगळा आहे असे म्हणता येणार नाही.''[3]

---

1. **साहित्य का प्रयोजन- 'लोककल्याण' शीर्षक निबंध.**
2. **विचारप्रवाह.**
3. **कल्पलता.**



द्विवेदींचा माणूस संकुचित सीमांनी बांधला– जखडला गेलेला माणूस नाही. आपल्या लेखनातून ते पुन्हापुन्हा जातिभेद, धर्मभेद, पूजा-उपासना इ. कर्मकांडे, स्पृश्यास्पृश्यता, आचार-विचार यांच्या संकुचितपणावर प्रहार करतात. या सर्वांमुळेच आपल्या देशाची सामूहिक मानसिकता अत्यंत गुंतागुंतीची आणि विचित्र बनली आहे असे त्यांना वाटते. 'मेरी जन्मभूमि' या शीर्षकाच्या निबंधात त्यांनी लिहिले आहे :

''मला स्पष्ट दिसते आहे की नाना जाती आणि समूहांमध्ये विभागलेला माणूस आकसून जातो आहे. त्याची कुठचीही श्रद्धा, विश्वास, रीती, नीती यांना शाश्वत रूप येऊ शकलेले नाही. त्याची ना पूजा मंदिरे एकसंध, विशुद्ध राहिली ना त्याचे देव सनातन व चिरंतन, चिरकालिक. माणूस कुठल्यातरी कठीण प्रवाहाच्या पार जाण्यासाठी प्रतिबद्ध झालेला आहे.

जाती आणि संप्रदाय यांच्यातूनच त्याची विजय-यात्रा एका अखंडित गतीने आगेकूच करत आहे. आपल्या इष्टप्राप्तीसाठी त्याने आजवर खूप वणवण केली आहे. अजूनही त्याची भटकंती चालूच आहे; पण सतत काही नवे शोधून काढण्याच्या आपल्या कार्यापासून तो कधी विचलित झालेला नाही. या अर्ध-विस्मृत झालेल्या नृत्य, संगीताच्या परंपरा म्हणजे सतत नव्याचे ग्रहण करणाऱ्या त्याच्या प्रतिभेच्याच खुणा आहेत. नवनवीन देवतांची कल्पना करणे ही त्याच्या नवे मार्ग शोधण्याच्या प्रयत्नांची निशाणी आहे. आणि स्मृतिगत झालेल्या परंपरादेखील हेच दर्शवतात की परंपरेच्या, संस्कृतीच्या नावावर जमा झालेले सारे किटण आणि कुसंस्कार फेकून देऊ शकणेही त्याला शक्य झालेले आहे.

आपल्या ग्रामीण प्रदेशामधल्या अनेकानेक विभिन्न जाती हेच सिद्ध करतात की आपली तथाकथित जाती-व्यवस्था म्हणजे काही पोलादी साचा नव्हे, त्यात अनेक चढ-उतार झाले आहेत व होत राहतील. 'क्रांती-पर्व' (संक्रांति काल) या शब्दाचा आपण काय अर्थ घेता मला ठाऊक नाही. पण माझ्या मते साहित्यिकांचे कर्तव्य स्पष्टच आहे ते असे की, त्यांनी कधीही कोणतीही प्रथा चिरंतन वा कायमची समजू नये. कोणत्याही रूढीला अभेद्य, मात करता न येण्याजोगी मानता कामा नये आणि आजच्या घडीला अस्तित्वात येणाऱ्या रूढीदेखील सर्वकालिक सत्ये आहेत असे समजू नये. इतिहास विधात्याचा स्पष्ट संकेत हेच सुचवतो की मनुष्यप्राण्याला तर पशूंहून अलग करणारी जी 'मानुषता' आहे तीच आराध्य आहे. साहित्य काय किंवा राजकारण काय, साऱ्याचे एकमात्र उद्दिष्ट याच मनुष्यतेची सर्वांगीण उन्नती हे आहे.''

वरील अवतरणातून द्विवेदींची मनुष्यविषयक धारणाच नव्हे, तर मनुष्याबद्दलची आशावादी दृष्टीही स्पष्ट होते. त्यांचा असा दृढविश्वास आहे की एक दिवस असा येईल जेव्हा माणूस आपल्या साऱ्या आसुर-वृत्तींचा त्याग करेल आणि संपूर्ण जग हिंसा, द्वेष, घृणा, तिरस्कार व या हिसकाहिसकीच्या विषारी वातावरणातून मुक्त होईल. 'नाखून क्यों बढते हैं?' शीर्षकाच्या निबंधात द्विवेदी म्हणतात की नखांची वाढ होणे हे प्राणी असल्याचे, पशुतेचे चिन्ह आहे. माणूस जंगली होता तेव्हा त्याच्या जीवरक्षणासाठी नखे आवश्यकच होती. ते त्याचे हत्यार, अस्त्र होते. जसजसा माणसाचा विकास होत गेला तसे त्याने नखे कापून टाकण्यास सुरुवात केली. हे

त्याच्या संयमाचे प्रतीक वा लक्षण म्हणता येईल. पशुत्वाची लक्षणे जरी त्याच्यामध्ये आहेत तरी माणूस त्यांचा त्याग करू पाहतो आहे. माणसाची स्वत:ची ही मनीषा आहे, त्याचा आदर्श आहे. ह्याच प्रकारे मानवी समाजातली शस्त्रास्त्रे वाढवण्याची प्रवृत्ती पशुत्वाचे लक्षण आहे. पण त्यांच्या वाढीला पायबंद घालणे यातच मनुष्यता आहे. द्विवेदी असेही मानतात की माणसाच्या शक्यतांना तर सीमाच नाही. त्याची शक्ती अमर्याद आहे. तो कधीच पराजित होत नाही. पशुत्व त्याच्यात पुन्हापुन्हा प्रकट होते आणि माणूस पुन्हापुन्हा त्यावर मात करण्याचा प्रयत्न करतो. हीच माणसाच्या विकासाची कहाणी आहे.

द्विवेदींची दृष्टी मुळात सांस्कृतिक आहे. साहित्यानंतर त्यांचे सर्वांत जास्त निबंध संस्कृतीबद्दलचे चिंतन या स्वरूपाचे आहेत. त्यांच्या बहुतेक निबंधांमधून भारतीय संस्कृतीचे स्वरूप, सामर्थ्य, तिची बलस्थाने यांचे विश्लेषण झाले आहे. त्यांचे संस्कृती-प्रेम इतके तीव्र आहे की संस्कृतीसंबंधी विचार नाहीत अशी त्यांची एकही साहित्य-कृती नसावी. 'अशोक के फूल', 'मेरी जन्मभूमि', 'हिमालय', 'ठाकुरजी की बटोर', 'भारतीय संस्कृति और हिंदी का प्राचीन साहित्य', 'सभ्यता और संस्कृति', 'भारतीय संस्कृति की देन', 'भारतीय संस्कृति का स्वरूप', 'संस्कृति और साहित्य', 'संस्कृतियों का संगम', 'भारतवर्ष की सांस्कृतिक समस्या', 'हिंदू संस्कृति के अध्ययन के उपादान' इत्यादी निबंध तर प्रामुख्याने संस्कृतीविषयकच आहेत. संस्कृतीबद्दल त्यांची स्वत:ची स्वतंत्र, स्पष्ट अशी धारणा आहे. संस्कृतीला कुठल्या एकाच देशाची वा जातीची कुंपणे घालणे त्यांना मान्य नाही. त्यांचे म्हणणे असे की अखिल जगाच्या माणसांची मिळून अशी एक मानव-संस्कृती असू शकते. अशा व्यापक संकल्पनेमधली व्यापक संस्कृती आजवरच्या जगात माणसांनी ना अनुभवली आहे, ना अंगीकृत केली आहे ही गोष्ट वेगळी. संस्कृतीच्या संदर्भात पौर्वात्य वा पाश्चिमात्य, भारतीय-अभारतीय अशी कृत्रिम विभागणी द्विवेदींना स्वीकार्य वाटत नाही. त्यांच्या मते कोणतीही संस्कृती या विश्वात उद्गम झालेल्या सत्याच्या विरोधात नसते.

त्यांच्याच शब्दात :

''नाना ऐतिहासिक परंपरा, तऱ्हेतऱ्हेची भौगोलिक परिस्थिती, यात जीवन जगून जगाच्या पाठीवरच्या भिन्नभिन्न समुदायांनी त्या महान मानवी संस्कृतीच्या भिन्नभिन्न अंगांचे, पैलूंचे दर्शन घडवले आहे. हरतऱ्हेच्या धार्मिक साधना, कलात्मक प्रयत्न यांमधून, तसेच सेवा, भक्ती आणि योगाच्या अनुभूतींमधून देखील माणसाला 'त्या महान सत्या'च्या व्यापक आणि परिपूर्ण रूपाची प्राप्ती हळूहळू होत चालली आहे, 'ते सत्य' कोणते तर जे आपण 'संस्कृती' या शब्दाने व्यक्त करतो ते''[1]

'सभ्यता' आणि 'संस्कृती' यांच्यामधला फरक स्पष्ट करताना द्विवेदी लिहितात :

''सभ्यतेच्या अंतर्मनावरील म्हणजेच आंतरिक प्रभावाला संस्कृती म्हणता येईल. माणसाच्या बाह्य 'व्यवस्थां'चे नाव सभ्यता. तर व्यक्तीच्या आंतरिक विकासाचे

1. 'भारतीय संस्कृती की देन' शीर्षक निबंध.



नाव संस्कृती. सभ्यता वर्तमानामधल्या सोयी, गैरसोयींवर दृष्टी ठेवून असते. संस्कृतीची दृष्टी भविष्य किंवा भूतकाळातल्या आदर्शांवर असते. सभ्यता जवळच्या गोष्टी बघते, तर संस्कृती दूरपर्यंतच्या. व्यवस्थेवर लक्ष ठेवून असते ती सभ्यता. तर संस्कृतीचे लक्ष व्यवस्थांच्या भूतकाळावर, व्यतीत झालेल्या काळातील व्यवस्थांवर असते. 'सभ्यते' च्या कक्षेत कायदा ही माणसाहून मोठी गोष्ट असते. पण 'संस्कृती'च्या दृष्टीने माणूस कायद्याच्याही पलीकडे आहे. सभ्यता माणसाच्या बाहेरची असल्याने चंचल आहे. संस्कृती मात्र आंतरिक आणि म्हणून स्थायी असते.''[1]

याआधी म्हटल्याप्रमाणे, एखाद्या देशाची वा जातीची 'विशुद्ध' अशी काही संस्कृती असते असे द्विवेदी मानतच नाहीत. भारतीय संस्कृतीबद्दलही ते याच दृष्टीने विचार करताना दिसतात. 'अशोक के फूल' या निबंधात त्यांनी म्हटले आहे की भारतवर्ष हा एक विचित्र देश आहे. रवीन्द्रनाथांनी त्याला 'महामानवसमुद्र' म्हटले. इथे असुर, आर्य, शक, हूण, नाग, यक्ष, गंधर्व... कोणास ठाऊक किती मानवजाती येऊन वसल्या व एकमेकांत मिसळून गेल्या. ज्याला आपण 'हिंदू रीती नीती' समजतो ती अनेक आर्य आणि आर्येतरांच्या समावेशांचे, स्वीकारांचे अद्‌भुत मिश्रण, मीलन आहे. ज्याला आपण आजचा भारतवर्ष म्हणतो तो नाना जाती, धर्म, संस्कार, रीतिरिवाज यांचा एक जिवंत समन्वय आहे.

द्विवेदींच्या म्हणण्यानुसार,

''भारतीय संस्कृतीने भिन्नतेची समस्या, अमेरिकेत ज्या तऱ्हेने ती सोडवली गेली त्या तऱ्हेने सोडवली नाही. अमेरिकेत प्रवासी म्हणून आलेल्या युरोपियन लोकांनी त्या वेळी स्थानिक आदिवासींना अत्यंत क्रूर निर्दयतेने चिरडून त्यांचे तेथील अस्तित्वच संपवून टाकले. जी 'सभ्यता'वा व्यवस्था सर्वांना मारपीट करून दंडुकेशाहीने एकसंध करू पाहते तिच्या अंतरंगातच दुभंगलेपण (बहुत्व) असते आणि रक्तात भिनलेले असतात भेदभाव, द्वेष, घृणा व तिरस्कार. भारतीय 'संस्कृती'च्या प्राणातच एकत्व आहे आणि रक्तात सहानुभूती. अगदी याच कारणामुळे आज या देशात हजाराहून अधिक समाज एकमेकांना अडचण न ठरता निर्विघ्नपणे आपापल्या वैशिष्ट्यांसह जिवंत राहू शकले आहेत.''[2]

माणसामधले जे सर्वोत्तम ते प्रकाशित करण्यास समर्थ आणि साहाय्यक आहे ती खऱ्या अर्थाने भारतीय संस्कृती असे द्विवेदी मानतात. आपल्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीच्या व ऐतिहासिक परंपरांच्या चौकटीत राहून या देशातील जनतेने माणसामधले जे सर्वोत्तम त्याला बाहेर काढून प्रकाशात आणण्यासाठी प्रयत्न केले. आणि हे प्रयत्न, जितक्या प्रमाणात जगातल्या अन्य माणसांच्या प्रयत्नांशी मिळते-जुळते आहेत, अविरोधी आहेत तितक्याच प्रमाणात ते त्या महान विश्व- संस्कृतीचा एक भाग, अंश आहेत असे द्विवेदी मानतात. भारताने जगातील सर्व देशांना आपल्या धर्म-साधनेची श्रेष्ठ मूल्ये दिली आहेत. अहिंसा व मैत्री यांचा संदेश दिला आहे.

1. 'सभ्यता और संस्कृति' शीर्षक निबंध.
2. 'सभ्यता और संस्कृति' शीर्षक निबंध.

विशाल आध्यात्मिक अनुभवांबाबतचा उपदेश केला आहे. भारतीय दृष्टी केवळ भौतिकवादापाशीच अडखळलेली नाही, 'केवल आनंदा' पर्यंत पोचण्याचा प्रयत्न तिने केला आहे. आपल्या निबंधामध्ये द्विवेदींनी भारतीय संस्कृतीची वैशिष्ट्ये केवळ अधोरेखित केली आहेत असे नाही, तर आधुनिक दृष्टिकोनातून तिची नव्याने मांडणीही केली आहे. रूढी, अंधश्रद्धा आणि मृतप्राय परंपरा ते स्वीकारत नाहीत, पण त्याबरोबरच आधुनिकतेच्या, फॅशनच्या आहारी जाऊन माणसाने दीर्घ संघर्षानंतर मिळवलेल्या काही मूल्यांचा त्याग करण्याचा सल्लाही ते देत नाहीत. यासंबंधी ते लिहितात :

''मी जुन्या रूढींची बाजू घेणाऱ्यातला नव्हे. पण संयम आणि निष्ठा या काही जुन्या रूढी नाहीत. मनुष्याने केलेल्या जीवनाच्या दीर्घ अभ्यासातून, साधनेतून प्राप्त झालेले ते गुण आहेत आणि दीर्घ अभ्यासानेच ते मिळवता येतात.''

जातीपातींच्या संकुचितपणाला द्विवेदी भारतीय संस्कृती मानतच नाहीत. 'ठाकुरजी की बटोर' या निबंधात ते लिहितात :

''विशिष्ट ठाकुर जातीने केलेली पूजाच फक्त ज्यांचे पावित्र्य अबाधित राखू शकते, आणि जे इतर जातींनी पूजा केली तर चरणोदकासारखे अग्राह्य होऊन जातात, ते देव माझी पूजा नाही ग्रहण करू शकत. माझे देव पतितांचे देव आहेत. जाती, वर्णभेद यांच्या पलीकडचे, धर्म व सांप्रदायिकता यांच्याहून खूप उंचीवरचे देव आहेत. ते साऱ्यांची पूजा ग्रहण करू शकतात! आणि पूजा ग्रहण करून ब्राह्मणेतरांना, चांडाळांना...सर्वांना पूज्य बनवू शकतात!''

साहित्य आणि संस्कृती यांव्यतिरिक्त द्विवेदींनी धर्म, तत्त्वज्ञान (दर्शने), ज्योतिष, भाषा, शिक्षण, प्राचीन इतिहास यासंबंधीच्या अनेक विषयांवर निबंध लिहिले आहेत. यातले बहुतेक संशोधनपर आहेत. त्यांच्या व्यक्तित्त्वाचा एक पैलू जुन्यापुराण्या पोथ्या धुंडाळणाऱ्या संशोधकाचा आहे व अशा कामात ते हरवून जातात; जुन्या, अनमोल रत्नांचा पारखी हरवून जावा तसे. त्यांचे शोधपूर्ण निबंध अभ्यासकांना नवे ज्ञान, नवी माहिती देतात त्याचप्रमाणे परज्ञानावर पुष्ट होणाऱ्या पल्लवग्राही पंडितांना, वाचकांना चकित करून सोडतात. द्विवेदी संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश, हिंदी आणि बंगाली साहित्याचे मर्मज्ञ पंडित होते. इंग्रजीच्या माध्यमातून त्यांनी पाश्चात्त्य साहित्यही अभ्यासले होते. निबंधांमधून त्यांची सखोल विद्वत्ता दिसते, परंतु त्या पांडित्याचे ओझेच व्हावे अशी ती वाटत नाही. 'अशोक के फूल' निबंधात ते लिहितात :

''पांडित्यसुद्धा एखाद्या उपऱ्या ओझ्यासारखे असते. जितके जड तितक्या लवकर तुम्हाला बुडवते. पण जेव्हा ते जीवनाचेच एक अंग झालेले असते तेव्हा ओझे न होता सहज सोपे होऊन जाते.''

द्विवेदींच्यात गहन गंभीर विषय अगदी सोपा करून मांडण्याची विलक्षण क्षमता, हातोटी होती. तत्त्वज्ञान, तत्त्वचिंतन या बाबतीतल्या अत्यंत गंभीर तशाच सूक्ष्म बारकाव्यांच्याही गोष्टी ते अगदी सोप्या तऱ्हेने सांगून जातात. 'कबीराच्या अभ्यासाच्या संदर्भात त्यांनी 'सहजता' या गोष्टीला विशेष महत्त्व देऊन अधोरेखित केले आहे- त्यांची विद्वत्ता त्यांच्या निबंधांमधून, एखाद्या सहज वाहणाऱ्या झऱ्यासारखी प्रवाहित



भासते. लेखणी हातात धरताच आत्मसात केलेले ज्ञान जणू अलगद वाहू लागते. त्यांच्या निबंधांमधून कित्येक संदर्भ येतात... संस्कृत अवतरणे, प्राकृत, अपभ्रंश भाषांमधली अवतरणे, भक्तीकाळ आणि रीतीकाळामधल्या कवींच्या तसेच रवीन्द्रनाथांच्या काव्यपंक्ती....वगैरे. अशा अवतरणांचे ते अनुवाद करतात व ती सोपी करून मांडतात ते वाचकाला आशयग्रहणात अडचण येऊ नये यासाठी. अगदी छोट्या छोट्या गोष्टींपासून सुरुवात करून ते गंभीर विवेचनाच्या खोल पाण्यात अगदी सहज शिरतात. अशोकाच्या फुलांकडे पाहताना ते भारतीय साहित्य आणि संस्कृतीमध्ये इतक्या खोलवर बुडी मारतात की आश्चर्य वाटते. एखादा क्षण अशा तऱ्हेने ते पकडतात की काळाचा एक प्रदीर्घ विस्तार चिंतनाच्या आवाक्यात, कक्षेत येतो. हे द्विवेदींचे खास वैशिष्ट्य आहे. अशोकवृक्षाच्या लाल लाल इवल्या फुलांच्या घोसांचे निमित्त करून ते एक दीर्घ आणि व्यापक सांस्कृतिक यात्राच करतात व हे त्यांच्या विलक्षण निबंधलेखनशैलीचे एक अद्भुत उदाहरणच आहे. 'नखे का वाढतात?' - एका छोट्या मुलीच्या या अगदी साध्याशा प्रश्नावर ते अगदी गंभीर प्रतिक्रिया व्यक्त करतात आणि लाखो वर्षांच्या मानवजातीच्या इतिहासाची सफर करून येतात. मानव-संस्कृतीबद्दल रस व आस्था असलेल्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ही साक्ष आहे. वस्तुत: त्यांचे व्यक्तित्व मूळातूनच संस्कृतीप्रेमी आहे. कोणत्याही विषयावर लिहिताना त्याबद्दलचे विचार त्यांना सोडत नाहीत. मानव व त्याची संस्कृती हा विषय त्यांच्या संपूर्ण चिंतनाच्या केंद्रस्थानी असतो. त्यांच्या निबंधांचाही आधारभूत संबंध संस्कृतीशीच असतो.

भारतेंदु यांचा काळसुद्धा 'निबंधा'च्या दृष्टीने समृद्ध आहे. परंतु त्या काळातील निबंधाच्या केंद्रस्थानी राजकारण आणि तत्कालीन समाज हे विषय आहेत. द्विवेदींच्या निबंधांचे विषय मानव-संस्कृतीला केंद्रस्थानी ठेवतात. 'मेरी जन्मभूमि' शीर्षकाच्या निबंधात ते लिहितात :

''बरा, वाईट कसाही समजा, माझ्यात एक गुण आहे, त्याला कदाचित वाळूतून तेल काढणे म्हणू शकाल. वाळूतून तेल काढायचा मी खरोखरच प्रयत्न करतो. हां, अट एवढीच की ती वाळू मला आवडायला हवी.''

द्विवेदींची ही प्रवृत्ती प्राधान्याने दिसेल ती त्यांच्या निबंधात. 'ठाकुरजी की बटोर' या निबंधात ते आपल्या गावच्या किरकोळ अशा ठाकुरवाडीची समस्या अख्ख्या दुनियेच्या समस्येशी जोडून देतात. 'मेरी जन्मभूमि' मध्ये आपल्या गावाची, आसपासची चर्चा करताना ते नाना जाती, समुदायांमध्ये भंगून गेलेल्या अखिल मानवजातीबद्दल बोलू लागतात व स्थानीय निमित्ताने एक उंच भरारी मारून मानवाच्या जय-यात्रेच्या इतिहासात जाऊन पोचतात. या भरारीसाठी प्रामुख्याने त्यांच्या मदतीला येतात शब्द. त्यांच्यासाठी शब्द पंख बनतात. शब्दांशी खेळ करणे त्यांना आवडते. कादंबरी असो की समीक्षा वा निबंध, त्यांची शब्द-क्रीडा चालू असते. शब्दांना ते धुळीतूनही वर उचलतात, आणि आपल्याच संदर्भानुसार, स्वेच्छेनुसार नवे अर्थ त्यांमध्ये भरतात आणि शब्दांची रत्ने बनवतात! वास्तविक शब्द हे रत्नेच तर असतात- संस्कृतीची चिन्हे असतात! माणसाच्या विजय यात्रेचे साक्षीदार! शब्द म्हणजे

मानवाच्या स्मृतीच– स्मृती अशा की शब्दांच्या पाऊलखुणांचा मागोवा घेत हजारो वर्षांच्या काळोख्या, अंधाऱ्या भूतकाळात प्रवेश केला जाऊ शकतो. द्विवेदी हे करतात, व त्यातून त्यांची प्रगाढ विद्वत्ता आणि कौशल्य दोन्हीचे दर्शन होते. 'मेरी जन्मभूमि' निबंधात ते लिहितात :

''माझ्या गावात ज्या जातींची वस्ती आहे, त्या जातींचे महत्त्व खूप आहे. एखाद्या उद्ध्वस्त, उजाड हवेलीहून वा गाडल्या गेलेल्या विटांहून त्यांचे महत्त्व कमी तर नाहीच, उलट जास्त आहे. माझ्या या लहानशा गावात अखिल भारतवर्षाचा खूप मोठा सांस्कृतिक इतिहास अभ्यासला जाऊ शकतो.''

याच निबंधात द्विवेदी आपल्या गावच्या 'काँदू', 'कलवार', 'तुरहा', 'जुलाहा' वगैरे जातींचे शब्दांच्या आधारे विश्लेषण करू लागतात. 'नाखून क्यों बढते है' या निबंधात ते 'स्वाधीनता' या शब्दाच्या आधाराने संपूर्ण भारतीय संस्कृतीची नस पकडतात-

''15 ऑगस्टला जेव्हा इंग्रजी भाषेतली वर्तमानपत्रे 'इंडिपेंडन्स' ची घोषणा करीत होती त्याच वेळी देशी भाषांमधली वर्तमानपत्रे 'स्वाधीनता' दिवसाची चर्चा करत होती. 'इंडिपेंडन्स' चा अर्थ आहे अनधीनता, म्हणजे कोणाच्याही अधीनतेचा अभाव. पण 'स्वाधीनता' शब्दाचा अर्थ आहे स्वत:च्याच अधीन राहणे. इंग्रजीत बोलायचे तर 'सेल्फ डिपेंडन्स' म्हणता येईल. कधीतरी मला वाटते की इतके दिवस इंग्रजीचे अनुसरण केल्यानंतरसुद्धा भारतवर्ष 'इंडिपेंडन्स'ला 'अनधीनता'का म्हणू शकत नाही? इथे आपल्या स्वातंत्र्याची जितकी नामकरणे केली गेली- स्वतंत्रता, स्वराज्य, स्वाधीनता- त्या सर्वांमध्ये 'स्व' चे बंधन मात्र जरूर ठेवले गेले. हा काय केवळ योगायोग म्हणायचा की आपली संपूर्ण परंपराच नकळत आपल्या भाषेमधून प्रकट होत राहिली आहे?''

शब्दांच्या आधारावर इतिहास व संस्कृतीच्या महासागरात खोल प्रवेश करण्याच्या द्विवेदींच्या या कलेची अगणित उदाहरणे मिळतील. या संदर्भात 'कुटज' शीर्षकाच्या त्यांच्या प्रसिद्ध निबंधातील केवळ एक अवतरण देणे पुरेसे आहे, ज्यात त्यांच्या शब्द-क्रीडा करण्याच्या वृत्तीचेही दर्शन होते. त्यांनी लिहिले आहे :

''कुटज' म्हणजे अर्थात 'कुट' पासून उद्‌भव झालेले. 'कुट' म्हणजे घट, घडा किंवा 'घर' देखील. घटातून जन्म झालेल्या प्रतापी अगस्त्य मुनींनाही 'कुटज' असे संबोधन आहे. ते 'घटा'तून थोडेच जन्मले असतील? याहून वेगळेच काही घडले असेल. संस्कृतमध्ये दासीला 'कुटहारिका' किंवा 'कुटकारिका' म्हणतात. का म्हणत असावेत?... 'कुटिया' किंवा 'कुटीर' शब्दाशी कदाचित याचा संबंध असेल. मग 'कुट' चा अर्थ 'घर' हाच असेल? घरकाम करणारी दासी म्हणून 'कुटकारिका' व 'कुटहारिका' असे म्हणता येईल. एक जरा वाकड्या वळणाची दासी 'कुटनी' म्हणून ओळखली जाते. संस्कृतमध्ये तिच्या चुकांना थोडे अधिक ठळक, स्पष्ट करण्यासाठी तिला 'कुट्टिनी' म्हटले गेले. अगस्त्यमुनीसुद्धा नारदांप्रमाणे दासीपुत्र होते की काय? कुटज मुनींच्या किंवा कुटज फुलाच्या बाबतीत, घड्यातून जन्म घेणारे व म्हणून कुटज अशी काही यमक जुळवणी नसावी. फुले मातीच्या कुंडीत



असतातदेखील, पण 'कुटज' फूल तर वनवासी, जंगलातले स्वच्छंदी फूल आहे. त्याला घड्याशी वा कुंडीशी काय देणे-घेणे असणार?...शब्द विचारोत्तेजक आहे हे खरेच. मग तो कुठून आला? मला तर तो आर्य भाषिक शब्द असेल याबद्दलच शंका आहे! एका भाषाशास्त्रींची गोष्ट आहे. कोणत्याही संस्कृत शब्दाची एकाहून अधिक प्रचलित रूपे पाहिली की ते लगेच त्याच्या 'कुलीनते' बद्दल शंकित होऊन जात. संस्कृमध्ये 'कुटज' रूप मिळते तसे 'कुटच' हेसुद्धा. तसे तर 'कूटज' असे रूपही मिळते. तर मग हा शब्द कोणत्या जातीचा आहे? आर्य जातीचा तर वाटत नाही. सिल्व्हा लेव्ही यांनी म्हणून ठेवले आहे की संस्कृत भाषेतले फूल, वृक्ष, आणि बगिचा, शेती, बागायती यांच्या संबंधातले बहुतांशी शब्द 'आग्नेय भाषा-कुटुंबा' मधले आहेत. हा शब्दही तिथलाच तर नव्हे?.. एका काळी ऑस्ट्रेलिया व आशिया ही महाखंडे जोडलेली होती. मग कोणत्यातरी नैसर्गिक विस्फोटामुळे दोन्ही अलग झाली. एकोणिसाव्या शतकातल्या भाषा वैज्ञानिकांना हे पाहून आश्चर्य वाटले की ऑस्ट्रेलियातल्या दूरवरच्या जंगलांमध्ये वसलेल्या जातींची भाषा आशियामध्ये वसलेल्या काही जातींच्या भाषेशी चक्क काहीशी मिळती-जुळती आहे! भारतातल्या संथाल, मुंडा सारख्या अनेक जातींची ती भाषा आहे. सुरुवातीला या भाषेला 'ऑस्ट्रो-एशियाटिक' म्हटले गेले. अग्नेय किंवा 'अग्निकोन' भूभागाची भाषा म्हणून हिला आग्नेय-परिवाराची भाषासुद्धा म्हटले जाऊ लागले आहे. अलीकडच्या काळात भारतीय जनतेचे वर्ग-विशेष जतन करण्यासाठी आणि जुन्या वाङ्‌मयाचे स्मृतिचिन्ह म्हणून आपण हिला कोल परिवाराची भाषा म्हणू लागलो आहोत. विद्वानांच्या म्हणण्यानुसार संस्कृत भाषेतील अनेक शब्द याच वर्गाच्या भाषेचे आहेत आणि आता मात्र ते भारतीय संस्कृतीचे अविभाज्य अंग बनून गेले आहेत. कमल, कुड्मल, कम्बु, कम्बल, तांबूल इ. शब्दांबाबत असे म्हटले जाते. कित्येक झाडे-झुडपे, शेतीची औजारे व उपकरणे यांची नावेही अशीच बनली आहेत. 'कुटज' देखील त्यातच मोडेल तर आश्चर्य कसले! संस्कृत भाषेने शब्दसंग्रह करताना कधी स्पृश्यास्पृश्यता मानली नाही. कोण जाणे कोणकोणत्या जातींचे किती शब्द संस्कृतमध्ये आले आणि तिचेच बनले आहेत...! अभ्यासक याचा थांगपत्ता लावताना त्रस्त होऊन जातात.''

निबंधात ज्या व्यक्तित्वाच्या मर्माला, मूलतत्त्वाला सर्वाधिक महत्त्व द्यायचे ते व्यक्तित्व द्विवेदींच्या लेखनात आपल्या सर्वोत्तम रूपात आढळते. निबंधांमध्ये द्विवेदींच्या सर्वजयी... व्यक्तित्वाची छाया सर्व लेखनावर पसरलेली असतेच, त्यांचे संस्कृत-प्रेमी, उदार, स्वाभाविक मनमोकळे, उन्मुक्त खुले व्यक्तिमत्त्व हेच त्यांच्या निबंधांचे प्राणतत्त्व आहे. माणसाच्या 'व्यक्तित्वा'ला ते एवढे महत्त्व देतात हा अपघात नाही. त्यांचा आवडता कवी 'कबीर' अभ्यासताना त्यांनी कबीराच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल वेगळा विचार केला आहे, आणि हिंदीच्या एकूण एक कवींहून अनोख्याच असलेल्या त्याच्या व्यक्तित्वाचे अद्‌भुत चित्रण केले आहे. इतकेच नाही, तर त्यांनी 'अशोक के फूल', 'शिरीष के फूल', 'कुटज', 'देवदार' यांसारख्या निबंधांमधून या झाडाफुलांना जे व्यक्तित्व आपल्या कल्पनेतून निर्माण करून बहाल केले आहे ते पाहून वनस्पतीशास्त्रज्ञदेखील आश्चर्यचकित होतील. 'देवदार' शीर्षकाच्या निबंधात

ते लिहितात :

या देशाचे लोक पिढ्यान् पिढ्या फक्त 'जात' बघत आले आहेत. व्यक्तित्व लक्षात घेण्याची त्यांना सवयही नाही आणि पर्वाही नाही. संत लोक कंठशोष करून थकले की, 'मोल तलवारीचे करा, म्यान बाजूला राहू द्या.', पण तलवारी बंदिस्तच राहिल्या आणि बाजारात उठाठेव चालली आहे ती म्यानांच्याच किंमतीची. व्यक्तित्वाला इथे कोण विचारतो?''

द्विवेदींच्या लेखी हे 'व्यक्तित्व'च सर्वात महत्त्वाचे. 'देवदार' नावाच्या निबंधात ते अलग अलग देवदार वृक्षांना जे व्यक्तित्व बहाल करतात त्यात त्यांची सूक्ष्म निरीक्षणशक्ती ज्या उंचीला पोचलेली आढळते ते हिंदी गद्य वाङ्मयातले एक दुर्मिळ उदाहरण आहे.

त्यांनी लिहिले आहे :

''देवदारसुद्धा सगळे एकसारखे एक नसतात. माझ्या अगदी जवळ जो आहे तो म्हाताराही आहे आणि मूर्ख सुद्धा-- त्याच्या जरा खालच्या बाजूला जो आहे तो जरा विक्षिप्तच वाटतो. एक ढोले राम खड्ड्याच्या एका भागात उगवून आलेत, अर्धे जमिनीत अर्धे आकाशात असे. अर्धे नुसते बोडके खोड, अर्धे बहरलेले. अख्ख्या गोतावळ्याचे मास्तरजी वाटावे. एक अल्लड पोरसवदा असा आहे. सदा हसरा असा... कवी वाटतो. त्याच्यावर प्रेम करावे असे मनापासून वाटते. हे नेहमीचेच आहे. प्रत्येक देवदाराचे आपले स्वत:चे व्यक्तित्व असते. एक तर इतका कमनीय होता की त्या वृषभध्वज महादेवाने त्याला आपला पुत्रच मानला होता. आणि पार्वतीमातेच्या स्तनांमधून दूध गळत, ओसंडत होते. हे कालिदास स्वत:च म्हणून गेला आहे. पण काही महाभागांना 'सब घोडे बारा टक्के'च वाटतात. त्यांना सगळे एकसारखेच दिसतात. त्यांच्या दृष्टीने तो मूर्ख; तो मास्तर, तो कवडीचुंबक, तो लहरी, तो झिपऱ्या, तो मेंगळट, तो खळबळ्या, तो कटकट्या, तो तऱ्हेवाईक, तो झुल्या-डुल्या, तो धट्टाकट्टा, तो खोडसाळ, तो चुळबुळ्या, तो वाकडातिकडा, तो चौरंगी... सगळे सारखेच!''

केवळ सूक्ष्म निरीक्षणासाठीच नाही, भाषेवर हुकमत व भाषेचे वैभव यासाठीही त्यांचे हे अवतरण लक्षात घेण्यासारखे आहे. सर्जनशील लेखक आणि सामान्य व्यक्ती यांच्यातला एक फरक हा की सामान्य व्यक्तीला 'जात' दिसते तिथे कलावंताला 'व्यक्तिमत्त्व' दिसते. सर्जनशील रचनाकाराच्या नजरेतून 'सामान्या'लाही 'विशिष्ट' बनवले जाते व 'जाती'चेही रूपांतर 'व्यक्ती'मध्ये केले जाऊ शकते. द्विवेदी ही किमया मोठ्या खुबीने साधतात. त्यांच्या कादंबऱ्यांमधील चरित्रे व्यक्तित्वसंपन्न आहेत. त्यांनी ज्या ज्या संत, भक्त कवींवर लिहिले आहे ती सर्व व्यक्तिमत्त्वे संपन्न अशी आहेत; आणि इतकेच नाही तर त्यांनी ज्या फुलांवर, वनस्पतींवर लिहिले आहे त्यांनाही व्यक्तित्वाचा लाभ करून दिला गेला आहे. खुद्द द्विवेदींचेच व्यक्तित्व या साऱ्यांना संपन्न व्यक्तिमत्त्व बहाल करते. अखेर उपासक बनवेल तितके महान त्याचे 'उपास्य' बनत असते.

द्विवेदींच्या निबंधांचे स्वरूप व्यक्तिनिष्ठ लेखनाचे आहे, किंवा ते 'ललित' निबंध



आहेत. पण आधी म्हटल्याप्रमाणे ते हलके-फुलके, 'स्व'ला गोंजारणारे किंवा आत्मरत नि आत्ममुग्ध लेखनाचे नमुने नाहीत. हे निबंध जितके ललित आहेत तितकेच संशोधनपर देखील. त्यात निबंधकाराच्या कल्पनेची भरारी जेवढी दिसते, तेवढीच तथ्य आणि सत्याशी असलेली बांधिलकीही दिसते. स्वत:बद्दलच्या प्रसंगाच्या वर्णनात मधूनच गहन, गंभीर चिंतन आणि चिंतनपर लेखन करतानाही अगदी घरगुती आपलेपणाची झलक हे द्विवेदींच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. 'आम फिर बौरा गये' या निबंधाची सुरुवात पहा :

''वसंतपंचमीला अजून अवकाश आहे, पण आंब्याच्या झाडांना तर आत्तापासूनच मोहोर आलाय. दर वर्षीच माझे डोळे शोधत राहतात त्याला. लहानपणी ऐकले होते की वसंतपंचमीच्या अगोदरच जर आम्रवृक्षावर मोहोर फुललेला दिसला तर तो तळहातावर घेऊन चुरडायचा असतो. कारण मग एक वर्षभरपर्यंत, अशा हाताला विंचू चावला तरी त्याच्या विषाला आपसूकच उतार पडतो. लहानपणी कितीतरी वेळा आंब्याचा मोहोर तळहातावर रगडला आहे. आता तसे नाही करत, पण वसंतपंचमीच्या अगोदर जर कधी आंब्यावर मोहोर दिसला तर विंचू मात्र जरूर आठवतो. मनात विचार येतो की आंब्याचा आणि विंचवाचा काय संबंध असेल?''...

ललित वा आत्मनिष्ठ निबंधात लेखक विषयाच्या दिशेने जाता जाता वाटेत इकडे तिकडे बागडत, विहार करत जात राहतो आणि बहुतेकदा स्वत:बद्दलच्या एखाद्या प्रसंगाच्या आधारे आपल्या वाचकाशी एक आपुलकीचे नातेही पक्के करून जातो. 'वसन्त आ गया है' या निबंधाचा काही भाग पाहण्यासारखा आहे :

''कवीच्या आश्रमात मी राहतो आहे. अगदीच ओंडका मी नाहीये पण भाग्यदेवताच जर प्रसन्न नसेल तर एखाद्याने काय करावे?...दोन कचनाराची झाडे या 'हिंदी भवन'मध्ये आहेत. एक अगदी माझ्या दारात; आणि दुसरे माझ्या शेजाऱ्याच्या. नशिबाची थट्टा तर बघा- दोन्ही एकाच दिवशी लावली होती. माझं जरा जास्त चांगल्या तब्येतीचं-धडधाकट आणि मजबूत आहे. शेजाऱ्याचं कमकुवत-अशक्त- आणि मरतुकडं. पण माझ्या झाडाला फुलं नाहीत आणि त्या बेट्या दुबळ्याला खांद्यापासून फुलंच फुलं! असं मरतुकडं झाड आहे ते... पण त्याच्या अंगावर फुलांशिवाय दुसरं काही दिसेल तर शपथ!...मला ताप येतो आहे...ही सुद्धा प्रारब्धानं केलेली मस्करीच! साऱ्या दुनियेत खळबळ माजली आहे की वसन्त येतो आहे!... आणि मला येतो आहे ताप!''

द्विवेदी एक यशस्वी अध्यापक आणि कुशल वक्ते होते. त्यांच्या लिखित निबंधांमधूनही त्यांच्या वक्तृत्वकलेची झलक वैशिष्ट्यपूर्ण तऱ्हेने दिसून येते. कुशल वक्त्याला श्रोत्याची मानसिकता व एकूण पातळी यांची नाडी व्यवस्थितपणे गवसलेली असते. आपले भाषण प्रभावी करण्यासाठी वक्ता नाना उदाहरणे, सुभाषिते, म्हणी, आख्यायिका, किस्से, कथा, आठवणी यांची पेरणी तर करतोच, शिवाय मधेमधे विडंबन, उपरोध वा विनोदाचाही शिडकावा करतो. द्विवेदींच्या लेखनात वक्तृत्वकलेची ही सगळी गमके भरपूर दिसतात. 'जीवेत शरद: शतम्' या शीर्षकाच्या निबंधाची सुरुवात पाहा :

''आज आपल्याला 'जीवेत शरदः शतम्' म्हणजेच 'आपण शंभर वर्षे जगावे' या विषयावर माझे विचार सांगणार आहे. आजच्या या गप्पागोष्टींचे नाव संस्कृतमध्ये दिले गेले आहे. ते अशासाठी, की श्रोत्यांच्या ध्यानात सुरुवातीलाच यावे की ही प्रार्थना नवी नाही, खूप जुनी आहे. धार्मिक हिंदू तर नित्य नेमाने आपल्या संध्या-पूजेच्या वेळी देवाची प्रार्थना करत असतो की तो दारिद्र्यहीन होऊन शंभर वर्षे जगो...''

मध्ये मध्ये द्विवेदी अशा प्रकारे संवाद करू लागतात की जणू काही ते समोर बसलेल्या मित्राशी गप्पागोष्टी करताहेत.

''त्याने काय बिघडले?... हा सगळा माणसाच्या आत्मकेंद्रित दृष्टीचा प्रसाद आहे. देवदाराला याच्याशी काय देणे आहे! तो तर जसा घडला आहे तसा आहे. तुम्ही त्याला वनस्पती समजा, की देवाचे काष्ठ म्हणा! तुमच्या पसंतीला उतरला, मनात भरला तर गोंडस नाव देता आणि नाहीतर नावे ठेवता! नावात काय ठेवलंय?...अशी शक्यता आहे की याचे जुनेपुराणे नाव देवतरू होते. म्हणजे देवाचे झाड नव्हे, तर देवही आणि झाडही. ते देव आहे म्हणून छन्द आहे, आणि झाड आहे म्हणून अर्थ. छन्द म्हणजे काय? तर समष्टीला व्यापणाऱ्या जीवनगतीशी समांतर चालणाऱ्या व्यष्टीच्या प्राणवेगाचे नाव छंद आहे. आणि अर्थ म्हणजे काय? तर समाजात स्वीकृती प्राप्त झालेला संकेत.''[1]

निबंधांच्या मधे मधे आवश्यक तिथे विडंबन केल्याशिवाय द्विवेदी रहात नाहीत. विद्वज्जन, नेते, साहित्यिक त्यांच्या उपरोधाच्या वाग्बाणांचे लक्ष्य होतात. 'बरसो भी' या शीर्षकाच्या निबंधामधील राजकारण आणि देशदशा यांवरचे त्यांचे एक तिखट विडंबन पाहावे :

''पण या जळानं ओथंबलेल्या मेघांना झालेय तरी काय? कुठे चालली आहे ही मेघमाला?... मुख तर दिल्लीच्या दिशेला वळलेले दिसतेय... सगळे दिल्लीच्या दिशेने धावताहेत... मेघही, माणसेही. स्वराज्यानंतर आज पंचवीस वर्षांनीही हेच नशिबात लिहिलेले असावे! वाटत होते की, इथे नाही तर नाही, दिल्लीत बरसले तरी काही वाईट नाही. पण असे ऐकतो की तिथे परिस्थिती आणखीनच वाईट आहे. जितके काजळकाळे ढग तिथे गेले ते सगळे न बरसताच सुकून पांगून गेले... आता काय होणार?...इथे उष्मा नुसता लोळण घेतोय... तिथे धूळ उडतेय. जाणकारांना विचारले तेव्हा दोन कारणे समजली. एकाच्या म्हणण्यानुसार 'प्रेशर' कमी झाले आहे. प्रेशर म्हणजे दबाव. सगळ्या दुनियेबद्दल ठाऊक नाही, पण ह्या देशात तरी 'प्रेशर'शिवाय कुठलेच काम होत नाही!''

''क्या आपने मेरी रचना पढी है?'' या शीर्षकाच्या निबंधात ('आपण माझे साहित्य वाचले आहे काय?') द्विवेदी समीक्षकांबद्दल उपरोधाने लिहितात :

''सातत्याने आकाशात ठोसे मारत रहायचे हे काही कमी कष्टाचे काम नाही. आणि मला चांगलेच ठाऊक आहे की रहस्यवादी समीक्षा लिहिणे म्हणजे काही

1. 'देवदारू' शीर्षक निबंध



पोरखेळ नाही. पुस्तकाला शिवलेदेखील नसतील, पण टीका अशी लिहिणार की त्रिभुवनही हादरावे! ही काय लहान साधना आहे? वाचणारा टीका करत नाही आणि टीका करणारा वाचत नाही. म्हणजे अगदी यथायोग्य नातेसंबंध! एकाच व्यक्तीने वाचायचेही व लिहायचेही, किंवा वाचायचेही आणि समीक्षाही करायची किंवा लेखणीही चालवायची... वगैरे वगैरे. असे झाले तर मग साहित्यात अराजकताच माजेल!''

निबंधांमध्ये द्विवेदींची मस्ती पाहण्यासारखी असते. ते आयुष्यातले प्रसंग, अनुभव अशा काही विनोदी ढंगाने पेश करतात की वाचताना त्यांच्या विद्वत्तेचा धाक वाचक पूर्णपणे विसरून जातो आणि आपल्याच दुनियेतला, जवळचा असा कोणीतरी आपल्याशी गप्पागोष्टी करत असल्यासारखे त्याला वाटत राहते. 'देवदारू' निबंधातला एक गमतीदार प्रसंग पाहावा :

''आमच्या गावात एक पंडितजी– विद्वान होते. स्वतःला ते महाविद्वान समजत. त्यांच्या मुखावाटे विद्या पिचकारीसारखी बाहेर पडत असे. शास्त्रार्थात ते मोठ्या मोठ्या दिग्गजांना हार मानायला लावत. विद्येच्या जोरावर नव्हे, तर त्या पिचकारीच्या भडीमाराने. प्रतिस्पर्धी थोबाड पुसत पळ काढायचा. जर वादविवादाचा प्रश्न आला तर मुद्यावरून प्रश्न गुद्यावर यायचा आणि गुद्याच्या बळानेच जय-पराजयाचा निकाल ठरायचा. एकदा माझ्या डोळ्यांदेखतच जंगी गुद्दागुद्दी झाली. गावगोतामधल्या लोकांचा पंडितजींच्या विद्वत्तेवर तसा भरवसा नव्हता पण त्यांची पचापच वाणी आणि भीमकाय शरीर याबद्दल त्यांना पूर्ण विश्वास होता. शास्त्रार्थात पंडितजी कधीच हरले नाहीत. फार थोड्यांना ठाऊक असते की शास्त्रार्थात कोणी हरत नसतोच- तो हरवला जातो. पंडितजींचे पाठीराखे ठामपणे हातात लाठीच घेऊन त्यांच्या मागे उभे राहिले की झाले. त्यांचा विजय हा मग ठरलेलाच असे. पंडितजी फक्त मोठमोठ्या विद्वानांनाच हरवत असत असे नाही, तर आसपासच्या भुतांचाही बीमोड करण्यात त्यांचा हात धरणारा दुसरा कोणी नव्हता. गायत्री मंत्र (जो त्यांच्या तोंडून 'आल्हा' सारखा ऐकू यायचा!) आणि देवदाराची काठी ही त्यांची अस्त्रे होती! एकदा ते उद्यानामधून पुढे चालले होते. घोर अंधार! भयाण शांतता! पहातात तो काय समोर दणादण ढेकळे येऊन पडताहेत. पंडितजींच्या अनुभवी मनाने चटकन ताडले की काहीतरी काळेबेरे आहे! माणूस काही इतक्या जोरदारपणे ढेकळे फेकू शकणार नाही. पंडितजी डगमगणारे नव्हते. त्यांनी मागे वळून हाकारले, 'अरे केवन है!' केवन म्हणजे कौन- कोण. तर मागे एक (मुडकहा) धड (कबंध) घोड्यावर बसून येत होतं टप्प-टप्प-टप्प!... तर, पंडितजींशी बाचाबाची करण्याचा मूर्खपणा त्या अगडबंब धडाने केला!... आणि- घाबरणाऱ्यांची गोष्ट वेगळी, पंडितजींनी मात्र जोडे काढले. (हो! गायत्री मंत्रपठणाला त्यामुळे बाधा आली असती ना!) आणि ठणाठणा गायत्री मंत्र म्हणायला सुरुवात केली. हातात देवदाराचे लाकूड होतेच, दे दणादण, रट्ट्यावर रट्टा- हाणायला लागले... बिचाऱ्या कबंधाला 'त्राही भगवान'

N. B. 'आल्हा'– 31 मात्रांचा छंदविशेष

करून सोडले- 'आत्ताची वेळ सोडून द्या पंडितजी- ओळखलं नाही तुम्हाला. पुन्हा अशी चूक नाही होणार! हा मी आजपासून तुमचा गुलाम झालो समजा! आणि पंडितजींच्या ब्राह्मण हृदयाला पाझर फुटला...! नाहीतर हा सगळ्या गाव-शिवरातला काटा तिथेच समाप्त झाला असता! मी ही गोष्ट खुद्द पंडितजींच्या तोंडून ऐकली होती. अविश्वास वाटायला जागाच नव्हती. 'फर्स्ट हँड इन्फर्मेशन' होती.''

हे दीर्घ अवतरण म्हणजे द्विवेदींच्या निबंधांमधली मस्ती व त्यांच्या विडंबन-विनोदपूर्ण लेखनाचे उदाहरण तर आहेच; शिवाय त्यांच्या जिवंत भाषेचाही तो एक अद्भुत नमुना आहे. अशा भाषेचे वरदान सर्वांच्या वाट्याला येत नसते. द्विवेदींच्याच शब्दात :

''सहज भाषा अवगत करून घ्यायची असेल तर कठोर तपश्चर्या आवश्यक आहे. जोवर माणूस स्वत: सहज स्वाभाविक होत नाही तोवर त्याची भाषा सहज, स्वाभाविक होण्याची शक्यता नाही. सखोल साधनेने ज्यांनी स्वत:ला स्वाभाविक बनवलेले नाही त्यांना सहज भाषेची प्राप्ती होत नसते. अशी भाषा व्याकरण आणि भाषाशास्त्राच्या बळावर बनवता-येत नाही किंवा कोशात संग्रहित केलेल्या शब्दांची त्रैराशिके जुळवून अशा भाषेची 'बांधणी' करता येत नाही. कबीरदासाला, तुलसीदासाला या भाषेची कळ सापडली होती. गांधीजींना ही भाषा अवगत झाली होती; कारण हे सारे सहज, स्वाभाविक होऊ शकले.''[1]

सांगायलाच नको की द्विवेदींनाही ही भाषा अवगत झालेली होती. पुराणे, काव्यशास्त्र, संगीत, ज्योतिष, आयुर्वेद, धर्म व कला यांच्यामधले सूक्ष्मात सूक्ष्म बारकावे, माहिती ते जणू शब्दांशी खेळता खेळता देऊन जातात. भाषेवर द्विवेदींची प्रचंड हुकमत होती. आपल्या आवडत्या कबीराच्या भाषाक्षमतेचे जे वर्णन त्यांनी केले आहे तशीच हुकमत. ते शब्दांची व्युत्पत्ती सांगतात, त्यांचा विकास सांगतात, शब्दांच्या पर्यायी वा समानार्थी शब्दांची चर्चा करतात व अशा तऱ्हेने भाषेशी खेळत खेळत आपल्या जवळच्या गहन रहस्यांचा वाचकासमोर जणू हलकेच असा शिडकावा करतात, की तुमच्या कामाचं असेल ते आता निवडा यातून...एका बाजूला त्यांची भाषा लोकजीवनातली- मातीची भाषा आहे, तर दुसरीकडे तिला शास्त्राच्या आध्यात्मिक चिंतनशीलतेची डूब आहे. पण कधीही ती कृत्रिम होत नाही. 'साहित्य की साधना' या निबंधात ते लिहितात :

''ज्ञानाचे सहज, स्वाभाविक बनणे अत्यंत आवश्यक आहे. जशी मातेच्या दुधात पौष्टिक तत्त्वे अनायासपणे येतात तशा तऱ्हेने तुमच्या लेखनात तुमचे चिंतन, तुमचे विचार सहजतेने येत असतील तर मग चिंता नाही.''

द्विवेदींच्या भाषेवर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा इतका गाढ प्रभाव आहे की ती लगेच ओळखता येते. भाषेचा असा सहज प्रवाह व त्याचबरोबर असे ऐश्वर्य क्वचितच एखाद्या गद्य लेखकाजवळ असते. त्यांचे भाषेचे सामर्थ्य अद्भुत आहे व त्या वैभवासाठी त्यांचे गद्य पुन्हापुन्हा वाचले जाईल, मग ती कादंबरी असो वा समीक्षा अथवा निबंध.

1. **'मनुष्य ही साहित्य का लक्ष्य है' शीर्षक निबंध**

# 3.

# कादंबरी

हजारीप्रसाद द्विवेदींच्या चारही कादंबऱ्या– 'बाणभट्ट की आत्मकथा' (1946), 'चारुचंद्र लेख' (1963), 'पुनर्नवा' (1973), व 'अनामदास का पोथा' (1976) भूतकाळाला आपले क्षेत्र बनवतात. 'बाणभट्ट की आत्मकथा' मध्ये हर्षवर्धनाच्या शासनकाळाच्या (इ.स. 606-47) काही वर्षांचे चित्रण येते. 'चारुचंद्र लेख' मध्ये गाहडवाल (गहरवार) चा राजा जयचंद्र (जयचंद) याचा पराभव झाला (1194) त्यानंतरचा काळ चित्रित झाला आहे (12 वे-13वे शतक). 'पुनर्नवा' मध्ये समुद्रगुप्ताचा काळ कादंबरीचा विषय बनला आहे (इ.स. सुमारे 330 पासून इ.स.380 पर्यंत) 'अनामदास का पोथा' उपनिषद् काळाबद्दल आहे. अशा प्रकारे त्यांच्या चारी कादंबऱ्या ऐतिहासिक अथवा प्रागैतिहासिक काळावर आधारित आहेत. परंतु ते ऐतिहासिक दस्तऐवज मात्र नाहीत. द्विवेदींनी ऐतिहासिक सत्य, तथ्य, घटना यापेक्षा साहित्यिक, सांस्कृतिक सामग्री लेखनाधार म्हणून वापरली आहे. त्यांचा मुख्य स्रोत साहित्य व लोकजीवनातून उपलब्ध होणाऱ्या दंतकथा आहेत. या कादंबऱ्यांमध्ये इतिहासाचे फक्त निमित्त करून ते आपल्या प्रतिभेने व सर्जनशीलतेने आपली कल्पना साकार करतात. सनावळी व घटना यांचा आग्रह ते धरत नाहीत. ही त्यांच्यासाठी बाह्य तत्त्वे आहेत. त्यांच्या पलीकडे जाऊन जीवनाचे वास्तविक स्पंदन ते पकडू पाहतात. त्या काळाची संस्कृती, समाजरचना, मानसशास्त्र आणि आचारविचार उजेडात आणू पाहतात. आपल्या कादंबऱ्यांना ते वारंवार 'गप्प' (किस्सा) असे संबोधन वापरतात हे उल्लेखनीय आहे, या द्वारे ते स्वत:ला 'ऐतिहासिक तथ्यां'च्या बंधनातून मुक्त करून घेतात. यासंबंधात त्यांचे एक महत्त्वाचे पत्र उद्धृत करणे सयुक्तिक ठरेल.[1] हे पत्र 'व्योमकेश शास्त्री'चे व हजारीप्रसाद द्विवेदींना लिहिलेले असे आहे... या दोन्ही व्यक्ती एकच आहेत हे सांगायला नकोच. या पत्रात व्योमकेश शास्त्री हे टीकाकाराच्या रूपात कादंबरीकार द्विवेदींना 'पुनर्नवा' कादंबरीवरची आपली प्रतिक्रिया लिहून कळवताहेत. प्रतिक्रिया केवळ 'पुनर्नवा'शी सीमित न होता, द्विवेदींच्या संपूर्ण कादंबरीबाबतच्या दृष्टिकोनाचा वेध घेते. व्योमकेश शास्त्री (अर्थात हजारीप्रसाद द्विवेदी) हजारीप्रसाद द्विवेदींना लिहितात :

1. **पत्र : हजारीप्रसाद द्विवेदी : (सं.) मुकुन्द द्विवेदी, पृ. 9-11**

''गप्पा मारणे कुणीही तुमच्याकडून शिकावे. काल्पनिक घटनांचा यात तुम्ही अशा तऱ्हेने समावेश केला आहे की आपण इतिहासच वाचत आहो असा भ्रम वाचकाला व्हावा! तसे तर, 'बाणभट्ट की आत्मकथा' लिहिलीत त्याही वेळी तुम्ही इथे-तिथे स्वत:चे श्लोकदेखील जोडून दिले होतेत. कराला देवीची स्तुती असाच एक श्लोक. एक निष्ठावान संस्कृतचे विद्वान त्याला प्राचीन संस्कृत श्लोक समजले. त्यांनी एकदा त्या श्लोकाचा असा अर्थ लावला की मी निश्चितपणे म्हणेन की त्याचा हा अर्थ तुम्ही स्वप्नातसुद्धा लावू शकला नसतात. आता तो किंवा दुसरा कोणीही स्वप्नात विचार करेल का आणि का करेल हे जरी कोणी सांगू शकणार नाही, तरीही माणसाचे मन अटकळ बांधत राहतेच ना! पण 'प्रतिवर्ष' मध्ये तर तुम्ही अपभ्रंश भाषेमधले दोहे आणि पदेसुद्धा रचून ठोकून दिली होतीत. तुम्ही इतरेजनांना हवे तर फसवू शकाल, पण माझ्यापासून तुमची कोणतीही गोष्ट दडून राहू शकणार नाही. या भ्रमात पडतील ते दुसरे कोणी असतील.

मला चांगले आठवते की तुम्ही 'हिंदी साहित्य का आदिकाल' निबंधात लिहिले होतेत की ''भारतीय कवींनी ऐतिहासिक नावे मात्र घेतली, पण त्यांची शैली तर तीच पुराणी राहिली आहे ज्यात काव्य-निर्मितीकडचा कल विवरण-संग्रहापेक्षा जास्त होता. कल्पनाविलासाला महत्त्व जास्त होते, तथ्याचे निरूपण करणे याला कमी. संभाविताकडे जास्त ओढा होता, घटनांकडे कमी. उल्हसित आनंदाची ओढ जास्त होती. विलसित तथ्यांच्याबद्दल फारशी ओढ नव्हती. अशा प्रकारे इतिहासाला कल्पनेपुढे नमते घ्यावे लागले. या काव्यांमध्ये, कल्पनेला चेतवण्याचे साधन म्हणून ऐतिहासिक तथ्यांकडे पाहिले गेले आहे. राजाचा विवाह, शत्रु-विजय, जलक्रीडा,पर्वत-विहार, वन-विहार, नृत्य-संगीत या सगळ्या गोष्टींनाच प्राधान्य मिळाले आहे. क्रमश: इतिहासाचा अंश कमी होत गेला आणि संभाव्य गोष्टींचे महत्त्व वाढत गेले. राजाला शत्रू असतात व युद्ध होते. इतिहासाच्या दृष्टीने एक युद्ध झाले पण आणखीही होऊ शकली असती. कवी शक्यतेकडे बघेल. राजाचे एकाहून अधिक विवाह होत होते ही वस्तुस्थिती अनेक विवाहांची शक्यता उत्पन्न करते, जलक्रीडा व वनविहाराची शक्यता सुचवते आणि कवीला आपल्या कल्पनेचे पंख पसरण्याची संधी देते. उत्तरकालातल्या ऐतिहासिक काव्यांमध्ये याचा सुकाळ आहे. इतिहास-तज्ज्ञांना यात संगती लावणे कठीण होऊन बसते.'' मी त्यावेळी तुम्हाला विचारले होते की ''हे तुमच्या मते चांगले की वाईट?'' यावर तुमच्या सरळ उत्तर न देण्याच्या पद्धतीने तुम्ही म्हटले होते, ''आधुनिक इतिहास-तज्ज्ञ त्रागा करतात, पण जे सहृदय आहेत, रसिक वृत्तीचे आहेत त्यांना तर हे चांगलेच वाटते.'' मी तुम्हाला पुन्हा प्रश्न विचारला होता की, ''आजच्या युगात अशा प्रकारचे एखादे रस-प्रधान कथाकाव्य लिहिले गेले तर...?'' तुम्ही हसून म्हणाला होतात, ''एखाद्या ताकदीच्या कथाकाराने हा प्रयोग केला आणि इतिहास-रस शाबूत ठेवून या विशुद्ध भारतीय दृष्टिकोनातून 'लिजेण्डरी' कथानिर्मितीचा प्रयत्न केला तर परिणाम चांगलासुद्धा होऊ शकतो.'' मी म्हटले होते, ''एखाद्या समर्थ कथाकाराची वाट पाहण्याऐवजी तुम्ही स्वत:च असा प्रयोग केलात तर कसे?''



यावर तुम्ही, मला वाटते अगदी प्रांजलपणेच म्हणालात की, ''प्रयोग केल्यामुळेच उत्तम निर्मिती होते असे नाही!'' आणि पुढे अन्यमनस्क भावनेने म्हणालात, ''करून पाहायलेही जाऊ शकते.'' खूप जुनी आहे गोष्ट, मला सांगता नाही येणार की तुम्हाला त्यावेळची बोलणी लक्षात आहेत की नाहीत. पण 'पुनर्नवा' वाचल्यानंतर मी या निश्चित निष्कर्षापर्यंत पोचलो की तुम्ही प्रयोग करून टाकलेला आहे. तुम्ही माझ्याबद्दल म्हणत असता की मी टीकाकार आहे; सहृदय नाही. तरीही हा साहित्यिक प्रयोग मला आवडला आहे, जो सहृदयांसाठीच लिहिला गेला आहे, तो खरेच आवडला आहे. मला असे वाटते की, कथेमध्ये साहित्य-रस असणे आवश्यक असते ही गोष्ट आजकालचे आधुनिक कथाकार विसरूनच जातात. मला आनंद वाटतो की तुम्ही हे विसरला नाहीत...

मला ठाऊक आहे की तुम्ही कंटाळवाणी कामे करून जेव्हा थकून जाता तेव्हा तुम्हाला अशा प्रकारच्या गप्पाष्टकांच्या निर्मितीतून विश्रांती मिळते. 'कालिदास की लालित्य-योजना' लिहिताना तुमच्या मन:पटलावर कित्येक मूर्ती उभ्या राहिल्या. तुम्हाला त्यांना साकार करायचे होते. शोधकार्यामध्ये पावलोपावली सिद्ध करण्याची आवश्यकता असते आणि कल्पनेला होता होईल तितके दूरच ठेवण्याचा प्रयत्न होतो. तुम्ही कंटाळला होतात. 'भावानुप्रवेश' ही गोष्ट प्रत्यक्षच साकार करण्याची तुमची मनीषा होती. या कारणामुळे तुम्ही 'पुनर्नवा' ची सुरुवात केली होतीत.''

द्विवेदींच्या पत्रातून हे प्रदीर्घ अवतरण येथे देण्याचे प्रयोजन म्हणजे त्यांच्याच शब्दांत त्यांची कादंबरी-रचनेची प्रक्रिया समोर ठेवणे हे आहे. अत्यंत तटस्थतेने त्यांनी आपल्या कादंबऱ्यांची जी वैशिष्ट्ये अधोरेखित केली आहेत, खरोखर तीच त्यांच्या कादंबऱ्यांची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये ते काल्पनिक घटनांचा समावेश करतात आणि वाचकाला त्या सत्यच वाटाव्या असा आभास निर्माण करतात. त्यांचा रोख वृत्तान्तांच्या संग्रहांकडे आणि तथ्ये सांगण्याकडे कमी असतो, तर इतिहासातील शक्यतांकडे अधिक असतो. इतिहास-रस ते कायम ठेवतात आणि विशुद्ध भारतीय दृष्टिकोनातून 'लीजेण्डरी' कथांचा प्रयोग करतात. कथेमध्ये साहित्यिक रसपूर्णतेची एक अद्‌भुत सृष्टी ते निर्माण करतात. द्विवेदींचे चिंतन जसे पाश्चिमात्य प्रभावापासून मुक्त आहे तशीच त्यांची साहित्य-निर्मितीक्षमताही. त्यांच्या कादंबऱ्यांची जडणघडण पूर्णपणे भारतीय आहे. ह्या कादंबऱ्या 'वास्तववादी' म्हणता येणार नाहीत. त्या अगदी वेगळ्या प्रकारच्या आहेत. कथाप्रधान व साहित्य-रसाने ओथंबलेल्या. या दृष्टीने त्या हिंदी साहित्यात अद्वितीय आहेत. त्यांची कलात्मक घडण आणि भाषा अप्रतिम आहे. या संदर्भात त्यांची तुलना दुसऱ्या लेखकांच्या कादंबऱ्यांशी होऊ शकत नाही.

द्विवेदींची स्वत:च्या भाषेवर पूर्ण हुकमत आहे. संस्कृत भाषेच्या पांडित्याची छाया त्यांच्या भाषेवर पसरलेली असते. वर्णन-कौशल्यासाठी ते प्रसिद्ध आहेत. निसर्गदृश्य असो वा नागरी, वा नृत्य वा संगीत त्यांची वर्णने अत्यंत रोचक असतात. त्यांच्या कादंबऱ्यांची भाषा बरीचशी काव्यात्मक व अलंकृत असते व तरी कधीही ती कृत्रिम वाटत नाही. 'बाणभट्ट की आत्मकथा' मधली प्रदीर्घ अन्तहीन काव्यात्मक वाक्ये संस्कृत कवी बाणभट्टाच्याच शैलीचे अनुकरण करतात. कादंबरीकाराचीच

ही रचना आहे असा आभास ती उत्पन्न करू पाहतात. यातील वर्णन इतिवृत्तासारखे नाही तर चित्रोपम आहे. प्रतिमाधर्मिता या भाषेचे वैशिष्ट्य आहे. त्यात एक संगीतात्मक लय आहे. ओघवती भाषेचा असा प्रवाहीपणा हे द्विवेदींच्या इतर कादंबऱ्यांचेही वैशिष्ट्य आहे. ती सूक्ष्म असे अनुभव आणि भावभावनांच्या सूक्ष्म छटा व्यक्त करू शकणारी एक अत्यंत समर्थ भाषा आहे. तिच्यात संस्कृतनिष्ठ समास आहेत तशीच लोकभाषेची सहजताही. या दोन्ही रूपांचा ते सहजतेने वापर करतात. शास्त्रीय भाषेच्या ओघात मध्येच अचानक ग्रामीण घरगुती भाषा येते. भाषेला ते भावानुभव, परिस्थिती आणि पात्रांना अनुकूल अशी वाकवून घेतात हे त्यांचे विशेष कौशल्य आहे. त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये संस्कृतचे अप्रचलित शब्द मिळतील तसे अरबी, फारसीचे प्रचलित शब्द आणि ग्रामीण घरगुती लोकभाषेमधले शब्ददेखील. मधेमधे ते हास्यविनोदाचे व विडंबनाचे असे प्रसंग गुंफतात की वातावरणामधले सारे दडपण निघून जाते.

काही विद्वान द्विवेदींची भाषा क्लिष्ट आहे असेही म्हणतात. पण त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये हा चमत्कार काही प्रयत्नपूर्वक घडवलेला नाही, तर ही भाषा देश, काल, परिस्थिती यांच्या स्वाभाविक मागणीनुसार बनली आहे. भाषेच्या संबंधात स्वतः द्विवेदी त्यांच्या 'मनुष्यही साहित्य का लक्ष्य है' या निबंधात लिहितात :

''माणूस आपला उदरनिर्वाह, निद्रा इ. ची साधने मिळवण्यासाठी जी भाषा वापरतो ती त्याला विनासायास उपलब्ध झालेली भाषा असते. पण जर माणसाला अधिक उन्नत स्थान मिळवून द्यायचे असेल तर एवढ्याने भागणार नाही. सहज भाषा आवश्यक आहे. सहजचा अर्थ आहे सहजपणेच, स्वाभाविकतेनेच महान बनवणारी भाषा. पण म्हणजे रस्त्यावरून गोळा केलेली भाषा नव्हे. सरळ रेषा काढणे कठीण काम असते. सहज भाषा अवगत करून घ्यायला कठोर तप आवश्यक आहे. जोवर माणूस सहज, 'स्वाभाविक' नाही तोवर त्याची भाषा सहज होईल हे अशक्य आहे. स्वदेश, विदेशीच्या वर्तमान व भूतकाळातल्या समस्त वाङ्मयाचा रस पिळून काढावा तेव्हा तो सहज भाव प्राप्त होतो. एक सामान्य माणूस काय बोलतो किंवा काय बोलत नाही या गोष्टीवरून 'सहज भाषे'चा अर्थ पक्का केला जाऊ शकत नाही. काय बोलण्याने वा काय न बोलण्याने माणूस त्या उच्चतम आदर्शाप्रत पोचू शकेल (ज्याला थोडक्यात 'मनुष्यता' म्हणतात) हीच मुख्य बाब आहे.''[1]

असे म्हणता येईल की द्विवेदींच्या कादंबऱ्यांची भाषा रस्त्यातून गोळा करून संग्रहित केलेली भाषा नाही, उलट एका सहज ढंगाने मनुष्याला उच्च आदर्शाकडे नेणारी, त्याला महान बनवणारी भाषा आहे.

'पुनर्नवा' कादंबरी सोडून आपल्या उर्वरित तिन्ही कादंबऱ्यांमधून द्विवेदी वाचकाला चकवण्यासाठी कादंबरीतच एक मायावी सृष्टी तयार करतात. 'बाणभट्ट की आत्मकथा' व 'चारुचंद्रलेख' मध्ये आरंभस्थानी 'कथामुखा'ची आणि अखेरीस 'उपसंहारा'ची योजना करून ते मूळ लेखकाबद्दल आभास निर्माण करतात. 'अनामदास का पोथा' मध्येही अनामदास नावाचे एक कल्पित पात्र आरंभी व

1. हजारीप्रसाद द्विवेदी ग्रंथावली, खंड 10,पृ. 33



अखेरीस उपस्थित केले जाते. द्विवेदींचे हे तंत्र म्हणजे या कादंबऱ्यांमध्ये सर्जनशील स्वातंत्र्य घेण्याचे एक साधन ठरते. प्रथमच म्हटले त्याप्रमाणे ते ऐतिहासिक तथ्यांमध्ये संभाव्य घटनांचा आणि लीजेण्डरी कथांचा एक विचित्र समावेश करतात.

'बाणभट्ट की आत्मकथा' कादंबरीची पार्श्वभूमी हर्षकालीन भारत आहे. 'कादंबरी' चा प्रसिद्ध लेखक बाणभट्ट याचे जीवनवृत्त यात द्विवेदींनी 'आत्मकथे'च्या रूपात सादर केले आहे. कथेचा बहुतांश भाग 'कादंबरी' आणि 'हर्षचरितसार' यांवर आधारित आहे. कादंबरीची शैलीसुद्धा द्विवेदींनी 'कादंबरी' च्या शैलीशी मिळती-जुळती ठेवली आहे. विशेषतः दृश्य वर्णनांच्या बाबतीत. अनेक प्रसंग त्यांनी रत्नावली, कुमारसंभव, मेघदूत, मृच्छकटिक, नाट्यशास्त्र, महाभारत इ. ग्रंथांच्या आधारे समृद्ध बनवले आहेत. भारतीय परंपरा, आचार-विचार, उत्सव, राहणी तसेच निसर्गाचे चित्रण वगैरेंच्या संदर्भांना प्रामाणिकता देण्यासाठी त्यांनी वरील ग्रंथांचा आधार घेतला आहे.

'बाणभट्ट की आत्मकथा' मध्ये बाणभट्ट, हर्षवर्धन, राज्यश्री व कुमार कृष्णवर्धन ऐतिहासिक पात्रे आहेत. बाणभट्ट हर्षवर्धनाच्या दरबारात जाऊन त्याचा सभापंडित बनतो हा भाग इतिहासप्रसिद्ध आहे. इतिहास ग्रंथांमध्ये हर्षवर्धनाच्या चुलतभावाचा उल्लेख मिळत नाही. पण 'हर्षचरित्सार' मध्ये मात्र 'कृष्णवर्धन' चा उल्लेख मिळतो. आत्मकथेमधील इतर पात्रे- तुवरमिलिंद, लोरिकदेव, भट्टिनी, निपुणिका, सुचरिता वगैरे लेखकाची कल्पनासृष्टी आहे. तुवरमिलिंद भट्टिनीचा पिता आहे. कादंबरीत तो प्रत्यक्ष रूपाने येत नसला तरी त्याचे उत्तुंग व यशस्वी चरित्र साऱ्या कादंबरीवर आपला प्रभाव टाकून राहते. त्याच्यासाठी कादंबरीत जी विशेषणे वापरली आहेत त्यावरून तो भारताच्या पश्चिम-उत्तर म्हणजे वायव्य सीमेजवळचा कोणी महान शक्तिशाली नरेश असल्याचे स्पष्ट होते. द्विवेदींनी स्वतःच म्हटले आहे की 'ऐतिहासिक दृष्टीने तुवरमिलिंद एक समस्या आहे.' याच प्रकारे लोरिकदेव सुद्धा एक समस्या बनतो. लेरिकदेवाची चर्चा लोकसाहित्यात आहे, पण इतिहास-ग्रंथांमध्ये नाही. द्विवेदींनी येथे त्याला हर्षवर्धनाचा समकालीन (इ.स.606-47) दाखवला आहे आणि 'पुनर्नवा' मध्ये समुद्रगुप्ताचादेखील (सुमारे 330 ते 380) ऐतिहासिक काळाच्या दृष्टीने हे असंभवनीय आहे.

'चारुचंद्र लेख' मध्ये चंद्रलेखा, गोरखनाथ, सीदी मौला, इ. पात्रे ऐतिहासिक आहेत तर बोधा, मैना, विद्याधर इत्यादि काल्पनिक आहेत. या कादंबरीत पृथ्वीराजाचा पराभव, जयचंद्राचा मृत्यू, कालिंजर दुर्गाचे पतन, सारनाथ व नालंदा इथल्या विहारांचा विध्वंस, लक्ष्मणसेनाचा मृत्यू इ. ऐतिहासिक घटनांचे उल्लेख आले आहेत. या घटना भारताच्या इतिहासात सुमारे 1190 पासून 1205 या दरम्यान घडल्या. या अवधीमध्ये, माळव्याचा नरेश सातवाहन व त्याच्या सेनेने केलेला तुर्कांचा पराजय यांचे वर्णन ही केवळ एक ऐतिहासिक शक्यता, संभावना आहे. द्विवेदी कल्पनेने याचा उपयोग करतात. त्या काळात उत्तर भारतातल्या राजकीय हालचाली लक्षात घेता ही कल्पना अस्वाभाविक वाटत नाही.

'पुनर्नवा'मध्ये समुद्रगुप्त एक ऐतिहासिक चरित्र आहे. यातले दुसरे एक चरित्र

चंद्रमौलीचे आहे. वस्तुत: संस्कृत कवी कालिदासाहून ते वेगळे नाही. यातील बाकीची जवळजवळ सर्व पात्रे- देवरात, गोपाल आर्यक, श्यामरूप, सुमेरकाका, मंजुला, मृणाल मंजरी, चंद्रा वगैरे लेखकाच्या कल्पनेची निर्मिती आहेत. यापैकी काही चरित्रे लोकांमध्ये प्रचलित असलेली अशी आहेत. त्यांची ऐतिहासिकता देखील लोकांच्या त्यांवरील विश्वासापुरतीच आहे. द्विवेदींनी लोरिक-चंद्राची लोककथा, शूद्रकाच्या 'मृच्छकटिक' मधले काही प्रसंग तसेच 'मातृगुप्ता' ला कालिदासाच्या रूपात स्वीकारून एक कल्पनेतली सृष्टी बनवली आहे. 'पुनर्नवा'तील पात्र-चित्रणाबद्दल व्योमकेश शास्त्री या टोपणनावाने लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात:

''मला ठाऊक आहे की 'पुनर्नवा' मधील पात्रे वास्तवजीवनातून घेतली गेली आहेत. कथा घडवली गेली आहे तो सर्व परिसर तुमच्या आत्मीयतेचा आणि अत्यंत परिचयाचा असा आहे. हलद्वीप आधुनिक 'हल्दीप' आहे. द्वीपखंड 'दुबहड' आहे; च्यवन भूमी 'जप' हीच आहे हे तर अंदाजानेही लोकांना समजू शकते. पण द्वीपखंडामधले 'सरस्वती-विहार' ही तुमची स्वत:ची जन्मभूमी आहे ही गोष्ट फारच थोड्यांना समजू शकेल. मी तुमचा अत्यंत जवळचा, त्यामुळे चंद्रा आणि सुमेरकाकांना ओळखतो. शामरूप आणि गोपाल आर्यक यांनाही चांगलेच ओळखतो आणि आर्य देवरात सुद्धा माझ्या माहितीतले आहेत. या चरित्रांना त्यांच्या सामान्य स्तरावरून जिथे-जिथे तुम्ही वर उचलले आहे तेही वास्तवाच्याच आधारावर असा माझा विश्वास आहे. पण या प्रसिद्ध गावांना तुम्ही जो मोठेपणा दिला आहे ते तुमचे खास कर्तृत्व आहे. कुणा दुसऱ्याच्या हाती त्यांची काही वेगळीच गत झाली असती. प्रत्येक लेखकाचे स्वत:चे व्यक्तित्व आणि संस्कार असतात व त्याच्या पात्रांवर त्यांचे आरोपण होते. पण विश्वास ठेवा की ही चरित्रे व पात्रे आजदेखील जिवंत आहेत. या परिसरातल्या खेड्यांमधून फिरताना मला असे आढळले की ही पात्रे केवळ पुस्तकात बंदिस्त नाहीत तर ती प्रत्यक्ष दिसतात, संभाषण करतात आणि जे सहृदय आहेत अशांना एक अप्रकट आवाहन करतात की ''मला जाणून, समजून घ्या आणि उजेडात आणा...

तुम्ही धाडसाने 'मृच्छकटिक' मधल्या गोपाल आर्यकाला लोककथेतल्या प्रसिद्ध लोरिकशी आणि शर्विलकाला लोककथेतल्या साँवरूशी एकरूप करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याबरोबरच चारुदत्त आणि वसंतसेनेच्या कथेला तिच्यावरच्या ऐतिहासिक आवरणाखालून बाहेर काढून एका स्वयंभू कथेत आणण्याचे साहसही केले आहे. पण त्याच साहसाने आणि स्पष्टतेने कालिदासाला मात्र उभारू शकलेला नाहीत. मध्येच अडखळला आहात. मी तुम्हाला सुचवू इच्छितो की ही त्रुटी तुम्ही दूर करावी- भले त्यासाठी तुम्हाला आणखी एखादी 'गप्पागोष्टी' करण्याची योजना बनवावी लागो.[1]

'अनामदास का पोथा' उपनिषद काळाचे चित्रण करणारी कादंबरी आहे व तिचे आख्यान 'छान्दोग्य' व 'बृहदारण्यक' या उपनिषदांवर आधारलेले आहे.

1. पत्र: हजारीप्रसाद द्विवेदी: (सं.) मुकुंद द्विवेदी: पृ. 10-11



इतर काही उपनिषदांमधूनही सामग्री घेतली गेली असावी. कारण हिचा आधार ऐतिहासिक काळ नाही. त्यामुळे येथे ऐतिहासिक सत्यता पडताळून पाहणेही कठीण आहे. या कादंबरीमधली काही चरित्रे उपनिषदांमधून घेतली गेली असली तरी अधिकांश लेखकाच्या कल्पनेची निर्मिती आहे. रैक्व, जनश्रुती, जाबाला आणि औषस्ति छांदोग्यामधून घेतली आहेत. ऋजुका, माया, अरुंधती, जटिल मुनी ही काल्पनिक पात्रे आहेत. तसे तर ज्या पात्रांना उपनिषदांचा आधार आहे तीही मुख्यत: लेखकाच्या कल्पनेनेच घडवली, साकारली आहेत.

द्विवेदींच्या कादंबऱ्यांमधून स्त्रीपात्रांना विपुल महत्त्व मिळाले आहे. 'बाणभट्ट की आत्मकथा' मधे भट्टिनी व निउनिया, 'चारुचंद्रलेख'मध्ये चंद्रलेखा व मैना, तसेच 'पुनर्नवा'मधल्या चंद्रा व मंजुला ही काही चरित्रे. निउनिया, मैना व चंद्रा यांची पात्रे अत्यंत क्रियाशील व गतिशील आहेत. वास्तविक स्त्री-विषयक त्यांचा दृष्टिकोन एक तात्त्विक दृष्टिकोन आहे. ते स्त्रीला 'शक्ती-रूपा' मानतात. त्यांच्या मते पुरुषाने स्त्रीला नीट प्रकारे समजून घेण्याचा प्रयत्न केलेला नाही. नाहीतर दु:ख आणि यातनांचाच हा भवसागर असाच राह्यला नसता. स्त्री म्हणजे नगण्य असे समजून पुरुष तिची उपेक्षा करतो, पण स्त्रीच्या सहयोगाशिवाय त्याचा पुरुषार्थ वांझोटा आहे हे त्याला समजत नाही. गृहस्थाश्रमाचे ते समर्थक आहेत आणि स्त्रीचा त्याग करून केलेली तपस्या ही जगातली सर्वात मोठी चूक आहे असे ते मानतात. 'बाणभट्ट की आत्मकथा' मध्ये त्यांनी स्त्रीचे एक परम आदर्शरूप म्हणून भट्टिनीचे पात्र रंगवले आहे. भट्टिनीच्या संपर्कात बाणभट्टाची मनुष्यता देवत्वाच्या दिशेने अग्रेसर झालेली दिसते. स्वत: बाणभट्ट नारी देहाला ईश्वराचे मंदिर मानतो. द्विवेदींनी निपुणिकेच्या रूपाने स्त्रीच्या आत्मबलिदानाचे एक दुर्मिळ चित्र रंगवले आहे जे प्रेमाच्या सात्त्विक रूपाची अंतिम परिणती म्हणता येईल. 'पुनर्नवा' मधली मंजुला एक नर्तकी आहे पण लेखकाने ज्या तऱ्हेने तिचे चरित्र गौरवास्पद केले आहे, तिची वेदना सहानुभूतिपूर्वक चित्रित केली आहे व सात्त्विक सुहृदाप्रमाणे तिची पवित्रता अधोरेखित केली आहे ती सर्व किमयाच अद्भुत आहे. उदात्त आणि महान चरित्रांची निर्मिती करणे द्विवेदींना अधिक रुचते. त्यांची पात्रे विद्वान, योद्धे, कला-रसिक आणि परदु:खाने व्यथित होणारी अशी असतात. त्याग, बलिदान आणि प्रेम यांचा एक अंत:प्रवाह त्यांच्यामध्ये असतो. बाणभट्ट, निपुणिका, भट्टिनी, चंद्रलेखा, देवरात, मंजुला, गोपाल आर्यक, चंद्रा रैक्व, शुभा इत्यादी चरित्रे अशा प्रकारची आहेत. अधेमधे देवदर्शन, स्वप्नदर्शन, सिद्धी...वगैरे चमत्कारही येतात, पण द्विवेदी त्यांचे मानसशास्त्रीय विश्लेषणाने स्पष्टीकरण करून ती विश्वसनीय बनवण्याचा प्रयत्न करतात. पात्रांच्या मनातील खळबळीचे, हालचालींचे खोल विश्लेषण व प्रकटन करण्याकडे त्यांचे विशेष लक्ष असते. त्यांच्या कादंबऱ्यांवर एक आरोप असा केला गेला होता की त्यात स्त्री-पुरुष प्रेमाचे मुक्त-चित्रण आढळत नाही. 'बाणभट्ट की आत्मकथा' मध्ये भट्टिनी, निपुणिका आणि स्वत: बाण यांच्यात प्रेमाचा एक अव्यक्त अंतस्रोत प्रवाहित असलेला जाणवतो. 'पुनर्नवा' मध्येदेखील देवरात व मंजुलाचे प्रेम आतल्या आत दबलेलेच राहून जाते. स्त्री-पुरुष प्रेमाबद्दल एक सलज्ज संकोच

द्विवेदींच्यात आहे असे वाटते. पण 'पुनर्नवा'मध्ये गोपाल आर्यक आणि चंद्रा याच्यामधला प्रेमप्रसंग वेगळ्या प्रकारचा आहे. चंद्राची उन्मादी शारीर-प्रेमाची लालसा तेथे दिसते- द्विवेदींवरचा वरील आरोप खोटा ठरावा अशा तऱ्हेच्या चित्रणामधून. एके ठिकाणी ते मान्य करतात :

''गणिका असूनही मंजुला जे साहस करू शकली नाही ते साहस कुलवान स्त्री असलेल्या चंद्राने केले. या उद्दाम प्रेमाचे उदाहरण शोधणे कठीण आहे.''[1]

आज ज्या स्त्री-स्वातंत्र्याची, स्त्री-मुक्ती आंदोलनाची चर्चा होत आहे ते सारे त्या युगातल्या पात्र-चरित्रांमध्ये दाखवून द्विवेदींनी या कादंबऱ्यांना साच्याच्या, चौकटीच्या बाहेर काढण्याचा प्रयत्न केला आहे.

मृणाल विचार करते :

''केवळ पुरुष- शक्तीची पूजा हाच स्त्रीधर्म? सिंहवाहिनीच्या उपासनेचा अर्थ एवढाच की महिष-मर्दनाचे काम पुरुषांवर सोडून स्त्रियांनी त्यांची केवळ आरती ओवाळावी? पुढे होऊन अधर्माचाराचा नायनाट करणे हा स्त्रियांचा धर्म नव्हे? स्त्रीला पुरुषाची सहधर्मचारिणी बनून रहावे लागते पुरुषाने युद्ध करावे व स्त्रियांनी त्यांना आरती ओवाळत राहावे हा कोठला सहधर्म?''[2]

द्विवेदींच्या कादंबऱ्यांमध्ये, आकस्मिक योगायोगांनी पुढे सरकणारी कथा ही त्यांच्या कथेच्या रचनेच्या, घडणीच्या संदर्भात व कादंबरीच्या अंतर्गत निर्मित वास्तवाच्या संदर्भात जाणवणारी एक त्रुटी आहे. प्रत्येक पात्र अचानक भेटणे काहीसे अनैसर्गिक वाटत राहते. 'प्रसाद' यांच्या नाटकांमधल्या योगायोगांचे येथे स्मरण होते. द्विवेदींमध्ये कथेचा आग्रह इतका आहे की प्रत्येक कथा-प्रसंग, तो पूर्ण झालाच पाहिजे असे वाटत असल्यासारखे त्याचे अखेरपर्यंत वर्णन ते करतात– मग वाचकाचे कुतूहल त्याआधीच शमले असले तरीही. जेव्हा कथा पुढे गेलेली असते तेव्हा तिच्यातले घटना, प्रसंग नंतरच्या प्रकरणासाठी निरर्थक झालेले असतात. पात्रांविषयी स्पष्टीकरण करण्यासाठी देखील लेखकाने कथेला काही जागी अनावश्यक तऱ्हेने पुनरावृत्त केले आहे. ही त्रुटी त्यांच्या सर्वच कादबऱ्यांमध्ये आढळेल. कथेमधले दैवी शक्तींचे चमत्कार वगैरेही कादंबरीच्या अंतर्गत वास्तवाला बाधा आणतात पण अशा जागांवर कथेला तांत्रिकांशी, साधकांशी संबंधित करून द्विवेदी कथांतर्गत वास्तवाचे रक्षण करतात. घटनांच्या ऐतिहासिकतेबद्दल ते पुरेसे जागरूक नाहीत हे निःसंशय. काही जागी ते आपल्या कल्पनाशक्तीच्या स्वच्छंदपणाचा प्रत्यय देतात. पण खरी गोष्ट अशी आहे की इतिहासाचे दर्शन घडवणे हे त्यांचे उद्दिष्टच नसते. ते कथेला एखाद्या ऐतिहासिक घटनेशी वा व्यक्तीशी संबद्ध करून कथेला जणू काही इतिहासाची संमती आहे असा आभास निर्माण करतातही, पण मधेमधे काल्पनिक घटना व लोककथा यांना अशा कौशल्याने त्यात गुंफतात की वाचक त्या कथांची सत्यासत्यता, संगती-असंगती याबद्दलचा विवेक विसरून जातो. संमोहित झाल्याप्रमाणे जणू त्या ऐतिहासिक दृष्ट्याही सत्य आहेत असे मानू लागतो. वस्तुतः द्विवेदींना विशिष्ट

1. पुनर्नवा, पृ. 273.
2. किता, पृ. 41



कालामधली जीवनप्रणाली, प्रेरणा यांचे चित्रण- विश्लेषण करावयाचे असते. त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये म्हणूनच ऐतिहासिक घटनांपेक्षा तत्कालीन जीवन व संस्कृतीचे विश्वसनीय चित्र शोधणे अधिक सार्थ ठरेल.

'बाणभट्ट की आत्मकथा' मध्ये तत्कालीन समाज-व्यवस्था, संस्कृती व राजकारणाचे अत्यंत प्रामाणिक चित्रण झाले आहे– जेथे एका बाजूला भारतावर विदेशी आक्रमणे होताहेत व दुसरीकडे भारतीय समाज अनेक वर्ग, जाती यात विभाजित झाला आहे.

भट्टिनी म्हणते :

''मी अनेक देश पाहिले आहेत. अनेक जाती बघितल्या आहेत. परंतु आर्यावर्तासारखी विचित्र व्यवस्था मी कुठेच पाहिली नाही. इथला एवढा स्तर-भेद पाहून आश्चर्य वाटते की इथले लोक जगतात तरी कसे.'' आर्यावर्ताची जनता राजकारणाच्या दृष्टीने उदासीन आणि तटस्थ आहे. महामाया भैरवी आपल्या ओजस्वी भाषणात देशाच्या युवकांना संबोधित करते. देवपुत्रांची, राजे-महाराजांची आशा सोडून स्वतः संघटित व्हायला व म्लेंच्छवाहिनीचा सामना करायला त्यांना उद्युक्त करते. ती आर्यावर्तातल्या ब्राह्मण आणि चांडाळांना एकत्र येण्याचा संदेश देते. या कादंबरीतून, मंगल प्रसंगी होणारे समारंभ, मिरवणुका, मदनोत्सव, उपवन-विहार, नृत्य, हर्षाची राजसभा, युवराजाच्या अंतःपुरामधली व्यवस्था, नाटकातील अभिनय, मदनोत्सवप्रसंगी नगरवासीयांचा उत्साह, त्यांची वेशभूषा वगैरेंचे कलात्मक वर्णन येते. त्या काळच्या समाजात ब्राह्मणाला विशेष मान होता. उच्च वर्गातल्या स्त्रियांसाठी पडद्याची पद्धत होती. राजांच्या अंतःपुरांमध्ये कोणाही बाह्य व्यक्तीच्या प्रवेशावर कडक बंदी असे. हर्षकालीन भारतातली सामाजिक-राजकीय व्यवस्था, इथली विलासिता, कामुकता व विलासप्रियता वगैरेंचे जे वर्णन 'बाणभट्ट की आत्मकथा' मधे झाले आहे ते काल्पनिक नसून तत्कालीन काव्य-ग्रंथांच्या साक्षींवर साकार केले गेलेले आहे.

'चारुचंद्रलेख' मध्ये देशातील राजकीय-धार्मिक अराजकतेचे तसेच नाथपंथी योगी व वज्रपाणि सिद्धांचे चमत्कार इत्यादींचे विशेष वर्णन आले आहे. या कादंबरीत अंधविश्वास, परस्पर कलह, स्त्रियांचे शोषण यांनी जखडलेला समाज आपल्या जर्जर रूपात आपल्यासमोर येतो. तऱ्हतऱ्हेच्या साधना, तांत्रिक अनुष्ठानांची वर्णने यांची रेलचेल कादंबरीभर आहे. बाराव्या-तेराव्या शतकाचा काळ हा भारतीय इतिहासात राजकीय व सांस्कृतिक पतनाचा काळ आहे. या काळाची मृतप्राय झालेली चेतना या कादंबरीतून साकार होते. 'पुनर्नवा' कादंबरीत सरंजामी संस्कृती व तत्कालीन समाज-व्यवस्था यांचे चित्रण आहे. उज्जैनी व मथुरा नगरीचे वर्णन, राजदरबाराचे वर्णन, नृत्य-संगीतकलांचे विश्लेषण, मन्दिरे-मूर्ती यांचे वर्णन येथे विशेषत्वाने झाले आहे.

'अनामदास का पोथा' मध्ये उपनिषदकालीन संस्कृतीचे आश्रमातील जीवन, तत्कालीन लोकजीवन यांचे चित्रण येते. यात स्त्री-पुरुषांमधील स्वाभाविक आकर्षण आणि तृप्त प्रेम यांचे चित्रण करताना तत्कालीन 'प्रवृत्ती-मार्गाचे तत्त्वज्ञान द्विवेदींनी

स्पष्ट केले आहे. केवळ तप हा निवृत्ती मार्ग आहे. द्विवेदींना 'कर्मा'चा मार्ग, 'प्रवृत्ती मार्गा'चे तत्त्वज्ञान मान्य आहे. अरण्यातल्या एकान्त समाधीकडून जीवनाच्या दिशेने वाटचाल करणारी, व क्रियाशीलतेला प्रवृत्त करणारी अशी ही कादंबरी आहे.

मनुष्याच्या अंतरीच्या देवाला द्विवेदी खूप महत्त्व देतात. 'अंतर्यामी'चाच कौल ते प्रमाण मानतात. 'बाणभट्ट की आत्मकथा' मध्ये बाबा म्हणतात,

''बघ रे बाबा! तुझी शास्त्रंच तुला धोका देतायत. जे तुझ्या आत सत्य आहे त्याला दडपून टाकायला सांगताय्‌त. तुझ्या आत मोहन आहे त्याला विसरायला सांगताय्‌त. जे तुला पूज्य आहे त्याचाच त्याग करायला सांगताय्‌त.''[1]

'पुनर्नवा' मध्ये देवरात मंजुळेला म्हणतो :

''तुझा देव तुझ्याच अंतरात बसून संधीची वाट पहातो आहे: बाहेरची कुठली शक्ती कोणाचा उद्धार करत नाही. हा अंतर्यामीचा देवच उद्धार करू शकतो.[2]

या अंतर्यामीच्या देवाला प्रमाण मानले नाही म्हणून गोपाल आर्यकाची वीरता लोकापवादाच्या खडकावर आदळून चक्काचूर होऊन जाते. तो चंद्रा आणि मृणाल दोघींना सोडून देऊन वणवण हिंडतो. 'पुनर्नवा' चा लेखक लोकापवाद आणि लोकस्तुती दोन्ही खोटी मानतो. गोपाल आर्यक स्वप्न पाहतो आहे- जणू स्वप्नातली मृणाल त्याला म्हणते आहे :

''लोकांचे भय मिथ्या आहे. कर्तव्याचा निर्णय बाहेर पाहून नाही केला जात. तुझ्या निर्णायक तुझ्या आत आहे... 'लोकभय' ही प्रवंचना आहे, 'आत्मभय' अभेद्य कवच. कोण काय बोलताहेत, बोलू दे. तुझा अंतर्यामी काय म्हणतोय हे महत्त्वाचे आहे.[3]

लोकापवाद व लोकस्तुती दोहोंना दुर्लक्षून आपल्या अंतरात्म्याच्या आवाजाला महत्त्व देण्याबद्दल द्विवेदींनी इतर कादंबऱ्यांमधूनही सुचवले आहे. 'अनामदास का पोथा' मध्ये महर्षी औषस्ति म्हणतात;

''कोणाच्याही बोलण्यावर, तुम्ही स्वत: जोपर्यंत त्याची शहानिशा करत नाही तोपर्यंत विश्वास ठेवता कामा नये. तुझ्या अंतरंगात जो ईश्वर स्तब्ध राहाला आहे त्याला ओळख. तोच तुला योग्य मार्ग दाखवेल...तेच प्रज्ञारूप आहे![4]

द्विवेदी आतल्या देवाला इतके महत्त्व देतात याचा अर्थ जगाची उपेक्षा करत असा नाही. वस्तुत: ते ब्रह्मांडातल्या प्रत्येक अणूला देव मानत होते.[5]

त्यांच्या मताने :

''सारे चराचर जगत त्याच परम वैश्वानराची प्रत्यक्ष मूर्ती आहे व त्याचाच एक अंश तुझ्या अंतर्यामी प्रकाशित होतो आहे.''[6]

चिंतनाच्या या पातळीवर पोचल्यावर व्यक्ती आणि समष्टी यात काही अंतर उरत नाही. म्हणूनच द्विवेदी 'परम वैश्वानर' आणि 'महाअज्ञात' यांना समर्पित होण्याबद्दल

1. बाणभट्ट की आत्मकथा, पृ. 74. 2. पुनर्नवा, पृ. 22. 3. पुनर्नवा, पृ. 110.
4. अनामदास का पोथा, पृ.52 5. बाणभट्ट की आत्मकथा, पृ.74.
6. अनामदास का पोथा, पृ.132



बोलतात आणि मग सारे ज्ञानभांडार 'लोककल्याणा'च्या कसोटीवर घासून, पारखून पाहतात. 'अनामदास का पोथा' मध्ये रैक्व म्हणतात:

''माझ्याजवळ जर बुद्धीची परीक्षा घ्यायला आली तर गाडी ओढून त्या दीन-दुबळ्यांपर्यंत अन्न पोचवून द्यायला सांगेन तिला. यातच तिच्या बुद्धीचीही परीक्षा होऊन जाईल. माते, जी व्यक्ती दीन-दुबळ्यांची सेवा करू शकत नाही ती बुद्धीची परीक्षा काय करणार! मला आता थोडे-थोडे रहस्य उलगडायला लागले आहे. कोरडा वितंडवाद म्हणजे ज्ञान नव्हे.''[1]

द्विवेदी आत्मदानात माणसाची सिद्धी मानतात. हाच सूर त्यांच्या सर्व कादंबऱ्यांमधून ऐकू येतो. 'बाणभट्ट की आत्मकथा' मध्ये ''स्वत:ला नि:शेष भावाने देऊन टाका'' आणि ''पिळलेल्या द्राक्षांप्रमाणे (स्वत:ला) पिळून काढण्या''ची गोष्ट सांगितली गेली आहे. निपुणिका याचेच उदाहरण सादर करते. ' पुनर्नवा'मध्येही लेखकाच्या मतानुसार: ''खरे सुख, स्वत:च स्वत:ला द्राक्षाप्रमाणे घट्ट पिळून, निथालेला मधुरस वाटून टाकण्यात आहे.''[2]

मंजुला भावोत्कट होऊन उपस्थित होते व देवरातला हाच संदेश देते: ''तुला काही मिळवायचे आहे? कसे मिळवशील प्रभो! ईश्वराने तुला काही घेण्याची वृत्ती दिलेलीच नाही. तुझा स्वभाव देणाऱ्याचा आहे, वाटून टाकण्याचा आहे. स्वत:च स्वत:ला द्राक्षाप्रमाणे पिळून त्या महाअज्ञाताच्या चरणांवर उधळून देण्याचा आहे.''[3]

द्विवेदींच्या पात्रांच्या सात्त्विक प्रेमाचा अंत आत्मदानातच होतो. हे आत्मदान त्यांच्या मते सर्वांत मोठे तप आहे. 'अनामदास का पोथा' मध्ये ऋषी औषस्ति म्हणतात :

''सर्वत्र, आत्मानुभूतीचा प्रत्यक्ष मापदंड हा की दुसऱ्यांच्या सुखासाठी स्वत:ला द्राक्षाप्रमाणे पिळून काढावे आणि तसे स्वत:ला देऊन टाकावे. त्याहून मोठे तप मला माहीत नाही.''[4]

द्विवेदींनी आपल्या कादंबऱ्यांसाठी भूतकाळाचे क्षेत्र निवडले आहे; पण त्यांचा दृष्टिकोन भूतकाळवादी नाही, आधुनिक आहे. ते भूतकाळामधल्या शक्यतांना वर्तमानाच्या संदर्भात उजाळा देतात. त्यांची पुनर्रचना करतात. त्यांच्या कादंबऱ्या भूतकाळाचे वर्णन करत नाहीत वा तत्कालीन संस्कृतीच्या चित्रणातच अडकून पडत नाहीत. त्या कादंबऱ्यांमध्ये आधुनिक मानव आपल्या संपूर्ण सामर्थ्यानिशी उपस्थित असतो. आपले विचार, कल्पना, विजिगीषा आणि आपल्या रागासकट देखील. त्यांमध्ये आजचे सारे वातावरण आपल्या साऱ्या प्रश्नांसकट चित्रित झाले आहे.

द्विवेदींच्या कादंबऱ्या भूत आणि वर्तमानकाळातले अंतर मिटवतात. त्यांच्यामध्ये भूतकाळात वर्तमानाचे प्रतिबिंब दिसते आणि वर्तमानात भूतकाळाचे. ही एक प्रकारची अद्भुत फँटसीही आहे आणि वास्तवही. इतिहासही आणि कल्पनाही.

द्विवेदी आधुनिक संदर्भामध्ये भूतकाळाची नवी व्याख्या करतात. 'बाणभट्ट की आत्मकथा' मध्ये 'महावाराहा'चा वारंवार उल्लेख झाला आहे. पुराणकथेनुसार

1. कित्ता, पृ. 89 2. पुनर्नवा, पृ. 130 3. पुनर्नवा, पृ. 246
4. अनामदास का पोथा, पृ.59

विष्णूचा एक अवतार महावाराहाने पाण्यात बुडालेल्या पृथ्वीचा उद्धार केला होता. या कादंबरीतदेखील भट्टिनी पृथ्वीसारखी आहे व तिचा उद्धार बाणभट्ट करणार आहे. द्विवेदींनी महावाराहाच्या मिथ्यकथेचीच निवड का केली? आजच्या संदर्भात ही निवड अतिशयच अर्थवाही आणि महत्त्वपूर्ण आहे. चिखलात रुतलेल्या धरतीप्रमाणेच आज उच्च व आदर्श मानवमूल्ये सुद्धा मातीमोल झाली आहेत. त्यांचा उद्धार ही आजच्या युगाची सर्वात मोठी समस्या आहे. जाती-वर्गात जनशक्तीचे झालेले विभाजन त्या काळातील अशांती व विखुरलेपणाचे तर कारण होतेच, तेच आजच्याही अशांती व विखुरलेपणाचेही कारण आहे. भट्टिनी बाणभट्टाला म्हणते:

''तू जर एखाद्या यवनकन्येशी विवाह केलास तर ह्या देशात ती एक भयंकर सामाजिक बंडखोरी समजली जाईल. पण हे तर खरेच ना, की यवनकन्याही मनुष्य आहे आणि ब्राह्मण युवकही मनुष्यच आहे!''

भट्टिनीला जाणवते आहे की लोभाच्या, मोहाच्या, द्वेषाच्या अधीन होऊन माणूस पशुतेकडे चालला आहे. ती बाणभट्टाकडून अपेक्षा करते की तो या माणसाला संवेदनशील, आणि मृदू बनवू शकेल. ती बाणभट्टाला म्हणते:

''तू आर्यावर्ताचा दुसरा कालिदास आहेस. तुझ्या मुखावाटे निर्मळ वाग्धारा झरते... तुझ्या मुखात सरस्वतीचा निवास आहे. या म्लेंच्छ म्हणवल्या जाणाऱ्या निर्दय जातीच्या हृदयात तू संवेदना जागवू शकशील. त्यांना स्त्रियांचा आदर करायला शिकवू शकशील. बालकांवर प्रेम करायला शिकवू शकशील.''

प्रेम व करुणा या मनुष्यजातीच्या उच्चतम मूल्यांची तेव्हा जितकी गरज होती, आताही तितकीच गरज आहे.

'चारुचंद्रलेख' मध्ये द्विवेदी त्या युगातले द्वंद्व आणि साशंकता यामधून आजच्या युगाला जाणण्याचा, ओळखण्याचा प्रयत्न करतात. ते स्पष्ट म्हणतात की राजेरजवाड्यांचे युग संपले. आता आशेला कुठे जागा असेल तर ती प्रजेच्या संघटित शक्तीमध्ये. सिद्धी, चमत्कारांना विरोध करताना ते म्हणतात की या गोष्टी माणसाला काही देऊ शकत नाहीत. एक सामान्य शेतकरी ज्याच्या पोटात दया-माया आहे, खऱ्या-खोट्याचा विवेक आहे तोदेखील मोठ्यात मोठ्या सिद्धपुरुषापेक्षा महान आहे. या कादंबरीमधला सीदी मौला म्हणतो :

''मला स्पष्ट दिसते आहे, की आर्यावर्त सर्वनाशाच्या कड्यावर उभा आहे; फुटीरवृत्तीने जर्जर, स्वार्थांध, वासनांध ग्रहांनी वेढला गेलेला भारतवर्ष महानाशाकडे चालला आहे. सहज सरळ वृत्ती इथे अस्तित्वातच नाही. कपट-युद्धाने विजय मिळवायचा आहे तुम्हाला! मरीचिचा मायावी मृग आहे हा.. पण ह्या देशाला तोच माणूस वाचवेल, ज्याच्यापाशी सहज जीवनाचे कवच असेल, सत्याची तलवार आणि धैर्याचा रथ असेल, साहसाची ढाल असेल, मैत्रीचा पाश असेल आणि धर्माचे नेतृत्व असेल.''

भूतकाळाबद्दल-त्यात शिळेपणा येण्याचा धोका असतो. झाडेझुडपे, वनस्पतीसृष्टी, धर्म, व्यवस्था, संस्कृती, आपण, आपले विचार आणि आपण निर्माण केलेल्या गोष्टी-सगळ्याला हळूहळू शिळेपणा येऊ लागतो. शिळे होणे- होत जाणे सत्तेची नियतीच



आहे. पण या नियतीला तोडणे- तोडत जाणे हाच बहुधा जीवनातला पर्याय आहे!

'पुनर्नवा' मधले देवरात म्हणतात :

''पुनर्नवा देवी, तू नित्य नवीन होऊन मनोपटलावर उदित होतेस. तुला ठाऊक नाही, तू कोणत्या मर्मवेदनेला नव्याने जागवतेस- कोणच्या जुन्या जखमेवरची पुन्हा खपली काढतेस...! देवरात स्वत:च कोमेजून गेला आहे. त्याच्यात पुनर्नवाचे स्वागत करण्याची क्षमता नाही. पुनर्नवा होऊन नित्याने येत राहा. तुझ्या कष्टांमुळे कोणी ताजेतवाने होत असेल... तर काय हरकत आहे देवी! नाही, तू नित्य...नवीन होऊन हृदयात अवतरित होऊन ये, नित्य नूतन होऊन, पुन्हा पुन्हा नवीन होऊन ये, माझ्या पुनर्नवा राणी!''[1]

पुनर्नवा म्हणजे अर्थात पुन्हा नवीन, पुन्हा जागृत, पुन्हा प्राणयुक्त होण्याची व्यापक वेदना. या कादंबरीच्या सर्वच पात्रांना ती घुसळून काढत राहते. देवरात महाकालाच्या दरबारात पोचतात. पण शांती मिळत नाहीच. ते स्थिरतेच्या शोधात आहेत. पण महाकाल आहे केवळ गती- निरन्तर धावणारी गती- एका क्षणासाठीसुद्धा न थांबणारा प्रचंड वेग.

''जे काही जुने, जीर्ण आहे, सडके-गळके त्याचा नाश होत चालला आहे, पण नवनिर्मितीच्या प्रत्येक पावला-पावलावर मृत्यूचे तांडव चाललेले दिसते आहे. काळाचा हा प्रचंड प्रवाह थांबू नाही शकत. जीवन आणि मृत्यूचे हे परस्पर सापेक्ष असणे नाहीसे नाही होऊ शकत.''[2]

कालप्रवाहाचे सत्य हेच आहे. हीच पुनर्नवता आहे. चंद्रमौली म्हणतो : ''दोन प्रकारची निर्मिती असते. एक विधात्याची सृष्टी आणि दुसऱ्या प्रकारची निर्मिती ही मनुष्याची सृष्टी असते. स्वत: मनुष्य पहिल्या प्रकारात मोडतो. मनुष्य व निसर्ग-जीवजंतू, वृक्ष-वेली यांचा निर्माणकर्ता एकच आहे. म्हणून आपण या नैसर्गिक गोष्टींच्या निर्माण-प्रक्रियेवर टीका नाही करत. हे सर्व जसे बनले आहे तसे बनणारच. आपल्याला या साऱ्या गोष्टींपासून सुख मिळते, तसे दु:खही होऊ शकते. पण त्या आहेत. त्या अशाच का बनल्या आहेत हे म्हणण्याचा अधिकार आपला नाही. आपण स्वत:ही त्याच सृष्टीचा एक अंश आहोत. पण जी व्यवस्था माणसाने निर्माण केली आहे तिची गोष्ट वेगळी. त्यात दोष असतील तर ती बदलली जाऊ शकते.''[3]

चंद्रमौलीच्या या बोलण्याने देवरात व्याकुळ होऊन जातात. ते विचार करू लागतात :

''हे धर्म-कर्म, संयम-नियम सगळे काय व्यर्थ थोतांड आहे? परमेश्वराने घडवलेल्या सृष्टीहून भिन्न आहे? शास्त्रांमधे सांगितलेली समाज-संतुलनाची व्यवस्था, जी मानवनिर्मित आहे ती विधात्याच्या संकेतानुसार बनलेली नाही? अपौरुषेय समजले गेलेले सारे ज्ञान ही विधात्याच्या योजनेचे अंग नाही? काय माणसाने बनवलेली घरे-दारे, दगड-विटा यांच्यासारखी तीही टीकास्पद आणि बदलता येण्याजोगी आहेत? आचार्य पुरगोभिल म्हणतात की जर व्यवस्था सतत संस्कारित आणि

1. पुनर्नवा, पृ. 245-246  2. पुनर्नवा, पृ. 126-127  3. पुनर्नवा, पृ. 135

साफसूफ होत राहिल्या नाहीत तर एक दिवस व्यवस्था तर तुटून पडतीलच, पण आपल्याबरोबर धर्मही तोडून फोडून टाकतील...सामाजिक व्यवस्था म्हणजे काही न पुसता येण्याजोगी ब्रह्मरेषा नाही. म्हणूनच धर्माच्या रक्षणासाठी सतत विचार करत राहणे आवश्यक असते.''[1]

चौथ्या शतकातील घटनांवर आधारित अशी द्विवेदींची 'पुनर्नवा' कादंबरी त्या युगाच्या सीमांच्या बाहेर येऊन आजच्या प्रश्नांना अधोरेखित करते व त्या समस्यांसाठी विवेकपूर्ण असा उपाय शोधण्याचा प्रयत्न करते. धर्म व सामाजिक न्यायव्यवस्था यांच्याबद्दल एक तुच्छवृत्ती वाढते आहे. लोकमानसात कोरडी कर्मकांडे व धर्माचार फैलावत चालला आहे, त्या रूढ संकेतांबद्दल भावनिक विद्रोहही दिसतो आहे या सर्वांबद्दल द्विवेदी पूर्णपणे जागरूक आहेत. आणि त्या भावलोकातील विद्रोहामधल्या वास्तवाचा स्वीकार करून त्यांनी आपली प्रगतिशील मानवतावादी दृष्टी सिद्ध केली आहे. आचार्य पुरगोभिल, बदललेल्या परिस्थितीच्या संदर्भात सामाजिक विधी-व्यवस्थेचे जे विश्लेषण करतात त्यावरून कादंबरीकाराची अत्यंत जागरूक दृष्टी दिसून येते.[2] मृतप्राय झालेले संकेत, कालबाह्य झालेल्या व्यवस्था व नीति-अनीतीचे सडलेले संकेत, रूढी तोडून, जीवनप्रवाहातून उपजलेली नवी मूल्ये स्वीकारण्याचा साहसपूर्ण प्रयत्न या कादंबरीत झाला आहे. समाज-व्यवस्था, न्याय-व्यवस्था, धर्म-व्यवस्था यांना परिस्थितीनुरूप व मानवी आकांक्षांच्याही अनुरूप अशा साच्यात घालून घडवणे, घडवत जाणे हीच जणू पुनर्नवता आहे आणि या पुनर्नवतेचे स्वागत करण्याचे साहस हाच या कादंबरीचा विशिष्ट संदेशही आहे.

'अनामदास का पोथा' मध्ये द्विवेदी उपनिषद्कालीन समाजात वर्तमानाशी निगडित समयोचित मूल्ये शोधण्याचा प्रयत्न करतात. एकान्त-तपाच्या जागी ते समाजसेवेच्या तपाची प्रतिष्ठापना करतात.

''एकान्तातले तप हे मोठे तप नव्हे. बघ, जगात किती कष्ट आहेत, शोक-दुःख आहे, दारिद्र्य आहे, कुसंस्कार आहेत! लोक दुःखाने व्याकुळ आहेत. त्यांच्यात जायला हवे. त्यांचे दुःख वाटून घे, त्यांचे कष्ट दूर करायचा प्रयत्न कर, हेच खरे तप आहे. सगळीकडे एकच आत्मा संचार करतो ह्या सत्याचा ज्याला साक्षात्कार झाला तो दुःखकष्टांनी पिचलेल्या मानवतेची कशी उपेक्षा करू शकेल?''

याच तऱ्हेने द्विवेदी पाप-पुण्याची व्याख्या देखील नवीन संदर्भात करतात:

''हो, बाळा, तू योग्य प्रश्न विचारला आहेस. बादरायण व्यासाने म्हटले आहे की ज्या कृतीमुळे दुसऱ्याला शारीरिक किंवा मानसिक कष्ट होतात ते पापकर्म आहे. पण ज्यामुळे एखाद्याचे दुःख दूर होते, त्याचे ऐहिक, पारलौकिक जीवन सुधारते, रोग्याला आरोग्याचा लाभ होतो, दुःखी माणूस सुखी होतो, भुकेल्याला अन्न व तहानेल्याला पाणी मिळते, दुबळ्यांना आश्वस्त वाटते ते सर्व पुण्यकार्य आहे; कारण अशा कृती आपल्या अंतकरणात विराजमान असलेल्या परमेश्वरालाच प्रसन्न करतात.''

वास्तविक द्विवेदींच्या कादंबऱ्यांमधून मिळणारा हा संदेश सर्वांत महत्त्वपूर्ण आणि महान आहे.

1. पुनर्नवा, पृ. 173-175 2. कित्ता, पृ. 172-175.

## 4.

# संशोधन, समीक्षा आणि इतिहास–दृष्टी

द्विवेदींचे समीक्षक व्यक्तिमत्व इतर समीक्षकांहून आपल्या वैशिष्ट्यांमुळे वेगळे झालेले दिसते व याचे कारण असे की त्यांच्यात एकीकडे श्रेष्ठ दर्जाची विद्वत्ता आहे; तर दुसरीकडे सखोल सर्जनात्मक ऊर्जा. चिंतन आणि भावनाप्रधानता यांचे असे दुर्मिळ मिश्रण क्वचितच लेखकांमधे दिसते. 28-3-1942 रोजी बनारसीदास चतुर्वेदी यांच्या नावे लिहिलेल्या एका पत्रात द्विवेदी म्हणतात :

''विद्वान पंडित व्हायला मला निश्चितच आवडेल. परंतु कोरडा पंडित नव्हे. जिवंत, रसरशीत, गतिशील. तुमचा आशीर्वाद असेल तर या जन्मात नाहीतर पुढल्या जन्मी.''[1]

सांगायलाच नको व वरील तीन शब्दात (जिवंत, रसरशीत, गतिशील) द्विवेदींनी आपल्या पांडित्याची व्याख्याच केली आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व मूलतः एक सर्जनशील व्यक्तित्व आहे. त्यांच्यातील भाव-प्रवणता आणि भावोत्कटता बहुधा रवीन्द्रनाथांच्या प्रभावामुळे आहे; त्यामुळे काही लोक त्यांना निखळ समीक्षक मानत नाहीत. त्यांची दृष्टी प्रामुख्याने संशोधकाची तसेच ऐतिहासिक-सांस्कृतिक आहे. यामुळेही काही लोक त्यांना निखळ समीक्षक मानत नाहीत. पण त्यांची सर्जनोर्मि, शोध-वृत्ती व ऐतिहासिक-सांस्कृतिक दृष्टी त्यांच्या समीक्षेचे नुकसान तर करत नाहीच, उलट त्यामुळेच ती अधिक समृद्ध आणि महत्त्वपूर्ण झाली आहे. द्विवेदींमध्ये एक रचनात्मक संलग्नता आहे व त्यामुळे कोणत्याही कवीचे मूल्यांकन मोठ्या तन्मयतेने व सहृदयतेने ते करतात. ते साहित्याला वा एखाद्या साहित्यिकाला एका व्यापक ऐतिहासिक-सांस्कृतिक परिप्रेक्ष्यामधे ठेवून तत्कालीन धर्म, राजकारण, लोकजीवन यांच्या संदर्भात त्याचे विश्लेषण-मूल्यांकन करतात. त्यांची दृष्टी संशोधकाची आहे, पण ती पोथ्यापुराणे व जुनी शास्त्रे यांमधे अडकून पडत नाही वा नुसती व्याख्येत व स्पष्टीकरणापर्यंत येऊन थांबत नाही. ते जुन्या ज्ञान-संचितांची आधुनिक दृष्टीकोनाशी सांगड घालत राहतात. त्यांचा संशोधनवृत्तीमुळे वाचकाचे ज्ञान-क्षितिज विस्तारते. त्यांच्या ऐतिहासिक दृष्टिकोनामुळे त्याला एक व्यापक परिमाण, आकार लाभतो. प्राचीन भारतीय काव्यशास्त्र, ज्योतिष, तंत्र, धर्म, दर्शने यात ते जितके खोलवर घुसतात तितकेच सखोल पाश्चात्त्य विद्वानांच्या आधुनिक चिंतनातही. त्यांच्यातला

1. पत्रः हजारीप्रसाद द्विवेदी, पृ. 57

इतिहासकार, संशोधक, समीक्षक एकमेकांत इतके मिसळून गेले आहेत की त्यांना पृथगात्म करता येणे कठीण आहे. द्विवेदींची ही वैशिष्ट्ये त्यांच्या समीक्षेच्या मर्यादा नाहीत. उलट महत्त्वपूर्ण बलस्थाने आहेत.

द्विवेदींची साहित्य आणि समीक्षा यांबद्दलची मते, मुख्यत: त्यांचे वैचारिक निबंध व 'लालित्य-तत्त्व', 'साहित्य का मर्म' तसेच 'साहित्य का साथी' अशा लेखनातून व्यक्त झाली आहेत. मागच्या प्रकरणात निबंधाची चर्चा केली गेली आहे आणि 'लालित्य-चिंतना'ची चर्चा पुढील प्रकरणात होईल.

या प्रकरणात मुख्यत: 'साहित्य का मर्म' आणि 'साहित्य का साथी' यांबद्दल चर्चा केलेली आहे. या निबंधांमधून द्विवेदींचे फक्त समीक्षेसंबंधीचे विचार व त्या मागची त्यांची भूमिका व्यक्त होते. द्विवेदींची संदर्भ चौकट ऐतिहासिक-सांस्कृतिक, मानवतावादी व समाजशास्त्रीय आहे हे याआधी स्पष्ट झाले आहेच. ते साहित्यकृतीकडे पाहताना तिला सांस्कृतिक जीवनधारेच्या चौकटीत ठेवतात. त्यांच्या समीक्षेच्या केंद्रस्थानीही माणूसच आहे. त्यांच्या मते :

''ज्याला साधनेचे तपश्चर्येचे मूल्य समजू शकते तोच साहित्याचेही मर्म जाणू शकेल. सृष्टीची सर्वात मोठी साधना मनुष्य आहे, पशुसृष्टीमधून वर उठलेला, ज्याच्यात 'मनुष्यत्व' धर्म आहे असा जीव. त्याहून मोठे काहीच नाही.''[1]

द्विवेदींच्या दृष्टीने जे मानव-हृदयाला उदात्त करते ते साहित्य, जे त्याला पशुत्वाच्या वर उचलून उन्नत अशा देवत्वाकडे नेते व सर्व चराचर विश्वाशी एकत्व, एकरूप झाल्याचा अनुभव देते. त्यांच्याच शब्दात :

''आहार, निद्रा, भय इत्यादी मनोभाव सर्व प्राण्यांमध्ये असतात. मनुष्य या गरजा भागवण्याचा प्रयत्न करतो आणि आपल्या याच लहानशा प्रयोजनात गुंतून राहतो. पशूंच्याहून हे वगळे नाही. फार प्राचीन काळापासून या पशुप्रवृत्तीचा माणसाला तिरस्कार वाटत आला आहे. व या तुच्छ क्षुद्रतेच्या वर तो उठू शकला आहे. हेच माणसाचे वैशिष्ट्य आहे. ज्या गोष्टी आपल्याला ह्या क्षुद्रतेचा दास बनवतात किंवा या तुच्छ गोष्टींनाच माणसाचे खरे रूप समजतात त्या गोष्टी माणसाच्या हृदयातून मनुष्याचे माहात्म्य, त्याचे वैशिष्ट्य व त्याचे वास्तविक रूप दूर हटवतात, त्या गोष्टी माणसाला लोभ, मोहाचा धडा शिकवतात. अशा गोष्टी 'साहित्य' होऊ शकत नाही. कारण अशा कुसंस्कारांमुळे माणसाला भंगलेपण हवेसे वाटू लागते, भेद-विभाजन व तुच्छता यांना तो मोठे गुण समजू लागतो, आणि साऱ्या विश्वाशी एकत्व वाटण्याच्या अनुभवाबद्दल तो अनुत्सुक, विन्मुख होतो.''[2]

एका प्रकारचे तथाकथित वास्तवादी साहित्य द्विवेदींना रुचत नाही. नग्नतेचे प्रदर्शन करून माणसाला अवाक् बनवणारे, स्थानीय दृश्यांचे तपशीलवार वर्णन, छोट्या-मोठ्या गोष्टींचे क्रमवार कथन, पाल्हाळिक वर्णन, बडबड-शिव्यागाळीचे तपशील हे सगळे म्हणजे वास्तववादी लेखन नव्हे, ही वास्तववादासाठी केलेली कारागिरी, फक्त कौशल्य आहे. त्यांच्या मते यामुळे लेखक वाचकाच्या मनात स्वत:बद्दल विश्वास

1. साहित्य का मर्म, हजारीप्रसाद द्विवेदी ग्रंथावली. 7, पृ. 160
2. 'साहित्य का साथी' हजारीप्रसाद द्विवेदी ग्रंथावली. 7. पृ.168



निर्माण करतो खरा, पण साहित्याचे हे व एवढेच उद्दिष्ट नाही. द्विवेदींच्या शब्दात :

''साहित्याचे उद्दिष्ट असे की, मनुष्यजीवनाबद्दल सहानुभूती उत्पन्न करून मनुष्यतेच्या खऱ्या उद्दिष्टांपर्यंत पोचण्याचा संकल्प करणारे, मानवी दु:खांचा अनुभव देईल असा दृष्टिकोन प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणारे ते साहित्य. साहित्याचे उद्दिष्ट, दृढबुद्धी आदर्श चरित्रांची सृष्टी निर्माण करणे, मनुष्यतेला दीर्घ काळपर्यंत मार्ग दाखवू शकेल असे चरित्र चित्रण करणे हा आहे. असे साहित्य जो निर्माण करू शकत नाही, त्याच्यात कोठेतरी काही त्रुटी आहे. महान साहित्याचा निर्माताच महान साहित्यकार असतो. कधीकधी उलटेच मार्ग शोधण्याचे प्रयत्न होतात. आपल्या साहित्यिक समीक्षेमध्ये फालतू व हवेतल्या पोकळ चर्चा सोडून काही ठोस रचना, साहित्यकृती घेऊन त्यांवर चर्चा घडून आली तर चांगले होईल. नाहीतर नुसतीच गटबाजी आणि आरोप-प्रत्यारोप यांचे व्यर्थ वाग्जाल यातून काहीच निष्पन्न होत नसते.''[1]

द्विवेदी हे मान्य करतात की आज साहित्यात मानवाच्या सामूहिक कल्याणाच्या दृष्टिकोनाला प्राधान्य मिळते आहे, पण त्यांच्या मते ही दृष्टी आपल्या प्राचीन काव्यटीका परंपरेमध्ये देखील आहे व ती जुनी परंपरा आपण विसरता कामा नये. उत्तम लेखक समाजातील गुंतागुंतीच्या तळाशी जातो. तिच्या आत शिरून त्या गुंतागुंतीच्या जाळ्याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करतो. परंतु लेखकाचे सर्वात महत्त्वाचे प्रयोजन माणसाला उन्नत करणे, देवत्वाकडे नेणे हेच आहे. द्विवेदी हे वारंवार सांगतात. त्यांच्याच शब्दात :

''माणसाला त्याच्या स्वार्थबुद्धीपासून वर उचलणे, लौकिक, ऐहिक संकुचिततेपासून त्याला दूर नेणे, सत्त्वगुणी बनवणे, परदु:खकातर व संवेदनशील बनवणे आणि विश्वामधल्या त्या चिरस्तब्ध अशा 'एकत्वाचा अनुभव देऊन त्यातून प्राणिमात्रांबद्दलची आत्मीयता जागृत करणे हे सर्व साहित्याचे उद्दिष्ट आहे. छन्द, अलंकार, पदलालित्य आणि विविध शैली ही त्या महान उद्दिष्टपूर्तीची साधने आहेत.''[2]

द्विवेदींचा हा दृष्टिकोन त्यांनी केलेल्या समीक्षालेखनामधे सर्वत्र आढळतो. 'सौंदर्या'ची व्याख्यादेखील त्यांनी याच भूमिकेतून केली आहे. सामाजिक विद्वेषाला व विषमतेला त्यांचा विरोध आहे. सामंजस्याला ते सौंदर्याचा आत्मा मानतात, सौंदर्याचा बाह्य जगाशी संबंध असतो असे मानतात. त्यांच्याच शब्दात :

''सगळ्या बाह्य जगताला असुंदर ठेवून आपण सौंदर्याची सृष्टी निर्माण करू शकत नाही. सामंजस्याचेच नाव सौंदर्य आहे. ज्या जगात श्रेष्ठ-कनिष्ठ, गरीब-श्रीमंत, ज्ञानी-अज्ञानी यांच्यात जमीनअस्मानाचे अन्तर आहे ते जग सामंजस्यपूर्ण जग आहे असे म्हणता येत नाही व म्हणूनच ते सुंदरदेखील नाही. या बाह्य असुंदरतेच्या, कुरूपतेच्या राशीवर उभे राहून आंतरिक सौंदर्याची उपासना होऊ शकत नाही.''[3]

याचसाठी द्विवेदी साहित्याला मानवाच्या संपूर्ण जीवनाशी संलग्न करूनच त्याचा

1. 'साहित्य का साथी', हजारीप्रसाद द्विवेदी ग्रंथावली-7, पृ. 179
2. कित्ता, पृ. 218 3. 'अशोक के फूल', पृ. 184

विचार करतात. साहित्याची मर्यादा केवळ काही खास विषयांपुरती ते समजत नाहीत. त्यांच्याच शब्दात :

''आजच्या जनतेची दुर्दशा तुम्हाला खरोखरच जर दूर हटवायची असली तर तुम्ही मार्ग कोणताही स्वीकारा, राजकारणाला बाजूला ठेवून तुम्ही राहू शकत नाही, अर्थकारणाची उपेक्षा करून चालत नाही, आणि विज्ञानातील नव्या प्रवृत्ती, नव्या गोष्टी जाणून घेतल्याशिवाय तुम्हाला काहीही साध्य करता येत नाही. साहित्य केवळ बुद्धीचा विलास, बुद्धी-क्रीडा नाही. वास्तव जीवनाची उपेक्षा करून साहित्य जिवंत राहू शकत नाही.''[1]

द्विवेदींनी स्वत: आपल्या समीक्षेत इतिहास, धर्म, पुराणे, पुरातत्व, मानवविज्ञान, जीवविज्ञान, मनोविज्ञान, राजकारण इत्यादि शास्त्रांचा भरपूर वापर केला आहे.

समीक्षेच्या क्षेत्रात आपल्या ऐतिहासिक दृष्टिकोनासाठी द्विवेदी विख्यात आहेत. इतिहासाला ते भूतकालीन घटनांचा संकलित संग्रह मानत नाहीत, तर 'कालस्रोतामध्ये वहात आलेल्या जिवंत समाजाची विकास-कहाणी'[2] मानतात. काळाच्या चतुर्दिक् सीमांशी मानवसमूहाचा अनेक आघाड्यांवर चाललेला संघर्ष म्हणजेच इतिहास आहे. हा इतिहास माणसाच्या द्वारा घडतो आणि माणसाला तो घडवतोदेखील. द्विवेदी इतिहासाला माणसाचा विकास आणि भवितव्य यांच्याशी जोडून त्याकडे बघतात. तो माणसाच्या जीवन-धारेचा प्रवाह आहे. माणसाच्या संघर्षाचे ते नाव आहे. द्विवेदी इतिहासाच्या शाश्वत, निरंतर-गाथेलाच शब्दरूप देतात:

''कष्ट, आपत्ती येतात व जातात. समृद्धी आणि धनाढ्यता फेसाच्या बुडबुड्यांप्रमाणे कालौघात उत्पन्न होतात व विलीन होऊन जातात. साम्राज्ये आणि धर्मसत्तांचा उदय व अस्त होतो. पण तरीही माणूस मात्र या सगळ्यातून बचावून शिल्लक राहतो.

द्विवेदी पुन्हापुन्हा 'महाकाल', 'महाअज्ञात' व 'इतिहास-विधाता' यांवर बोलतात. 'इतिहास विधात्या'वर त्यांचा खोल, दृढ विश्वास आहे. 'मानवाच्या जययात्रे'वर त्यांची अतूट निष्ठा आहे. ते वारंवार चर्चा करताना दिसतात की सूर्यमालेमध्ये पृथ्वी कशा प्रकारे अलग झाली, लाखो वर्षे ती थंड होत गेली, जीवतत्त्वाचा तिच्यात उद्भव झाला व संधी मिळताच समस्त जडशक्तीच्या विरुद्ध बंड करून कशा प्रकारे त्या जीवतत्त्वाने डोके वर काढले, गवताच्या पात्याच्या रूपाने! सृष्टीच्या इतिहासात ही अघटित घटना होती. मनुष्य याचीच अंतिम परिणती आहे. जेव्हा जीवतत्त्वाने सगळ्या विघ्नांवर, अडथळ्यांवर मात करून स्वत:ला मनुष्य-रूपात अभिव्यक्त केले तेव्हा इतिहासच बदलून गेला. मनुष्याने स्वेच्छेनुसार निसर्गाला वाकवण्याचा, बदलण्याचा प्रयत्न केला. द्विवेदींच्या मते माणसाने सर्व प्रकारच्या चुका करून देखील मनुष्यतेच्या उच्चतम आविष्काराच्या दिशेने त्याची वाटचाल सुरू आहे. माणसाची ही दुर्दम्य विजिगीषा हे सर्वात मोठे सत्य आहे. 'अशोक के फूल' निबंधामध्ये ते

1. 'अशोक के फूल', पृ. 184.
2. 'कल्पलता', पृ.175



लिहितात :

''मला मानव-जातीच्या दुर्दम-निर्मम प्रवाहाचे हजारो वर्षांचे रूप स्पष्ट दिसते आहे. मानवाची जीवन-शक्ती मोठी निर्दय आहे. ती व्यवस्थेतल्या व संस्कृतीमधल्या खोट्या, अनावश्यक मोहांना पायांखाली चिरडत, तुडवत चालते आहे. न जाणो किती धर्माचार, श्रद्धा, उत्सवांना आणि व्रतांना धुऊन काढत ही जीवनधारा पुढे जाते आहे. संघर्षामधून माणसाने सतत नवी शक्ती मिळवली आहे. समाजाचे आपल्यासमोरचे आजचे रूप कोण जाणे किती नवे ग्रहण केल्याचा नि किती जुने टाकून दिल्याचा परिपाक आहे! देशाची व जातीची विशुद्ध संस्कृती ही केवळ बोलण्याचीच गोष्ट आहे. सर्वच गोष्टींमध्ये सरमिसळ आहे. सगळे काही 'अशुद्ध'च आहे. शुद्ध आहे ती केवळ मानवाची दुर्दम्य जीवनेच्छा. ती मात्र गंगेच्या अखंड, शुद्ध, स्वयंभू धारेसारखी सर्व काही पचवूनदेखील पवित्र राहणारी आहे!''

माणसाची ही दुर्दम्य जिजीविषा ही इतिहासाची प्राणशक्ती आहे. तिच्यामुळेच इतिहास घडतो व मातीला मिळतो. इतिहासाबद्दलच्या त्यांच्या या दृष्टिकोनामुळे द्विवेदींना इतिहासाच्या मर्यादा जखडू शकत नाहीत. गोचर सृष्टीपलीकडे जे काही दिसते त्याच्याही पलीकडे त्यांच्या जिज्ञासेचे पंख उडू पाहतात. त्यांच्या या जिज्ञासा त्यांच्या अनेकानेक कृतींमध्ये पुन्हा पुन्हा पृष्ठभागावर येताना दिसतात. निबंध, कादंबरी अथवा ललित-चिंतन साऱ्या ठिकाणी. 'अनामदास का पोथा'मध्ये ते लिहितात :

''हे जे सुंदर रंग, रूप आहे, मोहक आकर्षण आहे, अभिव्यक्ती आहे हे सर्व कोणा महान प्रेमिकाचा अंगुलिनिर्देश आहे.''

याच कादंबरीतले त्यांचे शब्द आहेत :

''मला असे वाटतेय बेटा, की परिघातल्या या चेतनेलाच लोक आत्मा म्हणतात, आणि तो या जीवनेच्छेच्या अंतरंगातच कुठेतरी असला पाहिजे.. हाच आत्मा अज्ञात, अपरिवर्तनशील शक्यतांचे द्वार आहे.

शक्यता, संभावनाच जर नसेल तर जीवनेच्छाही असणार नाही.''

इतिहासाबद्दलच्या याच धारणेमुळे द्विवेदींना साहित्य हेही एका अविच्छिन्न धारेप्रमाणे दिसते. 'हिंदी साहित्य की भूमिका' या पुस्तकात हिंदी साहित्याच्या अखंडित परंपरेचे द्विवेदींनी प्रतिपादन केले आहे. याच दृष्टिकोनातून त्यांनी हिंदी साहित्याच्या विविध कालखंडांचे मूल्यांकन केले आहे. याचप्रकारे कबीराच्या मूल्यांकनासाठी विविध साधना व त्यांचा ऐतिहासिक विकास यांच्या अभ्यासाचा आधार त्यांनी घेतल्याचे स्पष्ट केले आहे. त्यांनी, कवीचा स्वभाव, व्यक्तित्व आणि विचारांवर त्याची वंशपरंपरा, जातीय संस्कार आणि त्या काळाची प्रेरणा यांचा प्रभाव पडतो याकडे लक्ष वेधले आहे.

द्विवेदींची पहिली समीक्षा कृती 'सूर साहित्य' 1930 च्या आसपास प्रकाशित झाली होती. या पुस्तकाच्या निवेदनात (प्रस्तावनेत) द्विवेदी मान्य करतात :

''त्या काळी साहित्य क्षेत्रात काहीतरी नवे देण्याचा उत्साह होता आणि असा विश्वास होता की मी जे काही लिहितो आहे ते सर्व दृष्टीने नवीन आणि ग्राह्य आहे.''

या पहिल्या रचनेतच द्विवेदींनी बरीच नवी सामग्री दिली आहे. हा एक शोध आहे. याची पहिली दोन प्रकरणे 'राधा कृष्ण का विकास' तसेच 'स्त्री-पूजा और उसका वैष्णव रूप' पुष्कळ नवीन सामग्री सादर करतात. डॉ. जॉर्ज ग्रियर्सन यांनी सूरदास, नन्ददास, मीराबाई, तुलसीदास इत्यादी भक्त कवींवर ख्रिस्ती प्रभाव असल्याचे म्हटले आहे. द्विवेदींनी या पुस्तकात ख्रिस्ती भक्त व भारतीय वैष्णव भक्तांच्या पायाभूत जीवनदृष्टीतील फरक स्पष्ट केला आहे- की, ख्रिस्ती कल्पनेनुसार मानवी जीवन हे आदिम पापाची शिक्षा मानले जाते. म्हणून तेथे ईश्वराच्या सान्निध्यासाठी स्वत:मध्ये पापाची जाणीव आणि दु:ख-बोध यांना जागृत ठेवणे आवश्यक ठरते. द्विवेदींच्याच शब्दात :

''साधनेच्या एका टोकावर आहे हे दु:ख, पाप, अपूर्णता आणि दुसऱ्या टोकावर उपनिषदांमधला आनंद, अमृत, पूर्णता. 'आनन्दादेव भूतानि जायन्ते' 'आनन्दरूपममृतं यद्विभाति.' पहिला आहे मध्ययुगातल्या ख्रिस्ती मर्मभावाचा स्रोत आणि दुसरा वैष्णव भक्त कवीचे उद्गम स्थान. दोहोंच्या मुळातच आकाश-पाताळाचे अंतर आहे. एकाचा रस्ता आहे 'दु:ख', तर दुसऱ्याचा 'लीला.' एकाच्या प्रेमाचे कारण आहे पाप-बोध, दुसऱ्याचे आनंद-क्रीडा. एकाचे उद्दिष्ट आहे मर्त्य आणि अमर्त्य यांमधले अंतर मिटवणे, बुजवणे, तर दुसऱ्याचे उद्दिष्ट आहे ब्रह्माण्डात व्यापलेल्या एकसंध, पूर्ण, एकरस असलेल्या ब्रह्माची प्राप्ती त्याच्या सीमित लीलांमधून करून घेणे. दोन्ही अगदी वेगळ्या गोष्टी आहेत.''

द्विवेदींच्या मते वैष्णव धर्म हा शास्त्रीय धर्म आहे त्याहून अधिक लोकधर्म आहे. हिंदी लोकगीतांमध्ये याचा प्रवेश वल्लभाचार्यांच्या पुष्कळ आधी झालेला होता. याच गीतांचे विकसित आणि सुसंस्कृत रूप सूरसागरमध्ये विद्यमान आहे.[1]

द्विवेदींनी जयदेव, विद्यापती आणि चंडीदास यांच्या राधेच्या शेजारी सूरदासाच्या राधेला ठेवून प्रेमतत्त्वाचे सूक्ष्म विश्लेषण करून म्हटले आहे की भारतवर्षामधल्या कोणत्याही कवीने राधेचे वर्णन इतके सखोल केलेले नाही. विश्वसाहित्यात सूरदासाच्या राधेसारखी प्रेमिका नाही! द्विवेदींच्याच शब्दात: ''सूरसागरमधली दोन व्यक्तिचित्रे जगाच्या साहित्यात अद्वितीय आहेत- यशोदा आणि राधिका. 'माता' शब्दाला इतके माहात्म्य ज्यामुळे प्राप्त होते ते सर्व यशोदेच्या वात्सल्यात आहे; तर राधिकेच्या चित्रणात प्रेमाबद्दलचे सर्वस्व अथपासून इतिपर्यंत चित्रित केले गेले आहे.''[2]

सूरदासानंतर हिंदीचा दुसरा कवी कबीर. त्याच्यावर द्विवेदींनी स्वतंत्र पुस्तकच लिहिले आहे. पं. बनारसीदास चतुर्वेदींच्या नावे लिहिलेल्या आपल्या 16-12-1947 च्या पत्रात द्विवेदींनी मान्य केले आहे की कबीर-साहित्याच्या अभ्यासाची प्रेरणा त्यांना स्व. गुरुदेव आणि आचार्य क्षितिमोहन सेन यांच्याकडून मिळाली होती.[3]

या प्रेरणेला द्विवेदींनी असे रूप दिले की वाङ्मयाच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांचा हा

1. हजारीप्रसाद द्विवेदी ग्रंथावली- 4,पृ. 81
2. कित्ता. पृ. 100
3. पत्र: हजारीप्रसाद द्विवेदी, सं. मुकुंद द्विवेदी, पृ. 80



अभ्यास एक स्वतंत्र प्रेरणेचा स्रोतच बनला. कबीराचे मूल्यमापन करताना त्यांनी कवितेचे जे नवे मापदंड प्रस्थापित केले त्यांना आजही मान्यता आहे. मागे म्हटल्याप्रमाणे द्विवेदींचे विचार आधुनिक, मानवतावादी, ढोंग-कपटाला विरोध करणारे असे होते. कबीराने सुद्धा जात-पात, पाखंड, धार्मिक अवडंबर, कर्मकांड या गोष्टींना कडक विरोध केला होता. कबीर द्विवेदींचा आदर्श बनून गेला- आचार्य शुक्लांचा जसा तुलसीदास आदर्श बनला होता त्याचप्रमाणे. म्हणूनच कबीराची समीक्षा करताना द्विवेदींचे मन सर्वात जास्त रमले व ती त्यांची अप्रतिम समीक्षाकृती झाली.

कबीराला हिंदी साहित्य क्षेत्रात प्रतिष्ठित करणारे द्विवेदी हे पहिलेच समीक्षक आहेत. त्यांच्या आधी आचार्य शुक्ल यांनी आपल्या हिन्दी साहित्याच्या इतिहासात कबीरावर लिहिले होते, परंतु अतिशय त्रोटक. त्यात कबीराच्या व्यक्तिमत्त्वाला फारसा उजाळा दिला गेला नव्हता.

द्विवेदींनी प्रथमच कबीराचे व्यक्तित्व, त्याचे कवित्व, भाषा व उपहास, विडंबन करण्याची हातोटी यांकडे लक्ष वेधून त्याला हिंदी साहित्यात असे मानाचे स्थान मिळवून दिले की आजच्या नवनवीन कवींचाही कबीर हा आदर्श बनला आहे. कबीराचे क्रांतिकारकत्व सर्वात प्रथम द्विवेदींनीच ओळखले. कबीरासंबंधीच्या सर्व समीक्षेला ही त्यांची देणगीच आहे. कबीराला सन्माननीय बनवताना त्यांनी कवितेचे काही असे विशेष अधोरेखित केले की नंतरच्या काळात ते विशेष नव्या मापदंडांच्या रूपात विकसित झाले. आपल्या आजच्या नव्या लेखकांनी विद्रोह, क्रांती, जनवाद आणि काव्यभाषा यांची जी प्रमाणे, मापदंड विकसित केले आहेत त्यात द्विवेदींचे योगदान मोठे आहे. हीदेखील त्यांच्या कबीर-समीक्षेची उपलब्धी आहे. कबीर-काव्याच्या वैशिष्ट्यांनी त्यापूर्वीही जाणकारांचे लक्ष वेधून घेतले होते, पण द्विवेदींची त्यातली सहानुभूती, समरसता केवळ अपूर्व होती. संशोधन, ऐतिहासिक दृष्टिकोन आणि सहृदय समीक्षा असा दुर्मिळ संयोग द्विवेदींच्या कबीरासंबंधीच्या अभ्यासातून दिसून येतो. या पुस्तकाच्या 'उपसंहारा'त ते आपल्या अभ्यासाचे जे निष्कर्ष प्रस्तुत करतात ते त्यांच्यात शब्दांत वाचणे उपयुक्त ठरेल. ते लिहितात :

''भाषेवर कबीराचा प्रचंड अधिकार होता. ते वाणीचे डिक्टेटर होते. एखादी गोष्ट त्यांना ज्या रूपात व्यक्त करायची असे ती त्याच रूपात ते भाषेतूनच व्यक्त करत- जमेल तर सरळ-सरळ नाहीतर धक्का देऊन... मग उपहास विडंबन वा चिमटे घेण्यात देखील त्यांचा हात धरणारा दुसरा कोणी नव्हता. पंडित आणि काझी, संन्यासी आणि जोगी, मुल्ला आणि मौलवी सगळ्यांना त्यांचा उपहास झोंबत असे. अत्यंत साध्या सरळ भाषेतूनच ते असा घाव घालत की घाव झेलणाऱ्यासमोर केवळ अंग झटकून पळ काढणे याखेरीज दुसरा मार्गच उरत नसे. अशा प्रकारे, जरी कबीरांनी कधी काव्य लिहिण्याची प्रतिज्ञा केली नव्हती तरी त्यांच्या आध्यात्मिक रसाच्या घागरीतून ओसंडलेल्या रसाने काव्याच्या पात्रात काही कमी भर पडली नाही.

हिंदी साहित्याच्या हजार वर्षांच्या इतिहासात कबीरासारखे व्यक्तित्व असलेला

लेखक दुसरा कोणी झालेला दिसत नाही. श्रेष्ठतेत त्यांच्या बरोबरीचा, योग्यतेचा एकच कवी आहे- तुलसीदास. परंतु दोघांच्या व्यक्तित्वात मोठाच फरक होता. दोघेही भक्त होते. पण दोघांचे स्वभाव, संस्कार व दृष्टिकोन सर्वस्वी भिन्न होते. मस्ती, कलंदरपणा आणि सगळ्याला झाडून झटकून ठोकरूनही देण्याच्या चोख प्रखरतेमुळे कबीर हे हिंदी साहित्यातील अजोड व्यक्तित्व झाले आहे. त्यांची वाणी सर्व काही सामावून घेते आणि त्यांचे सर्वजयी वक्तिमत्त्व त्यावर अधिष्ठित होऊन राहते. त्यामुळेच कबीराच्या वचनांत अनन्य-साधारण असा जीवन-रस भरलेला आहे. त्यांचे अनुकरण करण्याचे सर्व प्रयत्न फोल ठरले आहेत. सहृदय टीकाकार व्यक्तित्वाच्या या आकर्षणालाच बळी पडतो आणि त्याच खुशीत कबीराला 'कवी' हे संबोधन वापरण्यात आनंद मानतो...

कबीर अशा पुष्कळ गोष्टी सांगून गेला आहे ज्यांची (जर उपयोग केला तर) समाजसुधारणेच्या कामी मदत होऊ शकते, परंतु या कारणासाठी कबीराला समाजसुधारक समजणे चुकीचे आहे. वस्तुत: कबीर 'व्यक्तिगत साधने' चे प्रचारक होते. बाह्य समाजाकडे उन्मुखता हा त्यांच्या मनाचा स्वाभाविक धर्म वा कल नव्हता. ते व्यक्तिवादीच होते. सर्व-धर्म समन्वयासाठी ज्या भक्कम आधाराची आवश्यकता असते ती आधारभूत गोष्ट कबीराच्या पदांमध्ये सर्वत्र आढळते. ती गोष्ट म्हणजे ईश्वराबद्दल अहेतुक, निरपेक्ष प्रेम आणि मनुष्यमात्राला त्याच्या निर्विशिष्ट रूपात समान मानणे...

कबीरदासाचे भक्त हे रूपच त्याचे खरेखुरे रूप आहे. व त्याच्याभोवती त्या अनुषंगानेच त्याची अन्य रूपे सहजपणे उजळून उठली आहेत.

प्रेम, भक्ती ही कबीरवाणीमध्ये मध्यवर्ती वस्तू आहे. ही गोष्ट समजून न घेतल्याचा परिणाम असा झाला आहे की चांगले चांगले विद्वान कबीरावर विचित्र टीका करताना दिसतात. घमेंडखोर, असंबद्ध बडबड करणारा, एकेश्वरवाद आणि अद्वैतवाद यांचे बारकावे, रहस्ये, फरक न जाणणारा, अहंकारी, निर्गुण-सगुणाचा विवेक न जाणणारा वगैरे टीका करून आपणच कबीराहून श्रेष्ठ असल्याचा दावा करत ते आत्मसंतुष्ट झाले आहेत... भक्तितत्त्वाची व्याख्या करता करताच कबीरांना बाह्याचाराच्या जंजाळाला, कर्मकांडाला दूर सारण्याची गरज जाणवली आहे. कारण ह्या बाह्याचारांची भौतिक, जड प्रकृती विशुद्ध, केवल चैतन्यतत्त्वापर्यंत पोचण्याच्या मार्गातला अडसर असते. आणि ही गोष्टच समाजसुधारणा आणि सांप्रदायिक ऐक्याची निर्माती बनली आहे. पण इथेदेखील हे म्हणून ठेवलेले बरे की तो सुद्धा 'फुकटचा माल' किंवा 'बायप्रॉडक्ट'च आहे.''

सूरदास आणि कबीरदास-हिंदीच्या या दोन कवींवर ज्या प्रकारे द्विवेदींनी वेगळे-वेगळे ग्रंथ लिहिले आहेत त्याच प्रकारे संस्कृत कवी कालिदास आणि बंगालचे कवी रवीन्द्रनाथ (टागोर) यांच्यावरही. कालिदास आणि रवीन्द्रनाथ त्यांचे प्रेरणा-स्रोत होते. 'कालिदास की लालित्य-योजना' नावाच्या पुस्तकात द्विवेदींनी कालिदासाचे नवे मूल्यमापन केले आहे. यातून द्विवेदींची सर्जनशील लेखक आणि तत्त्वशोधक अशी दोन्ही रूपे समोर येतात. कालिदासाच्या काव्यसृष्टीत द्विवेदी



सर्जनशील लेखक म्हणून प्रवेश करतात. तन्मयतेने आस्वाद घेतात आणि तत्त्वशोधक चिंतकाप्रमाणे त्याच्या लालित्य-योजनेचे विश्लेषण करतात. ह्या सर्वांची त्यांची पातळी गाठणे कोणा सामान्य विद्वानाला अशक्यच होते. आधुनिक पाश्चात्त्य सौंदर्यशास्त्र व प्राचीन भारतीय दार्शनिक तसेच आध्यात्मिक परंपरा दोन्हीचा आधार घेत कालिदासाच्या कला-विषयक विचारांचा, मतांचा द्विवेदी मागोवा घेतात. त्यांच्या अभ्यासप्रक्रियेत जितकी विद्वत्ता, व पांडित्य आहे तितकीच सर्जनशील प्रतिभाही. त्यांच्या मते कालिदास एखादा सामान्य कवी तर नव्हेच. तो भारताचा अंतरात्मा आणि भारतीय मनाला वाणी देणारा राष्ट्रीय कवी आहे. कालिदासाबद्दल ते लिहितात :

''भारतीय धर्म, दर्शने, शिल्पकला आणि साधना यांमध्ये जे जे उदात्त आहे, जे देदीप्यमान आहे, जे काही महान आहे, जे लालित्यपूर्ण आणि मोहक, मनोहारी आहे अशा सर्वांचे प्रयत्नपूर्वक निर्माण केलेले रूप म्हणजे कालिदासाचे काव्य आहे... सुकुमारतेबरोबरच शालीनता, मनाच्या मृदुतेबरोबरच चारित्र्याची दृढता, अपार वैभवाबरोबरच अपार वैराग्याचा, सौंदर्याबरोबरच धर्मप्रवणतेचा असा मणिकांचनसंयोग विश्वसाहित्यातही विरळा आहे.''[1]

कालिदासाच्या 'मेघदूत' वरील द्विवेदींच्या एका टीका-प्रबंधाचे नाव त्यांनी 'मेघदूत: एक पुरानी कहानी' असे दिले आहे. आपल्या कादंबऱ्यांप्रमाणेच यालाही त्यांनी 'गप्पागोष्टी' म्हटले आहे. वास्तविक ही टीकादेखील नसून द्विवेदींनी लिहिलेले एक निराळे 'मेघदूत' आहे. वाचताना एका पुन:सर्जनाचा आनंद देणारे. द्विवेदी आधाराला तर मूळ श्लोकच घेतात, पण त्यात अशा काही गोष्टी जुळवत मिसळत जातात की ते मुळातल्यापेक्षाही अधिक मनोहारी, त्यांचे स्वत:चेच मेघदूत वाटू लागते. मूळ श्लोक ते फक्त एखाद्या टेकूसारखा वापरतात आणि मग त्याचाच आधार घेऊन इतकी उंच भरारी मारतात की वाचकही अनेक जगांच्या यात्रेचा आनंद घेऊ लागतो. उदाहरण म्हणून, 'मेघदूत'च्या पहिल्याच श्लोकाचे द्विवेदींनी केलेले स्पष्टीकरण-त्याचा एक अंश- येथे देणे उपयुक्त ठरेल.

''प्रेमातून उद्भवलेले प्रमाद इतिहासात आणखीही झाले आहेत. यक्षाने जी चूक केली तशीच आणखी कितीदातरी केली गेली. असे म्हणतात, खानखाना अब्दुर्रहीम याचा एक सामान्य चाकर प्रियतमेच्या प्रेमात मग्न होऊन कर्तव्यापासून इतका घसरला की सहा महिने कामावरच गेला नाही. गेला तो घाबरलेला, आणि आता आयुष्यातली सर्वात बिकट शिक्षा ऐकावी लागणार अशी भीती बाळगतच. त्याची प्रिया कविता करत असे. तिने चिठ्ठीवर एक बरवा (बरवै) छंद लिहून ठेवला होता. यावर मग कवी रहीम याने त्या चाकराचा अपराध तर माफ केला होताच, आणखी वर बक्षीसही दिले होते. रहीम माणूस होते, पण कुबेर तर देव! माणूस क्षमा करू शकतो, देव नाही करू शकत.

माणसाला हृदय असते व माणूस असहाय झालेला असतो तर देव नियमांचे कठोर

1. हजारीप्रसाद द्विवेदी ग्रंथावली, पृ. 125

पालन करवणारा. मनुष्य नियमांनी विचलित होऊन जातो. पण परमेश्वराची वक्र भिवई नियमांचे नित्याने रक्षण करत असते. माणसाला यासाठी मोठे म्हणायचे की तो चूक करू शकतो. देव यासाठी मोठा की तो नियमांचा नियन्ता असतो. म्हणून तर कुबेराने त्याला (यक्षाला) शाप देऊन टाकला.''

'कालिदास की लालित्य योजना' मध्ये द्विवेदींनी 'तत्त्वान्वेषी' (तत्त्वशोधक) आणि 'सर्जनशील वाचक' यांच्यामधल्या फरकाकडे निर्देश केला आहे. ते तत्त्वशोधक तर आहेतच पण मुळात एक सर्जनशील वाचक आहेत. काहीही लिहिता-वाचताना त्यांची सर्जनशील प्रतिभा इतकी सक्रिय होते की ती सर्व लेखनावर सावलीसारखी पसरते. ते खऱ्या अर्थाने एक 'सर्जक समीक्षक' आहेत. 'मेघदूत' त्यांना एक अद्भुत काव्य वाटते. माणसाची नित्य-नूतन विरहव्यथा आणि मीलनेच्छा यांबद्दलचे ते सर्वोत्तम काव्य आहे. या काव्याचे कित्येक अर्थ लावले गेले आहेत, अनेक समीक्षा लिहिल्या गेल्या आहेत, पण द्विवेदींची टीका तिच्या सर्जनात्मकतेत कालिदासाच्या 'मेघदूत'सारखीच सर्वोत्तम अशी आहे.

'मृत्युंजय रवीन्द्र' हा द्विवेदींचा लेखसंग्रह रवीन्द्रनाथ टागोर यांचे व्यक्तित्व व कार्य यासंबंधी आहे. काही लेख विभिन्न साहित्यिक नियतकालिकांमधून लिहिले गेले होते तर काही साहित्यिक कार्यक्रमांमधून भाषण म्हणून वाचले गेले होते. काही लेख रवीन्द्रनाथांच्या व्यक्तित्वाबद्दलचे, आठवणींच्या रूपातले आहेत आणि काही त्यांचे विचार, त्यांची निर्मिती यांवर प्रकाश टाकणारे असे आहेत. रवीन्द्रनाथांवर लिहिण्याचा अधिकार द्विवेदींना निश्चितच आहे. आयुष्याची सुमारे वीस वर्षे ते शांतिनिकेतनचे निवासी होते व त्यापैकी बारा वर्षे तर त्यांना खुद्द रवीन्द्रनाथांच्या निकट संपर्कात राहण्याची सुवर्णसंधी मिळाली होती. या काळाला द्विवेदी आपल्या आयुष्यातले सोनेरी वर्ष समजतात. 'मृत्युंजय रवीन्द्र' मध्ये द्विवेदींनी, रवीन्द्रनाथांचे स्वाभाविक, संयमशील, स्फूर्तिदायक व्यक्तित्व व त्याचबरोबर त्यांचे काव्य, तत्त्वज्ञान, त्यांचे विचार या सर्वांचा सखोल विश्लेषणपूर्ण अभ्यास सादर केला आहे. भारतीय साहित्याला रवीन्द्रनाथांनी जी देणगी दिली आहे त्याबद्दल द्विवेदी लिहितात :

रवीन्द्रनाथांचे भारतीय साहित्याला सर्वात मोठे योगदान हेच की त्यांनी साहित्याच्या एतद्देशीयतेला चेतवले, उत्तेजित केले व बळही दिले, देशभरच्या साहित्यिकांना ही एक दृष्टी दिली. लोभ आणि मोहाच्या आहारी गेलेल्या आधुनिक समाजव्यवस्थेच्या दुबळ्या जागांचे खरेखुरे स्वरूप त्यांनी दाखवून दिले आहे.

....रवीन्द्रनाथांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून भारतवर्षाच्या प्राणशक्तीमध्ये स्पंदन निर्माण केले, व स्वत:ला ओळखण्याची दृष्टी बहाल केली. उपनिषदे, बौद्ध साहित्य, मध्यकालीन साहित्य आणि समस्त देशाच्या कानाकोपऱ्यांमधून अशा गोष्टींचा संग्रह केला की त्यामुळे भारताची महानता एका उज्ज्वल रूपात उभी राहू शकली... आपल्या देशातले जे महान आहे, जिवंत, प्राणवन्त आहे अशालाच त्यांनी बहुमान दिला आहे व अशा प्रकारे भारतीय आकांक्षेच्या उज्ज्वल रूपाचे सादरीकरण रवीन्द्रनाथांनी केले.

आपल्या देशाची गौरवयोग्य अशी जी आध्यात्मिक संपन्नता आहे त्याकडे त्यांनी



देशभरच्या कलावंतांना पहायला उद्युक्त केले.''[1]

'नाथ संप्रदाय' हा द्विवेदींचा संशोधनपर ग्रंथ आहे. त्यात नाथ-संप्रदायाच्या सिद्धांचा परिचय येतो. गोरक्षनाथ यांचे सिद्धान्त व त्यांची साधना यांचे विस्ताराने विवेचन द्विवेदींनी यात केले आहे. त्यांच्या मते भारतीय धर्मसाधनेच्या इतिहासात नाथ संप्रदायाचे विशिष्ट स्थान राहिले आहे. हे आंदोलन भक्ती-काळाच्या पूर्वीचे एक महत्त्वाचे धार्मिक आंदोलन होते व त्यानंतरही बरेच सशक्त राहिले आहे. या संप्रदायाच्या अभ्यासातून, आधुनिक भारतीय भाषांच्या प्रेरक शक्ती कोणत्या याचा शोध लागतो. द्विवेदींनी गोरक्षनाथांचे पूर्वकालीन त्यांचे समकालीन आणि त्यांचे उत्तरकालीन अशा सिद्धांच्या विचारांची ओळख करून सांगितले आहे. पुस्तकाच्या 'उपसंहारा'त ते लिहितात :

''गोरक्षनाथ त्यांच्या काळातले सर्वात थोर धार्मिक नेते होते. संघटन बांधण्याची त्यांची शक्ती अपूर्व होती. त्यांचे व्यक्तित्व एका समर्थ धर्मगुरूचे व्यक्तित्व होते... ज्या काळात ते जन्मले त्या काळी भारतीय धर्म-साधनेची अवस्था विचित्र होती. शुद्ध जीवन, सात्त्विकता व अखंड ब्रह्मचर्यवृत्ती त्या काळी पूर्णपणे खालच्या पातळीला येऊन पोचली होती. गोरक्षनाथांनी निर्दय/हातोड्याचे घाव घालून साधू आणि गृहस्थाश्रमी दोहोंच्या हीन, नीच वृत्तींचा चक्काचूर केला. लोकजीवनाला जी धार्मिक चेतना पूर्वकालीन सिद्धांकडून मिळाली होती ती आपल्या पारमार्थिक उद्देशांपासून दूर हटत होती. त्या धार्मिक चेतनेला गोरक्षनाथांनी नव्या प्राणशक्तीने जिवंत केले. कोणत्याही रूढीवर घाव घालते वेळी ते डगमगले नाहीत. ते स्वत: विद्वान पंडित होते, पण पुस्तक हे साध्य नाही, साधन आहे या गोष्टीची त्यांना व्यवस्थित जाण होती. त्यांनी कोणाशीही तडजोड केली नाही– ना लोकांशी, ना वेदवाङ्‌मयाशी. पण तरीसुद्धा त्यांनी समस्त प्रचलित साधना-मार्गामधून योग्य त्या बाबींचा स्वीकार केला. केवळ एक गोष्ट ते कुठूनही घेऊ शकले नाहीत. ती म्हणजे भक्ती.''[2]

'सिक्ख गुरुओं का पुण्यस्मरण' (1979) हे द्विवेदींनी लिहिलेले अखेरचे पुस्तक. ते त्यांच्या मृत्यूनंतरच प्रकाशित होऊ शकले. शीख गुरूंच्या धार्मिक, साहित्यिक योगदानाबद्दलचे ते लिखाण आहे. यात द्विवेदींनी गुरू नानकदेव आणि गुरू गोविंद सिंह यांच्यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे, व त्यांच्या वाणीचे महत्त्व प्रतिपादित केले आहे. त्यांच्या मतानुसार :

''ज्या काळात गुरू नानकदेवांचा अवतार झाला, तो काळ आध्यात्मिक जीवनाच्या दृष्टीने भारतात अंध:काराचा काळ होता. एका बाजूला हिंदू समाज जाती, संप्रदायांमध्ये विभाजित झाला होता, भंगून गेला होता, अनेकानेक रूढींनी जखडलेला होता; आणि दुसऱ्या बाजूला बाहेरून आलेले शक्तिशाली मुसलमानी आक्रमण प्रत्येक क्षेत्रात आव्हान देत होते. अशा वेळी गुरू नानकदेवाने माणसाच्या अंतर्यामीच्या शक्तीला जागृत करण्याचे आवाहन केले. त्याने सत्य हेच एकमेव लक्ष्य मानले.

**1. कित्ता, पृ. 439 (हजारीप्रसाद द्विवेदी ग्रंथावली- 8, पृ. 125)**
**2. हजारीप्रसाद द्विवेदी ग्रंथावली, 6. पृ.210-211**

तसेच विचार आणि व्यवहार यांच्या एकात्मतेचा उपदेश केला.''

गुरू नानकदेवानंतर जे नऊ गुरू झाले त्यांचा संक्षिप्त परिचय देऊन द्विवेदींनी गुरू गोविंद सिंह यांचे जीवन-दर्शन विस्ताराने स्पष्ट केले आहे. त्यांच्या मतानुसार गुरु गोविंदसिंह यांच्यात,

''कवीची संवेदना, सहृदय व्यक्तीची ग्रहणशीलता, वीरपुरुषाचा उत्साह आणि संताची स्वच्छ, निर्मळ दृष्टी यांचा अद्भुत संगम होता. त्यांनी कविता वाग्विलासासाठी नाही तर उपेक्षितांमध्ये, अवमानितांमध्ये आत्मविश्वास जागृत करण्यासाठी लिहिली. त्यांनी साम्राज्य-स्थापनेसाठी नाही, तर अन्याय, अत्याचाराला विरोध करण्यासाठी शस्त्र हाती घेतले.''

गुरु गोविंदसिहांची काव्यकृती 'दशमग्रंथ.' द्विवेदींनी विस्ताराने त्यावर विचार केला. द्विवेदींच्या मते ते जितके 'काव्य' आहे तितकाच तो धर्मग्रंथ देखील आहे. गोविंदसिंहांच्या अपूर्व सफलतेचे महत्त्वाचे रहस्य त्यांचे कवि-हृदय आहे असे द्विवेदी मानतात.

द्विवेदींचे प्रिय अभ्यास-क्षेत्र म्हणजे आदिकाल व मध्यकाल. त्यांच्या अनेक पुस्तकांचे व निबंधांचे विषय हेच क्षेत्र आहे. प्राचीन आणि मध्यकालामधल्या अस्पष्टतेवर/अंधुकतेवर त्यांनी जितका प्रकाश टाकला आहे तितका दुसऱ्या कोणाही हिंदी समीक्षकाने टाकला नसेल. त्यांनी प्राचीन साहित्य, इतिहास, पुराणे, दर्शने, ज्योतिष, काव्यशास्त्र इत्यादींचा सखोल अभ्यास केला होता. इतिहासातल्या या अंधकार-युगाच्या गर्भामधूनच आधुनिक युगाचा जन्म झाला आहे व म्हणून द्विवेदी त्या अंधकार-युगाला समजून घेण्याच्या प्रयत्नांना आत्यंतिक महत्त्व देताना दिसतात.

'मध्यकालीन बोध का स्वरूप' हे पुस्तक म्हणजे पंजाब विश्वविद्यालयात दिल्या गेलेल्या द्विवेदींच्या पाच व्याख्यानांचा संग्रह आहे. त्यांच्या मते आठव्या शताब्दीपासून भारतीय साहित्यात स्वतंत्र चिन्तनाचा ऱ्हास काळ सुरू झाला होता. या काळाची अखेरची सीमा म्हणजे त्यांच्या मते अठरावे शतक. यानंतर भारतीय साहित्याचे टीका-समीक्षेचे युग सुरू होते- व हेच मध्ययुग अथवा मध्यकाल आहे. या मध्यकाळातील प्रबोधनाचे स्वरूप मोठ्या विद्वत्तेने त्यांनी विशद करून सांगितले आहे. त्या काळात लोकांना आदर्श वाटणाऱ्या साहित्याला महत्त्व देऊन त्यांनी आपल्या व्याख्यानांमधून हा युगीन बोध प्रकाशात आणण्याचा प्रयत्न केला आहे. मध्यकाळाची ओळख करून घेण्यासाठी, मध्यकालीन धर्म-साधना समजून घेणे व त्यांचे विवरण करून सांगणे याची आवश्यकता आहे याची त्यांना जाणीव झाली. आपल्या 'मध्यकालीन धर्मसाधना' नावाच्या ग्रंथातून त्यांनी हे महत्त्वाचे कार्य केले आहे. या विषयाशी संबद्ध अशा विभिन्न कालखंडांवरचे निबंध या पुस्तकात संग्रहित आहेत. यात त्यांनी विभिन्न धर्म-साधनांचा परिचय वाचकाला करून दिला आहे. यासाठी त्यांनी अनेक संप्रदायांचे साधना-विषयक, सिद्धान्त-विषयक ग्रंथ तसेच तत्संबंधित काव्यग्रंथांमध्ये उपलब्ध असलेली सामग्री एकत्रित केली आहे. उत्तर-भारतातील मुख्य धर्म-साधना व त्यांची सामाजिक पार्श्वभूमी यांचे सखोल विश्लेषण या निबंधांमधून केले गेले आहे. ते द्विवेदींच्या ऐतिहासिक दृष्टीची व शोध-प्रवृत्तीचीही ओळख करून देते.



भारताचा मध्यकाल विभिन्न प्रकारचे धर्म व संप्रदाय यांचा काळ आहे. 'हिंदी साहित्य की 'भूमिका' मध्ये ते लिहितात :

''या युगाचे साहित्य केवळ साहित्य नाही, तर लोकांमध्ये घट्ट मुळे रुतवलेल्या साधना-पद्धतींचे ते सार आहे, व त्याचा हा दुसरा पैलूच अधिक महत्त्वाचा आहे.''

या दुसऱ्या अधिक महत्त्वाच्या पैलूबद्दल द्विवेदी या निबंधांमधून विवेचन करतात. 'तंत्रप्रमाण और पंचदेवोपासना', 'पांचरात्र और वैष्णव मत', 'पाशुपत मत और शैवागम', 'कापालिक मत', 'जैनमरमी', 'योगसाधना की परंपरा', 'सहज और नाथसिद्ध', 'धर्म और निरंजन मत' इत्यादी शीर्षकांवरूनच स्पष्ट होते की या ग्रंथातून मध्ययुगातल्या धर्मसाधनांवर गांभीर्याने विचार केला गेला आहे. अनेक वैदिक-अवैदिक, भारतीय-अभारतीय, आस्तिक-नास्तिक साधनांची चर्चा ते येथे करतात. त्यांच्या शास्त्रीय रूपांची ओळख तर ते करून देतातच, पण त्याव्यतिरिक्त सामान्य जनांमध्ये प्रचलित लोकधर्मातील अनेक पूजा-पद्धती, दैवत-मंडळ आणि धार्मिक विश्वास/श्रद्धा यांच्या दीर्घकाळापासून चालत आलेल्या परंपरेकडेदेखील लक्ष वेधतात.

'सहज-साधना' हे द्विवेदींच्या चार व्याख्यानांचे संकलन आहे. ही व्याख्याने त्यांनी नागपूर येथे दिली होती व त्यांचे आयोजन मध्य प्रदेश शासन-साहित्य परिषद द्वारा केले गेले होते. या व्याख्यानांची शीर्षके आहेत- 'साधनाकेंद्र', 'शब्दसाधना', 'सुरति और निरति' तसेच 'मधुरोपासना.' तसे तर या सर्व व्याख्यानांचा प्रमुख विषय सहजसाधना आहे, पण प्रसंगी त्यांनी इतर काही साधना पद्धतींचीही चर्चा केली आहे. त्यांच्या खास शैलीमुळे ही चर्चा इतकी मनोरंजक होते की अतिशय गहन व रूक्ष विषयही वाचकाला सोपा आणि मनोरम वाटू लागतो. या पुस्तकाच्या शेवटच्या निबंधाच्या अखेरीस त्यांनी एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे, की आजच्या, मानवजातीसमोरच्या समस्या सोडवण्यासाठी या साधना उपयुक्त ठरतात की कालबाह्य? आजच्या भौतिक विज्ञानाचे या तत्त्ववादाशी काही सामंजस्य असू शकते? आणि उत्तरादाखल द्विवेदी म्हणतात :

'विश्वब्रह्मांडात व्यापून राहिलेली मूळ चित्-शक्ती सकल प्राणी-जगताला व्यापून टाकते. मनुष्याच्या रूपात याच शक्तीचा सर्वोत्तम विकास झाला आहे. जे जे त्या चित् शक्तीला अनुकूल असे आहे ते सर्व ग्राह्य आहे व जे जे चित्शक्तीला प्रतिकूल आहे ते सर्व अग्राह्य, अनाचरणीय आहे. मध्ययुगातल्या संतांनी जटिल, बिकट, किचकट असलेल्या साधना पद्धती सोप्या बनवताना त्या मूल-तत्त्वाचा विचार केला होता.''

द्विवेदींच्या म्हणण्यानुसार :

''संतांचा आणि भक्तांचा संदेश आजही उपयुक्त आहे. कारण तो माणसावर यंत्राच्या होऊ पाहणाऱ्या वर्चस्वाला विरोध करतो, आणि भौतिक यांत्रिकता नव्हे, तर चिदोन्मुख मानवता हीच गोष्ट महान आहे या बाबींवर भर देतो.''

या प्रकरणाच्या प्रारंभी द्विवेदींच्या ऐतिहासिक दृष्टिकोनाची चर्चा झाली आहे. त्याची उत्तम उदाहरणे म्हणून त्यांची 'हिंदी साहित्य की भूमिका', 'हिंदी साहित्य का आदिकाल' व 'हिंदी साहित्य: उद्भव और विकास' ही समीक्षेची पुस्तके वाचता

येतील. 'हिंदी साहित्य की भूमिका' ही द्विवेदींची पुस्तक-रूपामधली दुसरी समीक्षाकृती आहे. (याच्या आधी त्यांचे 'सूर साहित्य' प्रकाशित झाले होते) या पुस्तकात द्विवेदी हिंदी साहित्याकडे एका विशाल परंपरेचे एक अंग या दृष्टीने पहातात. ते हिंदी साहित्याला संपूर्ण भारतीय साहित्यापासून अलग करत नाहीत. म्हणूनच तेथे वारंवार संस्कृत, पाली, प्राकृत आणि अपभ्रंश भाषांमधील साहित्याची चर्चा आली आहे, आणि परिशिष्टात त्यांनी वैदिक तसेच बौद्ध आणि जैन साहित्याचाही उल्लेख केला आहे. 'अशोक के फूल' मध्ये संकलित केलेल्या 'हमारे पुराने साहित्य के इतिहास की सामग्री' या शीर्षकाच्या लेखात द्विवेदींनी लिहिले होते :

''माझा असा विचार आहे की हिंदी साहित्याचा इतिहास लिहिण्याआधी खाली उल्लेख केलेल्या साहित्याची तपासणी करणे उपयुक्त ठरेल. त्यांच्याबद्दलची योग्य जाण आल्याशिवाय आपल्याला जसे भक्तिकाळातले साहित्य समजू शकणार नाही तसेच वीरगाथा वा रीतिकाल यांचेही आकलन होऊ शकणार नाही- 1. जैन आणि बौद्ध अपभ्रंशमधील साहित्य. 2. काश्मीरमधील शैव आणि दक्षिणेकडच्या व पूर्वेकडच्या तांत्रिकांचे साहित्य. 3. उत्तरेकडच्या व उत्तर-पश्चिमेकडच्या नाथपंथीयांचे साहित्य. 4. वैष्णव आगम. 5. पुराण. 6. निबंध ग्रंथ 7. पूर्वेकडील प्रच्छन्न 'बौद्ध-वैष्णवां'चे साहित्य. 8. विविध लौकिक कथांचे साहित्य.''

हे सांगायलाच नको की आपल्या इतिहास-लेखनात द्विवेदींनी या सर्व साहित्यातील सामग्रीचा उपयोग केला आहे. 'हिंदी साहित्य की भूमिका'मधे त्यांनी, भारतीय चिंतनाच्या स्वाभाविक विकासाचे रूप म्हणून हिंदी साहित्याकडे पाहिले आहे. आचार्य शुक्ल यांनी हिंदीच्या भक्तिकाळाबद्दल म्हटले होते की देश मुसलमानी अंमलाखाली आल्यानंतर हिंदू जनतेची मने गौरवशून्य व उत्साहशून्य झाली होती. आपल्या पौरुषाबद्दल निराश, हताश झालेल्यांना मग आपल्या समाजासाठी ईश्वराची शक्ती आणि करुणा याकडे ध्यान देण्याखेरीज दुसरा मार्ग उरला नव्हता. शुक्ल यांच्या या मताचे द्विवेदींनी जोरदार खंडन केले आहे. ते म्हणतात :

''ही दुर्भाग्याची गोष्ट आहे की, हिंदी साहित्य अभ्यासण्याचा व ते लोकांच्या नजरेसमोर आणण्याचा भार ज्या विद्वानांनी आपल्या शिरावर घेतला आहे तेसुद्धा हिंदी साहित्याचा संबंध हिंदू समाजाशीच अधिक असल्याचे सांगत आहेत. या तऱ्हेने कोणाही अज्ञानी माणसाला दोन प्रकारे विचार करण्याची सवलत दिली जाते. पहिली ही की हिंदी साहित्य ही एका अस्मिताशून्य, पराजित समाजाची संपत्ती आहे व या कारणामुळे त्याचे महत्त्व त्या समाजाच्या राजकीय उत्थान-पतनाशी अंगागी-भावाने संबद्ध आहे. आणि दुसरे असे की, असे जरी नसेल तरीसुद्धा ते (हिंदी साहित्य) एका निरन्तर पतनशील समाजाच्या चिंतांचे व चिंतनाचे मूर्त प्रतीक आहे ज्याला स्वत:चे अंगचे असे काही विशेष महत्त्व नाही. माझा या दोन्ही गोष्टींना विरोध आहे... यामुळे मी इस्लामचे महत्त्व विसरतो आहे असे नाही, परंतु ठामपणे असे सांगू इच्छितो, की इस्लामचे आगमन येथे झाले नसते, तरीसुद्धा हे साहित्य तसेच असते जसे ते आज आहे.''[1]

1. हजारीप्रसाद द्विवेदी ग्रंथावली-3, पृ. 33-34



जितक्या ठामपणे द्विवेदी ही गोष्ट सांगतात तशाच समर्थपणे आपल्या मुद्याच्या समर्थनार्थ ठोस पुराव्यानिशी तर्क सादर करतात. इसवी सनाच्या पहिल्या शतकापासून पंधराव्या शतकापर्यंतच्या सांस्कृतिक परिस्थितीचे सखोल विश्लेषण करून द्विवेदी सिद्ध करतात की, इसवी सनाच्या हजार वर्षांनंतर इथले सगळे संप्रदाय, शास्त्रे व मते हळूहळू लोकमतात सरमिसळून लुप्त झाली व या गोष्टीच्या स्वाभाविक परिपाकाचे मूर्त प्रतीक हिंदी साहित्य आहे. आपला निष्कर्ष सादर करताना द्विवेदी लिहितात :

इसवी सनाच्या एक हजार वर्षांनंतर भारतीय पांडित्य, आचार-विचार आणि भाषा या बाबतीत स्वभावत:च लोकाभिमुख झाले होते. पुढील शतकांमध्ये भारतीय इतिहासातली अत्याधिक महत्त्वाची घटना-इस्लामचा मुख्य विस्तार-जर घडलीही नसती तरीही ते याच मार्गाने गेले असते. त्याच्या अंतरंगामधली शक्ती त्याला याच स्वाभाविक विकासाच्या दिशेला रेटा देत चालली होती.''[1]

अशाप्रकारे द्विवेदी साहित्याच्या इतिहासाला लोक चेतनेच्या इतिहासाच्या रूपात विश्लेषित करतात. कारण तो भारतीय चिंतनाच्या प्रवाहाचा स्वाभाविक विकास आहे. ही त्यांची इतिहास दृष्टी त्यांच्यापूर्वीच्या इतिहासकारांहून वेगळी आहे. ते याच दृष्टिकोनातून हिंदी काव्यातील अनेक प्रवाहांच्या उद्भवासंबंधीची प्रचलित मते खोडून काढतात. पूर्ववर्ती विद्वानांच्या स्वीकृत मतानुसार, आदिकालामधील व भक्तिकालामधील विविध काव्यधारा इस्लामच्या प्रभावाचा परिणाम म्हणून विकसित झाल्या. द्विवेदींना हे मान्य नाही. ते म्हणतात की मुसलमानांच्या आगमनाच्या आधीसुद्धा अपभ्रंश आणि लोकभाषांना सन्मानपूर्ण स्थान होते. संत कवी विशुद्ध ज्ञानमार्गी नव्हते तर प्रेममार्गी देखील होते असे ते मानतात. सूफी संतांच्या प्रबंध-काव्यांची प्रतिपादन शैली व त्यांच्या कथानक पद्धती, शैली यांची तपासणी ते करतात व त्यांच्या प्रेमाख्यानांचा धागा भारतीय साहित्याच्या परंपरेशी जोडतात. कृष्णभक्तीच्या मूलस्रोताचा मागोवा घेताना ते तांत्रिक साधनेपर्यंत पोचतात.

अशा प्रकारे हिंदी साहित्याचा आदिकाळ व भक्तिकाळ यासाठी द्विवेदी एक विद्वान इतिहासकार म्हणून आपल्या समोर येतात. आपल्या प्राचीन साधना-परंपरांबद्दल सखोल अभ्यास व विचार त्यांनी केला आहे. तसेच इतिहासाकडे एक निरन्तर प्रवाह म्हणून पाहण्याची त्यांची दृष्टी असते. अभ्यासपूर्ण अनुमानांच्या बळाच्या आधारे आपल्या पूर्ववर्ती इतिहासकारांना आव्हान देण्यास ते पूर्णपणे समर्थ ठरतात.

'हिंदी साहित्य का आदिकाल' हा ग्रंथ द्विवेदींच्या पाच व्याख्यानांचा संग्रह आहे. ही व्याख्याने बिहार-राष्ट्रभाषा परिषदेच्या वतीने दिली गेली होती. द्विवेदींचा हा ग्रंथ संशोधनपर आहे. हिंदी साहित्याचा आदिकाल एका अर्थी हिंदीचे अंधकार युग होते. त्या काळावर सर्वात प्रथम प्रामाणिक प्रकाश टाकण्याचे कार्य द्विवेदींनीच केले. त्या काळावर आत्तापर्यंत जो प्रकाश पडला होता तो पुरेसा नव्हता. अपुरा होता. द्विवेदींना हे जाणवले होते :

''शुष्क घटना आणि सनावळ्या-तिथीतारखा यांनाच इतिहास मानण्याच्याच

1. हजारीप्रसाद द्विवेदी ग्रंथावली, 3, पृ. 44

दृष्टीला प्रतिष्ठा असणे ही खेदाची गोष्ट आहे. याचा परिणाम असा झाला आहे की देशामधल्या अन्य कित्येक महत्त्वाच्या स्थितींची उपेक्षाच झालेली आहे. जर इतिहासाचा अर्थ मानवी जीवनाच्या अखंड प्रवाहाचा अभ्यास हा असेल तर हिंदी साहित्याच्या आदिकालाचा इतिहास अगदी उपेक्षणीय मुळीच नाही. पण दुर्दैवाने तो खरोखरच उपेक्षित राहून गेला आहे.''

या उपेक्षित काळाबाबतच्या पुष्कळशा समस्यांची उकल द्विवेदींनी केली आहे. हिंदीमधील अनेक काव्य-प्रकारांचे सूत्र प्राकृत व अपभ्रंशमधील काव्यरूपामध्ये शोधताना मध्यकालीन हिंदी काव्य प्रकारांचा संबंध त्यांनी त्या पूर्वरूपांशी जोडून दिला आहे. इतकेच नव्हे, हिंदी साहित्याशी विभिन्न प्रांतांमधील साहित्याचा संबंध तपासून पाहताना त्यांच्या काव्य प्रकारांचा तुलनात्मक अभ्यासही सादर केला आहे. हा एक सर्वथा नवीन अभ्यासही आहे.

'हिंदी साहित्य : उसका उद्भव और विकास' या द्विवेदींच्या ग्रंथात आदिकाळापासून आधुनिक काळातल्या प्रगतिवादापर्यंतच्या इतिहासाची संक्षिप्त माहिती दिली गेली आहे. वस्तुत: हे पुस्तक विद्यार्थ्यांना दृष्टीसमोर ठेवून लिहिले गेले होते. त्यात असा प्रयत्न केला गेला होता की जास्तीत जास्त सुबोध भाषेत साहित्यातील विभिन्न प्रवृत्ती व त्याच्या महत्त्वाच्या बाह्यरूपांचे मूळचे व वास्तविक स्वरूप यांची स्पष्ट ओळख त्यातून व्हावी. या पुस्तकात द्विवेदींचे आत्तापर्यंतचे साहित्यविषयक अध्ययन व निष्कर्ष संक्षेपाने आढळतील व त्यांच्या इतिहासदृष्टीचा प्रकाशदेखील. द्विवादींची मते व त्यांची इतिहासदृष्टी यांबद्दल मागील पृष्ठांमध्ये लिहिले गेलेच आहे, तेव्हा त्या पुस्तकाबद्दल वेगळे लिहिण्याची विशेष जरुरी नाही. या पुस्तकात हिंदी साहित्याच्या आधुनिक काळाबद्दलचे त्यांचे विचार व्यक्त झाले आहेत. विभिन्न कवी, लेखक वा प्रवृत्ती यांबद्दलची ही संक्षिप्त टिपणे आहेत व तरीही महत्त्वाची आहेत. त्यांनी आपल्या उदार मानवतावादी दृष्टिकोनातूनच हिंदीच्या आधुनिक काळाकडे देखील पाहण्याचा व त्याचा वेध घेण्याचा केलेला प्रयत्न येथे दिसून येतो. वस्तुत: हाच त्यांचा पायाभूत दृष्टिकोन राहिला आहे व त्या आधारे ते संपूर्ण हिंदी साहित्याचे मूल्यांकन करतात. हे मूल्यांकन करताना त्यांची शोध-दृष्टी व इतिहास-दृष्टी सतत जागृत राहते. हिंदीचा आदिकाल आणि मध्यकाल यांच्या मूल्यमापनामध्ये द्विवेदींचे एक महत्त्वपूर्ण योगदान आहे व यानंतरच्या कोणाही टीकाकाराला ह्या योगदानाचा स्वीकार करूनच पुढे जावे लागेल.

## 5.

# विचारदर्शन आणि लालित्य-चिंतन

'बाणभट्ट की आत्मकथा' मध्ये भट्टिनी म्हणते, ''ह्या नरलोकापासून ते किन्नरलोकांपर्यंत एकच प्रेममय हृदय व्याप्त आहे.''[1]

असे म्हणता येईल की पं.हजारीप्रसाद द्विवेदींच्या सर्जनशील प्रतिभेचा अखंडित विलास त्याच प्रेममय हृदयाचा साक्षात्कार आहे. त्यांच्या समस्त कृतित्वात हेच व एकच प्रेममय हृदय व्याप्त आहे. लेखक द्विवेदींच्या व्यक्तित्वाचा आत्मा त्यांची संवेदनशीलता आहे. त्यांच्या संपूर्ण कृतित्वामधून प्रवाहित होऊन राहिलेली ती एक अंत:सरिता आहे. म्हणूनच त्यांच्या लेखनाच्या वाचनाने वाचकाच्या हृदयात समवेदनेचा संचार होतो. त्यांच्या लेखनात वाचकाला संवेदनशील व मृदुहृदयी, कोमल बनवण्याची शक्ती आहे. साहित्याचे याहून मोठे दुसरे उद्दिष्ट नाही- साहित्य माणसाच्या आतल्या त्या अंत:सरितेचा कुंठित झालेला प्रवाह पुन्हा वाहता करते, माणसाच्या क्रूर वृत्ती तरल बनवते. द्विवेदींनी लिहिले आहे:

''ज्या साहित्यिकाला मानवजातीबद्दल पुरेशी सहानुभूती प्रत्यक्षात वाटत नाही आणि जो जीवनाच्या विभिन्न स्तरांकडे स्नेहार्द्र दृष्टीने पाहू शकत नाही तो महान साहित्य-सृष्टीचा निर्माता होण्याची शक्यताच नाही.''[2]

द्विवेदींच्या या कथनामधले 'मानव सहानुभूती' तसेच 'स्नेहार्द्र दृष्टी' सारख्या शब्दप्रयोगांकडे लक्ष देणे आवश्यक आहे, कारण या गोष्टीच त्यांच्या लेखनाचे स्रोत आहेत, व त्यांच्यामुळेच त्यांच्या लेखनात काही ठिकाणी काहीशी अतिशय भावुकता आणि जरा अधिक सुस्कारे, सांत्वनादेखील (भावोच्छ्‌वास) आढळतात. काही जागी तर त्यांचे लेखन 'लिरिकल' झाले आहे. यामुळेच काही विद्वान द्विवेदींना निखळ टीकाकार मानत नाहीत. द्विवेदी निखळ टीकाकार आहेत की नाहीत हा वादाचा विषय आहे पण माझ्या मते त्यांचे व्यक्तित्व हे मूलत: सर्जनशील कलावंतांचे व्यक्तित्व आहे आणि ते एक निर्मितिक्षम समीक्षक देखील आहेत. एक कलावंत जेव्हा समीक्षक देखील असतो तेव्हा 'सूर साहित्य' आणि 'कबीर' सारख्या लेखनकृती लिहिल्या जातात. कलावंताशी एकरूप, एकजीव, समरस होऊन समीक्षा करणे ही एक कठीण

1. **बाणभट्ट की आत्मकथा**, पृ. 217
2. **साहित्य-सहचर**, पृ.19.

साधना आहे व ती अशा लेखकालाच साधते ज्याच्यात 'सहानुभूती' व 'स्नेहार्द्र दृष्टी' आहे व जो 'नरलोकापासून किन्नरलोकापर्यंत व्यापून टाकणाऱ्या एकाच प्रेममय हृदयाचा साक्षात्कार करू शकतो. सर्जनशील प्रतिभा व समीक्षा-चिंतन यांचा जो मेळ द्विवेदींच्या कृतींमधून दिसतो तसा आधुनिक काळातल्या कुणा हिंदी लेखकात आढळणे असंभवनीयच आहे, आणि आजच्या काळात एका लेखकाने साहित्याला इतक्या कालजयी साहित्यकृती द्याव्यात असे उदाहरणही द्विवेदींच्या नंतर सापडणे कठीण आहे. त्यांच्या कृतींची, निर्मितीची तुलना अन्य कोणाही लेखकाच्या कृतींशी केली जाऊ शकत नाही व यासाठी त्यांच्या साहित्यकृती अद्वितीय आहेत असेच म्हणावे लागेल. 'कबीर' आणि 'बाणभट्ट की आत्मकथा' सारख्या निर्मितीसाठी हिंदी साहित्याला दीर्घ प्रतीक्षा करावी लागेल अशीच शक्यता दिसते.

द्विवेदींचे साहित्य मानवाच्या विराट महत्तेचे, गौरवाचे साहित्य आहे. मनुष्याला ते जड वस्तू किंवा पशू मानत नाहीत, तर विकासाची अंतिम परिणती मानतात. मनुष्यामधल्या त्यांच्या या आस्थेमधे कधी खंड पडत नाही. मनुष्याच्या जययात्रेवर त्यांचा अखंड विश्वास आहे. कदाचित यामुळेच आजचा अगदी नवा लेखकदेखील द्विवेदींचा आदरपूर्वक स्वीकार करतो; मग त्यांची परंपराप्रियता दिसत असली तरीही; आणि द्विवेदींच्या कृतींसकट त्यांची समयोचितता टिकून राहते.

द्विवेदींच्या दृष्टिकोनानुसार माणूस हाच साहित्याचे लक्ष्य आहे. ''साऱ्या मानव-जातीला सुंदर बनवण्यासाठी केलेल्या साधनेचेच नाव साहित्य''[1] असे ते मानतात. ''जे वाग्जाल वा शब्दावडंबर माणसाला दुर्गती, हीनता, परावलंबित्व यापासून वाचवू शकत नाही, जे त्याच्या आत्म्याला तेजाने उजळून टाकत नाही आणि त्याच्या हृदयाला परदु:खकातर व संवेदनशील बनवण्यात कमी पडते त्याला साहित्य असे नाव देण्याचा''[2] त्यांना संकोच वाटतो. साहित्याच्या इतिहासाबद्दलही त्यांना असे वाटते की इतिहास म्हणजे, ''ग्रंथ व त्यांचे निर्माते लेखक, कवी यांच्या निर्माणाची व विकासाची कहाणी नव्हे. ती वास्तविक अनादी अशा काळ-प्रवाहात निरंतर प्रवाहित राहिलेल्या जिवंत मानव-समाजाचीच विकास गाथा आहे. ग्रंथ आणि त्यांचे निर्माते, संप्रदाय आणि त्यांचे गुरू त्या परम शक्तिवान प्राणधारेच्या दिशेकडे फक्त इशाराच करू शकतात.''

द्विवेदी अर्ध-सत्याचा, खंडित सत्याचा स्वीकार करत नाहीत. ज्या योगे जगाचे आत्यंतिक कल्याण होऊ शकते तेच त्यांच्या दृष्टीने 'सत्य' असते. 'बाणभट्ट की आत्मकथा' मध्ये अघोर भैरव म्हणतात :

''हे पाहा, विरति, सत्य अखंड असते. तुमच्या बौद्ध दार्शनिकांनी व्यावहारिक सत्य आणि पारमार्थिक सत्य अशी नावे देऊन त्याचे विभाजन करण्याचे ढोंग रचले आहे, जणू ही दोन्ही सत्ये परस्परविरोधीच आहेत. माझ्या दृष्टीने जे सत्य आहे ते जर खरोखरच अंतिम सत्य असेल तर ते अखिल जगाचे सत्य आहे, ते व्यवहाराचे सत्य आहे, तसेच पारमार्थिकही सत्य आहे, ते त्रिकाल सत्य आहे.''[3]

1. कल्पलता, पृ. 138 2. अशोक के फूल, पृ. 156
3. बाणबट्ट की आत्मकथा', पृ. 249



या 'सत्या'पर्यंत पोचायचे तर 'आत्मदान' आवश्यक आहे.

''स्वत:च स्वत:ला गळून पडलेल्या द्राक्षाप्रमाणे पिळून काढून केलेले आत्मदान! जोपर्यंत स्वत:ला इतरांसाठी समर्पित केले जात नाही, तोपर्यंत स्वार्थ हाच खंडित सत्यासारखा आहे. तो मोहाला प्रोत्साहन देतो, तृष्णेला जन्म देतो आणि मग माणूस एक दयनीय कृपण बनतो. या कृपणतेने ज्याचा स्वभाव भ्रष्ट व ग्रस्त झाला आहे. त्याची दृष्टीही मलिन होऊन तो स्पष्ट पाहू शकत नाही- त्याला स्वार्थदेखील समजत नाही- परमार्थ तर दूरच राहो!''

या आत्मदानाबद्दल द्विवेदी वारंवार आपल्या लेखांमधून, भाषणांमधून बोलतात. त्यांच्या कादंबऱ्यांमधील पात्रेही ह्याच्या प्राप्तीसाठी आसक्ती दाखवतात. आणि, स्वत: द्विवेदीसुद्धा याकडेच असलेला आपला कल दाखवत नाहीत काय? त्यांनीही प्राचीन काव्य, दर्शने, ज्योतिष आणि संस्कृतमधल्या श्रेष्ठ साहित्याचा सखोल अभ्यास यासाठी स्वत:ला सर्वस्वानिशी समर्पित केले नाही काय?

माझ्या मते, आधुनिक काळातला दुसरा कोणीही साहित्यिक हिंदी साहित्याला देऊ शकला नसता अशी त्यांची ही सर्वात मोठी देणगी ठरावी. त्यांनी बाणभट्ट आणि कालिदास यांना हिंदी साहित्याच्या क्षेत्रात आणले आहे. त्यांच्या कादंबऱ्यांमधून कादंबरी, हर्षचरित, मृच्छकटिक, अभिज्ञानशाकुंतलम्, कुमारसंभव अशांसारख्या अभिजात कृतींच्या रसवत्तेचा अनुभव घेता येतो. त्यांच्या चिंतनातून संस्कृतच्या विशाल परंपरेचा साक्षात्कार होऊ शकतो, त्या ज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव येऊ शकतो. सांगायलाच नको की त्यांच्या कार्यकर्तृत्वाची भूमी पुरातन असली तरी ते त्या प्राचीनाला नव्या प्रकाशात पारखतात. ज्याप्रमाणे शव साधनेच्या पूर्णावस्थेमध्ये शवाचे मुख साधकाच्या दिशेने सामोरे होते तशाच तऱ्हेने द्विवेदीसुद्धा भूतकाळाचे तोंड वर्तमानाकडे वळवून घेतात. जे लोक द्विवेदींच्या सहवासात राहिले आहेत ते मान्य करतील की त्यांच्या सहवासात असणे हा एक विशिष्ट अनुभव आहे. साध्याच गप्पागोष्टी करतानाही ते शब्दांच्या भूतकाळात शिरकाव करून त्यांच्या इतिहास-शोधनाने चकित करून टाकतात. त्याच तऱ्हेने कादंबऱ्यांमध्येही ते भूतकाळातल्या जुन्या वाटणाऱ्या गोष्टींची नव्या प्रकाशात तर्कशुद्ध स्पष्टीकरणे देतात.

द्विवेदी मानव देहाला अत्यंत महत्त्व देतात. त्याला देवाचे मंदिर, सर्व साधना-क्रियांचे केंद्र मानतात. 'बाणभट्ट की आत्मकथा' मध्ये सुचरिता म्हणते:

''माणसाचा देह केवळ शिक्षा भोगण्यासाठी बनलेला नाही, आर्य! ती विधात्याची सर्वोत्तम सृष्टी आहे. नारायणाचे पवित्र मंदिर आहे हे!''

म्हणूनच द्विवेदींच्या मते प्रवृत्तींना, प्रेरणांना दाबून ठेवावे हे योग्यच नाही व आपण त्यांच्या दबावाखाली राहणेही योग्य नाही. कोणालाही न घाबरण्याचा ते सल्ला देतात :

''कोणाचेही भय बाळगू नका. लोकांचे भय, वेदांचे भय, गुरूचे, मंत्राचेही भय नसावे.''

'' अरे बाबा, या ब्रह्मांडाचा प्रत्येकच अणू देव आहे. त्रिपुरसुंदरीने तुला ज्या रूपात सर्वात जास्त प्रभावित केले, त्याच रूपाची पूजा कर तू!''

मध्यकालीन कवींचे मूल्यांकन करतेवेळी सुद्धा द्विवेदींनी स्वाभाविक प्रेरणांच्या

दमनाला विरोध केला आहे. 'सूर साहित्य' या पुस्तकात ते गोपींच्या स्वच्छंद प्रेमाचे समर्थन करतात. भक्तिकाळातल्या इतर कवींबाबत बोलतानाही ते प्रेम ही गोष्ट महत्त्वाचीच मानतात. सरंजामशाहीतील यांत्रिक, कृत्रिम नैतिकता आणि सोवळेपणा त्यांना अमान्य आहे. प्रेम हा त्याविरुद्धचा एक विद्रोहच आहे. ते प्रेमाला पाप समजत नाहीत. भारतीय चिन्तन-स्रोतासंबंधी त्यांनी स्पष्ट म्हटले आहे की ते चिंतन ख्रिस्ती पाप-बोधाची संकल्पना स्वीकारत नाही. 'अनामदास का पोथा' मध्ये जीवनाच्या महानतेचा साक्षात्कार प्रेमाच्या माध्यमातूनच होत असल्याचे त्यांनी मांडले आहे. भगवती म्हणते; ''तुझ्या स्वभावात प्रेम आहे. त्याच माध्यमातून तुला सत्य सापडेल, सत्याचा साक्षात्कार होईल.''

द्विवेदी अंतरंगातल्या देवाला महत्त्व देतात व त्या अंतर्यामीचाच कौल मानतात. 'बाणभट्ट की आत्मकथा' मध्ये बाबा म्हणतात :

''बघ रे बाबा! तुझी शास्त्रे तुला धोका देताहेत. जे तुझ्या आतले सत्य आहे ते दडपून ठेवायला सांगताहेत. जे तुझ्या आत आकर्षण आहे ते विसरायला व ज्याची तू पूजा करतोस त्याचाच त्याग करायला सांगताहेत.''[1]

'अनामदास का पोथा' मध्ये महर्षि औषस्ति म्हणतात :

''जोपर्यंत स्वत: परीक्षा करत नाही तोपर्यंत दुसऱ्याने सांगितलेल्या एखाद्या गोष्टीवर विश्वास ठेवता कामा नये. तुझ्या अंतर्यामी जो ईश्वर मूकपणे बसला आहे त्याला ओळख. तो देवच तुला योग्य मार्गदर्शन करेल. तोच प्रज्ञेचे रूप आहे.''[2]

अंतर्यामी विराजमान अशा ईश्वराला द्विवेदी इतके महत्त्व देतात याचा अर्थ असा नाही की ते जगाची पर्वा करत नाहीत. उलट 'अनामदास का पोथा' मध्ये एकान्तात केलेल्या तपाच्या स्थानी समाजसेवेच्या मूल्याला त्यांनी मोठ्या हिरीरीने प्रस्थापित केले आहे. वास्तविक ते ब्रह्माण्डाच्या प्रत्येक अणूला देव मानतात.[3]

''सारे चराचर जग त्याच परम वैश्वानराचा प्रत्यक्ष विस्तार आहे... ज्याचा एक अंश तुझ्या अंतर्यामी प्रकाशित झाला आहे, उजळला आहे.''[4]

चिन्तनाच्या या पातळीवर पोचल्यावर व्यक्ती आणि बाह्य जग यात विरोध उरत नाही. यामुळेच द्विवेदी 'परम वैश्वानर' आणि 'महाअज्ञात' यांना समर्पित होण्याबद्दल बोलतात आणि सारे ज्ञान-संचित 'लोकमंगला'च्या कसोटीवर पारखून घेऊ इच्छितात. 'लोक' आणि 'लोकमंगल' शब्द आचार्य शुक्ल यांच्या चिंतनाच्या संदर्भात जितके महत्त्वाचे आहेत, तसेच, द्विवेदींच्या व्यक्तित्व आणि कृतित्व यांच्या संदर्भात ते शब्द महत्त्वपूर्ण आहेत. हिंदी साहित्यासंबंधीची अनेक विवरणे, व्याख्या, स्पष्टीकरणे ते 'लोकधर्मा'च्या आधाराने करतात. ते शास्त्राला जिवंत जगाशी जोडतात आणि अभिजात साहित्याची पाळेमुळे शोधण्यासाठीही पुन्हा-पुन्हा लोकजीवनाकडेच उन्मुख होतात. 'आम फिर बौरा गये' शीर्षकाच्या निबंधात ते लिहितात: ''जेव्हा कधी एखाद्या पोथीचा लोक-परंपरेबरोबर झगडा सुरू होतो तेव्हा माझ्या मनात एक आशा डोके

1. कित्ता, पृ. 74
2. 'अनामदास का पोथा, पृ. 152
3. 'बाणभट्ट की आत्मकथा,' पृ. 74
4. 'अनामदास का पोथा', पृ. 74



वर काढते की एखादी गुप्त गोष्ट, एखादे मर्म आता हाती लागणार! प्रत्येक वेळीच नवी गोष्ट सुचते असे नाही, पण मी हार मानत नाही. कधीकधी तर अति थोर पंडितांच्या विचारांमध्येही मला विसंगती दिसते. सांगायला संकोच वाटतो, नवविद्वानांच्या क्रोधालाही कचरतो मी, पण या विद्वानाच्या विचाराची संगती लोक-परंपरेशीच लागू शकते आहे ही गोष्ट मनातून काही केल्या जात नाही. कुठेतरी काहीतरी जणू निसटून गेल्यासारखे, काही विस्मरण झाल्यासारखे वाटत राहते.''[1]

द्विवेदींचे चिंतन हे मूलत: लोकधर्मी चिंतन आहे. ते लोकमानसाला अत्यंत महत्व देतात. 'अनामदास का पोथा' मध्ये आचार्य पुरगोभिल म्हणतात :

''ऐकलेत ना धर्मावतार; प्रत्येक गावात, प्रत्येक बाजार, प्रत्येक गल्लीत ही गाणी ऐकू येतील. आज तुम्ही, हा केवळ भावनांचा उद्रेक आहे असे म्हणून टाळू शकाल. पण रुक्ष धर्माचार आणि रूढ संकेतांविरुद्ध हा लोक-मानसातला भाव-उद्रेक एक दिवस प्रत्यक्षातल्या, भौतिक जगातल्या बंडाचे रूप घेऊ शकतो!'' मागच्या प्रकरणांमधून निमित्तानुसार द्विवेदींच्या पुरोगामी, मानवतावादी विचारांबद्दल पुरेशी चर्चा झाली आहे; त्यांचे निबंध, समीक्षा, कादंबऱ्या सर्वत्र हीच त्यांची दृष्टी आढळते. व याच दृष्टिकोनातून त्यांनी साहित्यिकांचे मूल्यमापन केले आहे. ही दृष्टी त्यांना त्यांच्या अभ्यासाने दिली तशीच त्या काळानेही. प्राचीन भारतीय कालजयी कृती व त्यांचे निर्माते यांचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. मध्यकालीन हिंदी संत भक्त कवींच्या रचनांमध्ये रस घेतला होता; व त्यात त्यांना प्रेम, करुणा, त्याग, साधना वगैरे उच्च मानवीय मूल्ये गवसली होती. ते संस्कृत, ज्योतिष, आयुर्वेद, दर्शने, तंत्र, काव्यशास्त्र यांचे विद्वान होते, पण त्याबरोबरच आधुनिक वैज्ञानिक प्रयोग व शोध यांचीही त्यांना माहिती होती. सृष्टीची रहस्ये, माणूस व त्याचा विकास वैज्ञानिक दृष्टिकोनातून समजावून घेण्याचाही प्रयत्न ते करत होते. त्याच वेळी आपल्या काळातल्या समाजातल्या गरजणाऱ्या, फूत्कारणाऱ्या, आक्रोश करणाऱ्या, वळवळणाऱ्या लोकमानसाचा अनुभवही ते घेत होते. या सगळ्याचे मिश्रण होऊन त्यांची दृष्टी बनली व ती एक उदार, व्यापक, प्रगतिशील, आधुनिक, मानवतावादी दृष्टी होती. रवींद्रनाथ आणि महात्मा गांधींच्या मानवतावादी, समाजोन्मुख दृष्टीचा प्रसाद स्वाभाविकपणे त्यांना प्राप्त झाला होता. त्यांच्या काळामधले समाजवादी विचार व चळवळी यांची आवश्यकता त्यांना अर्थपूर्ण,योग्य वाटत होती. जुने ज्ञान नव्या दृष्टीने पारखणे व नवे ज्ञान जुन्या दृष्टीतून तपासणे हे काम त्यांनी मोठ्या समर्थपणे केले. भारतीय चिंतनाने जीवनाविषयी जे शाश्वत निष्कर्ष काढले त्यांबद्दल त्यांना आदर होता. पण भारतीय चिंतनाबद्दलची त्यांची श्रद्धा डोळस होती, ती अंधश्रद्धाळू नव्हती. ते ज्ञानविज्ञानाच्या नव्या प्रकाशात आपल्या प्राचीन शास्त्रांचा व त्या ज्ञानाचा विचार व पारख करतात. भारतीय परंपरेबद्दलचा त्यांचा आदर त्यांचे मानसिक जग संकुचित करत नाही, तर उलट त्यांना एक वैश्विक दृष्टिकोन बहाल करतो. 'जन्मभूमि' आणि 'ठाकुरजी की बटोर' मधे ते त्या एका लहानशा गावातले बारीकसारीक प्रश्नदेखील

1. हजारीप्रसाद द्विवेदी ग्रंथावली, 9, पृ. 47.

अखिल जगासमोर असलेल्या प्रश्नांच्या संदर्भात ठेवून विचार करतात. आपण पाहिलेच आहे की, संस्कृतीच्या संबंधी ते देश-काळ यांच्या खुज्या सीमा पार करून अखिल मानव संस्कृतीबद्दल बोलतात. संस्कृती ही गोष्ट त्यांच्या मते संपूर्ण समष्टीसाठी, समस्त मानव-जातीच्या कल्याणासाठी आहे. ती एक सर्जक शक्ती आहे- जी मोडक्या सडक्या गोष्टी मागे सोडते आणि आवश्यक ते ग्रहण करत जाते.

द्विवेदींच्या साऱ्या चिंतनाच्या केंद्रस्थानी 'मनुष्य' आहे हे पूर्वी सांगितले आहे. मानव-समाज सुंदर बनवण्याच्या साधनेचे नावच साहित्य आहे असे ते मानतात. 'जीवेत शरदः शतम्' या निबंधातून स्पष्ट होते की, प्रत्येक व्यक्तीला जरुरीनुसार अन्न, वस्त्र, शिक्षण मिळेल व जरुरीपेक्षा जास्त मिळवण्याची कुणालाच सवलत असणार नाही अशा एका समाजव्यवस्थेची आवश्यकता त्यांना जाणवत होती. जेव्हा सामायिक स्तरावर अशी व्यवस्था अस्तित्वात येईल, तेव्हाच लहान-सहान गोष्टींवरून ध्यान हटून माणूस उदात्त गोष्टींकडे वळेल. पण याच निबंधातून त्यांना हेही जाणवल्याचे दिसते की आज जेव्हा आम्हाला सामूहिक शिक्षण, सामूहिक संरक्षण इत्यादींकडे वळायला भाग पाडले गेले आहे, तेव्हा आम्हाला सामूहिक रूपात जनतेच्या चारित्र्य-शक्तीचे संरक्षण करण्याची व्यवस्थाही प्रयत्नपूर्वक करावी लागेल.[1] यातच द्विवेदींचा 'संतुलित दृष्टिकोन' दिसून येतो. पुराण्या, जुनाट किंवा आधुनिक, भारतीय किंवा पाश्चात्त्य कोणत्याही एकाच दृष्टिकोनाने द्विवेदींच्या विचारशक्तीला आपल्या कब्जात घेतलेले नाही. पाश्चिमात्यांची अवतरणे दिल्याशिवाय जे विद्वान स्वतःला निःसत्त्व समजतात आणि प्रत्येक विचारासाठी, मतासाठी पश्चिम दिशेकडे लांब तोंड करून हुंगत राहतात अशा परभृत बुद्धिजीवींना द्विवेदी हे एक मोठे उत्तर आहे.

द्विवेदींचे मत असे, की-

''विभिन्न युगांमधल्या साहित्यिक साधनेच्या मुळाशी कोणता ना कोणता व्यापक मानवीय विश्वास जरूर असतो. आधुनिक युगातला हा व्यापक विश्वास मानवतावाद आहे...नव्या मानवतावादी-विश्वासाचा सर्वात महत्त्वाचा गुण आहे त्याची ऐहिक दृष्टी आणि मनुष्याची मूल्ये व महत्त्व यांच्या मर्यादांची जाणीव.''[2] स्वतः द्विवेदींची दृष्टी मानवतावादी होती हे खरे. परंतु त्यांचा मानवतावाद कुठल्याही राजकीय पक्षाच्या आदेशानुसार नव्हता. 'हिंदी साहित्यः उद्भव आणि विकास' या ग्रंथात 'प्रगतीवादा'बद्दल लिहिताना ते म्हणतातः

''या नव्या तत्त्वदर्शनाने प्रभावित होऊन अनेक लेखक कवींनी लेखणी हातात धरली आहे. यात दोन श्रेणींचे लेखक आहेत. एक प्रकार अशांचा की जे कम्युनिस्ट पार्टीशी संबंधित आहेत आणि पार्टीची निर्धारित नीती आणि पार्टीचे आदेश यानुसार साहित्य लिहितात. दुसरा प्रकार अशांचा जे पार्टीशी संबंधित नाहीत, पण या विचारांना त्यांची मान्यता आहे व त्यानुसार त्यांचे प्रयत्न चालतात...कम्युनिस्ट पार्टीशी संबंध

1. हजारीप्रसाद द्विवेदी ग्रंथावली. 9, पृ. 64
2. विचार और वितर्क, पृ. 90



असलेल्या साहित्यिकांना पार्टीच्या आदेशांनुसार चालावे लागते. अशा प्रकारे स्वतंत्र चिंतनाच्या मार्गात पार्टीने अडसर (वा बंदी) आणणे हिताचे नाही. कित्येक 'प्रगतिवादी' लेखक पार्टीचा अंकुश सहन न झाल्यामुळे पार्टीपासून दूर गेले आहेत. भविष्यात पार्टीला आपला असला अंकुश एक तर हटवावा तरी लागेल किंवा मग प्रथम श्रेणीच्या साहित्यिकांपासून पार्टीला वंचित व्हावे लागेल.''[1]

वास्तविक द्विवेदी, आधुनिक भौतिक विज्ञान आणि तंत्रज्ञाला मानवासाठी अत्यंत उपयोगी मानतात. पण त्यांची एक अट आहे. ती आहे चित् तत्त्वाची स्वीकृती, मान्यता. त्यांच्याच शब्दात :

''जो विचार आणि प्रयत्न केवळ स्थूल जगताला डोळ्यांसमोर ठेवून केला जातो तो स्थूल असतो आणि द्वंद्व आणि संघर्ष निर्माण करू शकतो. परंतु ज्या प्रयत्नांनी माणसामधला चिन्मय स्तर प्रभावित होतो, असे प्रयत्न जास्त महत्त्वाचे आहेत. असे कोणीच म्हणत नाही की भौतिक विज्ञानामुळे मिळालेल्या सुखसोयींमुळे माणसाचे जीवन सुखी, समृद्ध बनत नाही; पण प्रयत्न फक्त ऐहिकतेसाठी असता कामा नयेत, चित् तत्त्वाच्या प्राप्तीसाठी असायला हवेत. भौतिक हेच लक्ष्य झाले तर ते माणसाच्या स्वाभाविक मनुष्यतेलाच दडपून टाकेल. मनुष्याचा समस्त आहार-विहार, समस्त मन आणि प्राण, चिदोन्मुख होऊनच अर्थपूर्ण होतात, पण जड-सन्मुख झाले तर स्वतःकरता आणि इतरांकरताही कष्ट, दुःख देणारे ठरतात. शरीर देखील जड-सृष्टीचा विकार आहे, तसेच मन आणि बुद्धीसुद्धा. आणि बाह्य निसर्गात, सृष्टीत तर दृष्टिगोचर पदार्थ तर 'जड' आहेतच. 'चित्'शी या जडाच्या झालेल्या संयोगामुळेच जडामध्ये विभिन्न गुणांचा विकास होत राहिला आहे.''[2]

द्विवेदींचे वरील अवतरणांमधील विचार सडेतोड आहेत. त्यात कुठल्याही प्रकारच्या छुप्या पळवाटा, सोयी नाहीत. हीच त्यांची संतुलित दृष्टी. 'सन्तुलित' शब्दानेही कोणाचा गैरसमज होऊ नये म्हणून ते त्याचेही स्पष्टीकरण देतात. 'समीक्षा में संतुलन का प्रश्न' या निबंधात त्यांनी लिहिले आहे :

''अतिवाद्यांच्या मधे एक मध्यममार्ग शोधत फिरत राहते ती संतुलित दृष्टी नव्हे, संतुलित दृष्टी, कोणत्याही अतिवादी समर्थकांच्या क्षोभ व आवेशामुळे चंचल झालेल्या विचार-धारेत वाहून जात नाही. कोणत्याही अशा अतिवाद्यांचा प्रभाव मूळ सत्यावर पडतो व त्या मूळ सत्यावर अतिशयोक्त समर्थनाचा भडिमार होतो, तसेच दुसऱ्या बाजूंच्या विचारांची उपेक्षाही केली जाते, त्यांना तुच्छ मानले जाते. पण संतुलित दृष्टी मूळ सत्याला नेमकेपणे हात घालू शकते, कारण ती सत्यान्वेषी दृष्टी असते. एका बाजूला ही दृष्टी त्या सत्याचे अखंड समग्र स्वरूप पाहण्याचा प्रयत्न करते, तर दुसरीकडे सतत आत्मपरीक्षण, आत्मशुद्धी व आत्मसुधारणा करण्यासाठी इच्छुक व सज्ज राहते. सर्व तऱ्हेच्या पूर्वग्रह आणि दुराग्रहांपासून दूर राहणारी आणि सगळ्या तऱ्हेच्या योग्य, उचित विचारांना जवळ करणारी अशी ती दृष्टी असते.''[3] अर्थातच

1. हजारीप्रसाद द्विवेदी ग्रंथावली. 3, पृ. 533
2. हजारीप्रसाद द्विवेदी ग्रंथावली-5, पृ. 200
3. हजारीप्रसाद द्विवेदी ग्रंथावली-10, पृ. 142

निर्मिती आणि चिंतन या दोन्ही दिशांनी द्विवेदी ज्या एका बिंदूपर्यंत पोचले त्याला त्यांनी आपल्या यात्रेचा अंत मानले नाही. त्यांच्या लेखनातून एक अस्वस्थता, बेचैनी आणि तळमळ दिसून येते- अधिक काही सांगण्याची, आहे त्याहून अधिक जाणण्याची, विचार करण्याची व्याकुळता, पोटतिडीक तशीच उद्विग्नता देखील. ही अस्वस्थ बेचैनीच कलावंताला वा निर्मात्या व्यक्तित्वाला शुष्क होऊ देत नाही, मरू देत नाही. सतत काही नवे सृजन करूनच ते मरणाला दूर ढकलत राहतात. द्विवेदींची सर्जनात्मकता कधीच समाप्त झाली नाही. ते आयुष्यभर काही नवे रचण्यासाठी, नवे समजून घेण्यासाठी व्याकुळ राहिले.

''ज्या भाषेचा अर्थ समजत नाही, त्याला काही अर्थ नसेलच असे कसे म्हणता येईल? ही आकाश व्यापणारी नक्षत्रे, हा उल्हासाचीच वार्ता जणू घेऊन फिरणारा चंचल वारा, वर उसळणाऱ्या अग्नीच्या ज्वाळांशीच स्पर्धा करणारे संध्याप्रकाशाने उजळलेले गिरिकंदर- या सगळ्याचा काही अर्थ असलाच पाहिजे. त्याचा बोध होत नाही. कितीसे मी समजू शकलो आहे? या विस्तारित ब्रह्माण्डामध्ये... जो कोलाहल ध्वनी ऐकू येत आहे त्याचा काहीच अर्थ नसेल? ती जी विजय-पराजयाची विलक्षण महत्त्वाकांक्षा आहे ती काय वर-वर जशी भासते तशीच आहे? नाही, खोलवर आणखी काहीतरी असले पाहिजे... काहीतरी अधिक.. काहीतरी आणखी... पण काय? सीमाबद्ध मस्तकात उठलेले तरंग पुन्हापुन्हा आपटी खाऊन किनाऱ्यावर धडका मारत आहेत- काहीतरी आणखी आहे, पण काय आहे?''

हजारीप्रसाद द्विवेदींचे संपूर्ण चिंतन 'चारुचंद्रलेख' शास्त्रीय (क्लासिकल) महत्तेने युक्त आहे. साहित्यविषयक प्रश्नांवर गंभीरतेने विचार करताना ते मानवी विकासाचा इतिहास ध्यानात घेतात, मानवतेचे पायाभूत मर्म सांभाळतात, कालजयी साहित्य-कृती व शास्त्रीय ग्रंथ यांचेही मंथन करतात. ह्या सर्व गोष्टी त्यांच्या चिंतनाचे स्वाभाविक वैशिष्ट्य आहे व याच अर्थी द्विवेदी 'आचार्य' आहेत.

त्यांनी जरी साहित्य-शास्त्रासंबंधी स्वतंत्र, व्यवस्थित ग्रंथ लिहिला नसला तरीही जे काही लहान-मोठे, विखुरलेल्या स्वरूपात त्यांनी याविषयी लेखन केले आहे ते त्यांची सखोल विद्वत्ता, स्वतंत्र चिंतन आणि त्यांची सूक्ष्म पकड यांचे दर्शन घडवण्यासाठी पुरेसे आहे.

सन 1930-31 मध्ये द्विवेदींनी 'साहित्य-शास्त्रा'वर एक ग्रंथ लिहिण्याचा संकल्प केला होता. ह्या ग्रंथाची जवळ जवळ 73 पाने लिहिलीही गेली, परंतु काही कारणांमुळे त्यावेळी ते पुरे होऊ शकले नाही व द्विवेदींच्या जीवनकाळातही ते प्रकाशित होऊ शकले नाही. हे पुस्तक 'सूर साहित्य' च्या आधी लिहिले गेले होते.[1] द्विवेदींनी त्या ग्रंथाला काही नाव दिले नव्हते. या पुस्तकात त्यांनी खाली दिलेल्या बारा शीर्षकांखाली काव्यशास्त्राच्या विभिन्न अंगांचे विवेचन केले आहे- 1. सुंदर अतीत के धुँधलके में, 2 भरतसूत्र के व्याख्याता, 3. लोलट आदि आचार्य, 4. ध्वनि संप्रदाय, 5.ध्वनि का प्रादुर्भाव कैसे हुआ, 6. शब्द की वृत्तियाँ, 7. ध्वनि का व्यंग्यार्थ, 8. ध्वनि

1. दे. 'दस्तावेज'-12, डॉ. रामचंद्र तिवारी का लेख, पृ. 35-41



के विरोधी, 9. रीति, गुण और दोष, 10. कविता का भेद, 11. अलंकार, 12. रस और भाव....आदि.

साहित्य-शास्त्रासंबंधीचा हा त्यांचा ग्रंथ सामग्री आणि स्वतंत्र प्रतिभा या दृष्टीनी जरी फार महत्त्वाचा नाही आणि अपुराही आहे, तरीही त्यांचा पहिलाच ग्रंथ म्हणून त्याला ऐतिहासिक महत्त्व आहे.

'नाट्यशास्त्र की भारतीय परंपरा' शीर्षकाच्या आपल्या दीर्घ निबंधात द्विवेदींनी आधुनिक विद्वानांची मते उद्धृत केली असली तरी भारतीय नाट्याच्या विकासात बाह्य प्रभाव होता हे मत त्यांना स्वीकार्य वाटत नाही. त्यांच्या मते त्या विकासाशी कोठल्याही विदेशी परंपरेचा अजिबात संबंध नाही, व नाट्य-परंपरा भारतात फार प्राचीन-ख्रिस्तजन्माच्या शेकडो वर्षे आधीपासून अस्तित्वात आहे.

'प्राचीन भारत के कलात्मक विनोद' नावाच्या शोधपूर्ण ग्रंथात, द्विवेदींनी, गुप्तकालापूर्वीची 100 वर्षे ते नंतरची 100 वर्षे या दरम्यानच्या उपलब्ध साहित्यावर आधारित, त्या युगातल्या कला-विनोदांचा, विविध कलांचा अनोखा परिचय वाचकाला करून दिला आहे. त्यांच्या मते, भारतीय इतिहासातले हे असे युग होते की ज्या काळात भारतीयांनी 'जगण्याच्या कले'चा शोध लावला होता. त्या काळी या देशात एक समृद्ध नागरी व्यवस्था-संस्कृती नांदत होती. सौंदर्याच्या सृष्टीचा जो गौरव आणि रक्षण तिने केले ते अप्रतिम असेच होते. त्या काळातील काव्ये, नाट्ये, आख्याने, चित्रकला, मूर्तिकला, प्रासाद वगैरेंनी आजच्या भारतीयाची मती विस्मयाने गुंग होऊन जाते. द्विवेदींनी याच महत्त्वाच्या काळातला कला-विनोद हिंदी वाचकांसाठी नव्याने उपलब्ध करून दिला आहे. या अभ्यासाच्या पुढच्या टप्प्यात ते विलासिता आणि कलात्मक विलासिता यात फरक करतात. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर :

''पोकळ विलासिता ही केवळ भूक असते. नागडी बुभुक्षा; पण कलात्मक विलासिता संयम, शालीनता, विवेक यांची मागणी करते...ज्यांना सौंदर्याचा सन्मान गौरव आणि रक्षण करणे ठाऊकच नाही, ते भले कितीही विलासी असोत. परंतु कलात्मक विलास त्यांच्या भाग्यात नाही.''[1]

द्विवेदींचा कलेसंबंधीचा मूलभूत दृष्टिकोन समजण्यासाठी त्यांचा 'लालित्य-तत्त्वा'संबंधीचा अभ्यास व चिंतन समजून घेणे आत्यंतिक महत्त्वाचे आहे. 'लालित्य-तत्त्व'या आपल्या पुस्तकात त्यांनी 'सौंदर्य तत्त्वा'बद्दल गंभीर विचार केला आहे. त्यांनी 'सौंदर्यतत्त्वा'ला 'लालित्य तत्त्व' म्हटले आहे. या संदर्भात ते लिहितात :

''माणसाची इच्छाशक्ती जेव्हा सर्जनात्मक रूप धारण करते तेव्हा भारतीय शास्त्रांमध्ये तिला विश्वव्यापिनी सर्जनात्मक शक्ती 'ललिते'चे व्यष्टिसापेक्ष, व्यक्तिगत रूप म्हटले जाते. विश्वब्रह्माण्डात व्याप्त असणाऱ्या सर्जनशक्तीचेच प्रतिनिधित्व ती पिण्डामध्ये करते. शाक्तपंथाच्या शास्त्रांमध्ये सांगितले गेले आहे की सच्चिदानंद महाशिवाची सृष्टीनिर्मितीची आदिम इच्छाच (सिसृक्षा) या विश्वात 'शक्ती'च्या रूपात

1. हजारीप्रसाद द्विवेदी, ग्रंथावली, 7, पृ. 366

उपस्थित आहे. प्रलयकालात महाशिव निष्क्रिय राहतो, त्यावेळी महामाया समस्त जगाच्या प्रपंचाला आत्मसात करून शोभायमान होते. जेव्हा शिवाला लीला करण्याची लालसा उत्पन्न होते तेव्हा हीच महाशक्ती-रूप महामाया जगताचे मायाजाल उत्पन्न करते. शिवाची लीला-सखी असल्यामुळेच तिला ललिता म्हणतात.

.......सत्पुरुषांच्या हृदयात वसणारी ललिता हीच अशी शक्ती आहे की जी माणसाला नवी रचना करण्यासाठी प्रेरणा देते, प्रवृत्त करते. म्हणून ह्या परंपरेने गृहीत धरलेल्या अर्थाने मानवनिर्मित सौंदर्याला 'लालित्य' म्हणणे उचितच ठरेल. 'ललिता सहस्रनाम' ग्रंथात ह्या देवीला 'चित्कला', 'आनंदकलिका', 'प्रेमरूपा', 'प्रियंकरी', 'कलानिधी', 'काव्यकला', 'रसज्ञा', 'रस शेवधि' अशी संबोधने वापरली आहेत. जेथे कोठे मनुष्याच्या चित्तात सौंदर्याचे आकर्षण आहे, सौंदर्य सृजनाची प्रवृत्ती आहे, सौंदर्याच्या आस्वादनाची आस्था आहे, तिथे ही देवी क्रियाशील आहे. यासाठीसुद्धा आपल्या समीक्षा-शास्त्राचे नाव 'लालित्य-शास्त्र' हेच असू शकते.''[1]

लालित्य- तत्त्वाबद्दलच्या या संशोधनपूर्ण अभ्यासाच्या अनुषंगाने द्विवेदी परकीयांनी केलेल्या गहन संशोधनांचाही हवाला देतात. जगातल्या नानाविध आदिम मानवसमूहांच्या प्रथांच्या ज्ञानामुळे जीवविज्ञान, मनोविज्ञान, नीतिशास्त्र, धर्मशास्त्र वगैरेंच्या बाबतीत जो नवीन प्रकाश पडला आहे, मानव विज्ञानाने माणसाच्या मनाच्या रहस्यांबद्दल जी नवीन जाण दिली आहे, शरीर विज्ञानामुळे मानवी शरीरतत्त्वांची जी रहस्ये उकलत चालली आहेत, त्या सर्वच नव्या ज्ञानाच्या प्रकाशात द्विवेदी आपले परंपराप्राप्त ज्ञान पारखत-तपासत जातात. या संदर्भात ते, सर जेम्स जी. फ्रेजर, एडवर्ड वेस्टर मार्क, डॉ. कर्ट शॅख्स, सुसान के. लँगर, अर्न्स्ट कॅसिरर, मॅक्सम्यूलर, फ्रँक थीस, हर्सेकोवित्स, अलेक्झांडर कोजेन, आयान रॉलिन्स इत्यादी विद्वानांच्या गंभीर शोधांचा हवाला देतात. परंतु द्विवेदी पश्चिमी विद्वान व त्यांचे संशोधन यांच्या आहारी जात नाहीत. त्यांचे शोध व संशोधन याकडे ते भारतीय ऋषी, कवी, आचार्य यांच्या विचारांसमवेतच पाहतात. उपनिषदांचे ऋषी, भरतमुनी, अभिनवगुप्त, रवीन्द्रनाथ टागोर या सर्वांनाही उद्धृत करत जातात व भारतीय चिन्तनधाराच समृद्ध करतात. त्यांच्या दृष्टिकोनावर भारतीय शैव, शाक्त, तांत्रिक इ. दृष्टिकोनांचा खोल प्रभाव आहे.

कवींमध्ये कालिदास आणि रवीन्द्रनाथ यांचे स्मरण ते वारंवार करतात. ते नवीन हिंदी शब्ददेखील घडवताना दिसतात. उदाहरणार्थ, 'नॉर्मल' साठी 'नर्म', 'ॲबनॉर्मल' साठी 'अपनिर्मल' 'मिथ'साठी 'मिथक', 'लीजेन्ड्री', साठी 'निजन्धरी' इत्यादी. या सर्व अभ्यासातून निघालेला त्यांचा निष्कर्ष हा की मानव चित्त एक आहे. आदिमानवाची कल्पनासृष्टी आणि रूपसृष्टी यांच्या मुळाशी भयाची भावना नसून उलट आनंदाची आणि मांगल्याची भावना आहे. चैतन्याच्या असीम अभिव्यक्तीसाठी असलेली व्याकुळता हाच लालित्य-तत्त्वाचा मूल स्रोत आहे. सर्वत्र माणसाने उल्हासभराने चंचल होऊन 'जड' बन्धनांवर विजय मिळवण्याचा प्रयत्न केला आहे.

1. हजारीप्रसाद द्विवेदी ग्रंथावली खंड 7-प्रस्तावना, पृ. 34-35



माणसाच्या या उल्हासाची पहिली अभिव्यक्ती नृत्याच्या माध्यमातून झाली आहे. जवळजवळ सर्व आदिम जातींमध्ये वर्तुळाकारात केलेले नृत्य पहायला मिळते.

वाक्‌तत्त्वाचा पहिला उन्मेष माणसाच्या इच्छाशक्तीचा पहिला स्पष्ट विस्फोट आहे. त्यात सुरुवातीला पद आणि पदाचा अर्थ दोन्ही एकवटलेल्या एका संपृक्त रूपातच असावे व नंतर पद आणि पदार्थ हा भेद व सारासार विचार स्पष्ट केला गेला. वाक्-तत्त्वाबरोबरच मिथक तत्त्वही उपस्थित झाले. बाह्य पदार्थाला भावरूपात ग्रहण करणे आणि गृहीत भावाला अभिव्यक्त करणे हे माणसाचेच वैशिष्ट्य आहे. भावरूपात ग्रहण करणे म्हणजे, इच्छा आणि गृहीत भाव पुन्हा अभिव्यक्त करण्याची क्रिया आहे. मनुष्याच्या आत जे चैतन्य आहे ते आपली इच्छाशक्ती व क्रियाशक्ती यांच्या माध्यमातून (द्रष्टव्य) दृश्यस्वरूप ग्रहण करते. पण कोणताही रूपाकार वा रूपकलाकार, शब्द-शिल्पी, चित्र-शिल्पी किंवा मूर्ति-शिल्पी कोणत्याही वस्तूला विशुद्ध वस्तुनिष्ठ रूपात ग्रहण करू शकत नाही. द्रष्ट्याच्या आत सतत एक सर्जक उपस्थित असतो. जेथे अर्थ नाही तेथेही अर्थ शोधण्याची व शोधून काढण्याची रहस्यमय शक्ती माणसाच्या आत्म्यात असते. मेघांच्या अस्ताव्यस्त महालांमध्ये तो मूर्ती बनवतो, तसाच भिंतीवर बेडौलपणे उमटलेल्या डागांमधे चित्र पाहतो, आकाशातल्या नक्षत्रांच्या पसाऱ्यातच 'मेष', 'वृषभ' किंवा 'सिंह' अशा आकृतींची सामग्री त्याला मिळते, अव्यवस्थितपणे उगवून आलेल्या वनस्पतींमधे तो देवीमूर्तीची कल्पना करतो. माणूस एक निपुण निर्माणकर्ता आहे. तो प्रत्येक वस्तूला आपल्या अनुभवाच्या भाषेत रूपांतरित करत राहतो. कलावंताला रचना करण्याआधी काही ज्ञान, जाण असते. त्याने काही पाहिलेले असते आणि नंतर तो त्या मनोमन रचलेल्या वस्तूला एका नव्याच तऱ्हेने स्थूल इंद्रियग्राह्य रूप देतो. या इंद्रियग्राह्य स्थूलरूपात रचना करण्याची क्षमता केवळ माणसामध्येच असते, व यामुळे तो इतर सर्व जीवांहून वेगळा आहे.

द्विवेदींच्या मतानुसार, बाह्य वस्तुजगताशी संघर्ष करताना माणसाने गरज पडल्यामुळे संगीतात्मक ध्वनी बाजूला ठेवून गद्यात्मक भाषेचा आधार घेतला. सामान्य व्यावहारिक उद्दिष्टांची पूर्ती करणारी ही गद्यात्मक भाषा दोन व्यवस्थांनी बद्ध असते- एक तर जड जगतातील बाह्य व्यवस्थेने, आणि दुसरे आपल्याच व्याकरणात्मक आणि वाक्यरचनेबद्दलच्या व्यवस्थेने. कविता या दोन्ही व्यवस्थांचा स्वीकार करते आणि तरीसुद्धा आपली एक तिसरी व्यवस्था-ज्यात छंद, लय, यती, यमक, अनुप्रास वगैरे येतात- तिचाही आधार घेते. द्विवेदींच्या मते कवितेचे एक परिमाण असते- काळाचे. चित्राची दोन आहेत. लांबी आणि रुंदी. मूर्तीची तीन परिमाणे आहेत–लांबी, रुंदी आणि घनता. बाह्य जगताचे अस्तित्व (सत्ता) चार नियमनांमध्ये बद्ध आहे. लांबी, रुंदी, जाडी आणि काल. कलाकार बाह्य जगाच्या अस्तित्वाला ज्या कौशल्याने कलेतून अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न करतो त्याला 'अन्यथाकरण' किंवा इंग्रजीत 'डिस्टॉर्शन म्हणतात. या प्रक्रियेत कलावंताला बाह्य जगामधून जे मिळते त्यात तो स्वत:च्या कल्पनेने काही जोडतो. हीच त्याची रचनात्मक शक्ती आहे. कविता चार परिमाणांच्या जगाला केवळ एका परिमाणात बदलण्याचा प्रयत्न करते-

ती काळात प्रवाहित होते आणि अवकाशात स्थिती प्राप्त करते. ह्या गोष्टीमुळे कविता इतर कलांहून वेगळी असते.

द्विवेदींच्या मतानुसार आदिम मनुष्य विभिन्न परिस्थितीमध्ये आपले मनोभाव व्यक्त करण्यासाठी विशेष प्रकारचे ध्वनी उत्पन्न करत राहिला असणार. हे ध्वनी प्रथम सरमिसळलेल्या अविभक्त प्रवाहासारखे होते. नंतर माणसाने ह्या ध्वनींना अलग-अलग विभाजित करून विवेकपूर्वकतेने वेगळ्या केलेल्या वर्णांच्या भाषेला जन्म दिला. त्याने ध्वनि-प्रतीकांची म्हणजेच शब्दांची निर्मिती केली. हा ध्वनींना वेगळे करण्याचा प्रयत्न माणसाचा रचनात्मक प्रयत्न आहे. ही प्रक्रिया आणि बाह्य जगातल्या पदार्थांमध्ये भेद करण्याची प्रक्रिया दोन्ही बरोबरीने सुरू झाल्या असतील. या प्रक्रियेला कदाचित हजारो वर्षे लागली असतील. परंतु एकदा ही प्रक्रिया हातात आल्यानंतर माणसाच्या विचार करण्याला, जाण येण्याला आणि सर्जनात्मक कृतीसाठी प्रवृत्त होण्याला वेग आला आणि मनुष्य संस्कृती आणि व्यवस्था यांकडे वाटचाल करण्यास उत्सुक झाला. नव्या वस्तू व नवे भाव यांसाठी नवनव्या शब्दांची रचना होऊ लागली. माणूस सतत अर्थासाठी पुढे जात राहिला. जसजशी माणसाची भाषा अर्थप्रधान होत गेली तसतसे तिचे स्वरूप गद्यात्मक होत गेले. छंद, राग व लय क्रमशः मागे पडत गेले. माणसाने या गळून पडलेल्या गोष्टींपासूनही निर्मिती केली. त्याने राग आणि वृत्त,छन्द निर्माण केले. आणखी एक तत्त्व जे निसटून गेले होते त्यालाही भाषेच्या माध्यमाने एकत्र बांधण्याचा प्रयत्न केला गेला. या तत्त्वाला द्विवेदींनी 'मिथक तत्त्व'म्हटले आहे. त्यांच्या मते मिथक तत्त्व खरे म्हणजे भाषेला पूरक आहे.

द्विवेदींच्या मते वेगळ्या वर्णांच्या भाषेतले शब्द एक प्रकारची प्रतीके आहेत. त्यांचा अर्थ बाह्य जगतात होतो तसा अंतर्जगतातही होऊ शकतो. पण शब्द या दोन्ही प्रकारच्या अर्थांची फक्त सूचनाच देतात. म्हणूनच आधुनिक विचारवंत याला शब्द प्रतीकात्मिका भाषा असे म्हणतात. द्विवेदींनी आधुनिक काळातले थोर भाषा-शास्त्रज्ञ अर्न्स्ट कॅसिरर यांचा दाखला देऊन म्हटले आहे की, त्यांच्या मते मनुष्य हा एकमेव प्राणी आहे जो प्रतीकांची निर्मिती करतो. द्विवेदींच्या मते याचाच दुसरा अर्थ हाही होतो की माणसाचे मन 'विवेकदक्ष' असते. तो एका ध्वनीला दुसऱ्या प्रकारच्या ध्वनीहून, एका गीतस्वराला दुसऱ्या गीतस्वराहून व एका प्रकारच्या भावनेला दुसऱ्या प्रकारच्या भावनेहून विवेकबुद्धी वापरून वेगळे करू शकतो. अलगीकरणाची ही क्षमता आणि यथेष्ट सर्जनात्मक निर्मिती हेच मनुष्याचे वास्तविक वैशिष्ट्य आहे.

द्विवेदींच्या मते निश्चित अर्थ प्रकट करण्यासाठी वर्ण निश्चित प्रकारच्या प्रयत्नांची मागणी करतात. माहीत असलेल्या ध्वनींचे माणसाने जर स्वेच्छाचारी संघटन, संयोजन केले तर ते इच्छित अर्थ देण्याला लायक वा समर्थ असत नाही. विभिन्न वर्णांच्या संयोजनाने जे शब्द बनतात त्यांचा संकेतिक अर्थ एकूण समाजमानसाने स्वीकारावा लागतो. ज्ञात ध्वनींच्या या योग्य अर्थ प्रकट होण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना (विनयन), देवघेवीला द्विवेदी 'विनायक धर्म' असे नाव देतात. दुसऱ्या शब्दात, अर्थ-बोध होण्यासाठी केवळ वाक्तत्त्वाचा, (व्याकरण नियमनां)चा आधार पुरेसा नाही, त्यासाठी



विनायक धर्माचीही आवश्यकता असते. वर्ण हे वाक्तत्त्वाचे अवयव आहेत. आणि विनायक धर्माकरवी संयोजित वर्णसमूहाचा अर्थ प्रकाशित केला जातो. वस्तुतः, समाजमानस ग्रहण करील असा योग्य अर्थ देणारे वर्णसमूहाचे संयोजन करणे हा विनायक धर्म आहे. द्विवेदींच्या मते कलेमध्ये प्रेषणधर्मी वाक्तत्त्व आणि मंगलादेशी विनायक धर्म- दोन्ही आवश्यक तत्त्वे आहेत. कुठल्याही एकाची उपेक्षा व त्याकडे दुर्लक्ष केले तर काव्य अथवा कला विराट वा उदात्त श्रेणी गाठू शकत नाही.

द्विवेदी मानतात त्यानुसार सृष्टीमध्ये सर्वत्र आत्माभिव्यक्तीचा प्रयत्न चाललेला दिसून येतो. हे माणसाचेही वैशिष्ट्य आहे. तो आपल्या व्यक्तिगत अनुभवांना वैश्विक रूप देण्यासाठी व्याकुळ असतो. अंतरंगामधल्या भावावेगाला सर्वसाधारणापर्यंत पोचवण्यासाठीची ही जी व्याकुळता असते तिलाच 'कवीच्या अनुभवांचे साधारणीकरण' म्हटले जाते. ही व्याकुळताच नवनिर्मितीचे रहस्य आहे. पण द्विवेदींना एवढेच पुरेसे वाटत नाही. ते पुढे जाऊन प्रश्न करतात की ही व्याकुळता का आहे? याच्या मागे एखादी विराट शक्ती क्रियाशील आहे काय? ते पुन्हा पुन्हा त्या 'विराट शक्ती'ची, त्या 'अदृश्य शक्ती'ची, 'विश्वात्मा' तो 'महाएक' याबद्दली चर्चा करतात. त्यांनी लिहिले आहे :

''शास्त्रकर्ते आणि योगी म्हणतात की हे समस्त चराचर जग अर्थ आहे, पदार्थ आहे, त्याच्या मुळाशी शब्द आहे....हे ठीक आहे; पण अर्थ काय केवळ अर्थ आहे? तो स्वतंत्रपणे स्वतःच भाषा नाही काय? तसेच- ही प्रातःकाळच्या सूर्याची किरणे सोनेरी वर्षाव करतात, संध्याकाळी चंद्रकिरणे धरतीला रजतधारांनी न्हाऊ घालतात, हे सर्व काय केवळ अर्थ आहे? ही स्वतःहून काहीच म्हणत-सांगत नाहीत? हे सर्व कोणासाठी योजले आहे? इतका सारा रंग, हा राग, इतका शब्द, इतकी व्याकुळता, जी जगात दरक्षणी शोभायमान होत राहिली आहे ती काय विभिन्न वर्णांनी बनवलेल्या फक्त भाषेद्वाराच कळणारा अर्थच तेवढा आहे? बीज जेव्हा अंकुररूप घेण्यासाठी दुभंगते, विकल होते तेव्हा चराचर व्यापणाऱ्या उल्हास-वेदनेबरोबर त्या गोष्टीचा ताळमेळ जुळत नाही काय?

रात्रीच्या आकाशात जी इतकी नक्षत्रे कुठेतरी निघाल्यासारखी भासतात त्यांचा काहीच अर्थ नसेल? कोणाला तरी ती शोधत असावीत अशी व्याकुळ वेदना त्यात ऐकू येत नाही? कवी जी 'भाषा' ऐकतो ती म्हणजे काय एक वेडेपणाचा पर्याय आहे? जे लोक स्वतःला विशिष्ट विज्ञानाचे ज्ञाते म्हणवतात ते काय सगळ्या गोष्टींचा बरोबर अर्थ समजू शकतात? सुंदर वस्तूच्या दर्शनाने, मधुर शब्दांच्या श्रवणाने मनात आवेगाचा, उत्सुकतेचा भाव का उत्पन्न होतो हे कोण सांगू शकेल? या वस्तूंचाही काही स्वतंत्रपणे अर्थ आहे किंवा त्यांचीही काही भाषा आहे!... ह्याला साक्ष आहे ती माणसाच्या हृदयाची. हे जग रागमय, इतके छंदोमय आणि रंगमय आहे ते काय व्यर्थ आहे? व्यर्थ- म्हणजे अर्थात अर्थहीन, निरर्थक? नाही! या दृष्टिगोचर चराचर जगाचाही अर्थ आहे. या दृष्टिगोचर परंतु आभासमय तरंग साम्याचाही अर्थ, प्रयोजन आहे: भाषा व्यापक रूप ग्रहण करत राहते. माणसाच्या अंतरंगात छंद, राग, रंग यांसाठी जे व्याकुळ कंपन उठते ते परम शक्तीच्या कोणत्या विलासलीलेची

अभिव्यक्ती असेल हे शास्त्रकार किंवा योगी सांगत नाही.[1]

अशा प्रकारे 'लालित्य-तत्त्वा'संबंधीच्या आपल्या अभ्यासामधून द्विवेदी कलेसंबंधीचे मूलभूत चिंतन सादर करतात. त्यांचे हे चिंतन आत्मवादी आहे. त्यातून ते समस्त सृष्टी व्यापून टाकणाऱ्या उद्दाम, चंचल जीवन-शक्तीचे दर्शन घडवतात. याच दृष्टीने ते 'कलावंताची निर्मितीक्षमता आणि सर्जनाच्या मर्यादा' तसेच 'कलासृष्टीच्या निर्मितीचे स्वरूप' याबद्दल विचार करतात. द्विवेदी मानवाच्या 'विकासशील ऐतिहासिक सत्या'चा स्वीकार करतात. त्यांच्या मते माणसाने जे काही सर्व मिळवले आहे ते आपल्या स्वाभाविक विकासक्रमात निरन्तर संघर्ष करत प्राप्त करून घेतले आहे. याच दृष्टीने ते 'लालित्य सर्जना आणि विविक्तवर्णा भाषे'बद्दल विचार करतात. ते मानतात की कलानिर्मितीच्या मुळाशी केवळ भाव-अर्थ वाहून दुसऱ्यापर्यंत पोचवण्याचीच नव्हे, तर कल्याण, मांगल्य यांचीही प्रेरणा असते. या मताच्या आधारे ते 'वाक्तत्त्व आणि विनायक धर्म' याचे विवरण देतात. 'लालित्य-तत्त्वा'संबंधी त्यांचे हे चिन्तन म्हणजे आपल्या परंपरागत चिंतनाला आधुनिक ज्ञान-विज्ञान आणि आजपर्यंतचा उपलब्ध विविध संशोधनपूर्ण अभ्यास यांच्या प्रकाशात ठेवून त्याची पारख करणे आहे. आपल्या ह्या सूक्ष्म बौद्धिक दृष्टीने ते भाषा, मिथक, छंद, राग, लय, नृत्य, संगीत, काव्य, शिल्पकला, चित्रकला इत्यादींवर स्पष्ट व स्वतंत्र चिंतन करतात व वाचकांसमोर ठेवतात. या चिंतनातून कलेच्या गहन आणि गुंतागुंतीच्या रहस्यांना व समस्यांना सोडवण्याचा, समजून घेण्याचा व वाचकाला समजावून देण्याचा जो एक तळमळीने केलेला गंभीर प्रयत्न दिसतो तो द्विवेदींची 'सृजनशील' आणि 'आचार्य' अशी दोन्ही रूपे वाचकासमोर आणतो.

# परिशिष्ट
# हजारीप्रसाद द्विवेदी यांची साहित्य-निर्मिती

कादंबरी

1. बाणभट्ट की आत्मकथा
2. चारुचंद्रलेख
3. पुनर्नवा
4. अनामदास का पोथा

निबंध

1. अशोक के फूल
2. विचार और वितर्क
3. कल्पलता
4. कुटज
5. आलोक-पर्व
6. विचारप्रवाह

संशोधन, समीक्षा आणि इतिहास ग्रंथ

1. सूर-साहित्य
2. हिंदी साहित्य की भूमिका
3. कबीर
4. हिंदी साहित्य का आदिकाल
5. हिंदी साहित्य; उसका उद्भव और विकास
6. मध्यकालीन बोध का स्वरूप
7. सहज-साधना
8. मध्यकालीन धर्म-साधना
9. नाथ-संप्रदाय
10. सिक्ख गुरुओं का पुण्यस्मरण
11. मेघदूत: एक पुरानी योजना
12. कालिदास की लालित्य योजना
13. मृत्युंजय रवीन्द्र
14. लालित्य-तत्त्व
15. साहित्य का मर्म
16. साहित्य का साथी
17. प्राचीन भारत के कलात्मक विनोद

इतर

1. हजारीप्रसाद द्विवेदी ग्रंथावली (ग्यारह खण्ड)
2. पत्र: हजारीप्रसाद द्विवेदी: सं. मुकुन्द द्विवेदी

सहाय्यक सामग्री

1. शांतिनिकेतनसे शिवालिक: (सं.) शिवप्रसाद सिंह
2. दूसरी परम्परा की खोज: नामवर सिंह
3. उपन्यासकार आचार्य हजारीप्रसाद द्विवेदी: त्रिभुवन सिंह
4. दस्तावेज़ 5/6 (हजारीप्रसाद द्विवेदी स्मृति अंक)
   (सं.) विश्वनाथप्रसाद तिवारी.